म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. २०५

# उर्मि

नि. बा. निबंध.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.
अनुक्रमांक १८ | विभाग निबंध | क्रमांक ४२
पुस्तकाचें नांव उर्मि.
लेखक डॉ. श्री. डोंगरे.
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका

म. ग्रं. सं. ठाणें.
REFBK-0006839
१०१०।१२।२४६

किंमत तीन रुपये.

# उर्मि

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
66 ८
अ. क्र.

लेखक

एस्. एम्. जोशी.

REFBK-0006839

किमत तीन रुपये.

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी,
१९१ शनवार पेठ, पुणें २.

१ सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

२ मुखपृष्ठावरील चित्र दिनानाथ दलाल यांचे आहे.

—: मुद्रक :—
न. वि. गोडसे
श्रीशिवाजी प्रिंटिंग वर्क्स, पुणें २.

१९४७

— समर्पण —

जिनें जीवनांत मला सर्व कांहीं
दिलें पण जिचा मी यत्किंचितही
उतराई होऊं शकलों नाहीं
त्या माझ्या आईच्या पवित्र
स्मृतीस—

— एस्. एम्. जोशी

म.प्र.सं.ठाणे.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १ प्रस्तावना | ७–१५ |
| १ कॉंग्रेसनें माझ्यासाठीं काय केलें | १ |
| २ तुरुंगांतील दिवाळी | ११ |
| ३ त्यांच्या गांवींही नाहीं ! | २३ |
| ४ मी हरिजन असतों तर ! | ३२ |
| ५ जय कोणाचा ? | ४१ |
| ६ आपल्यावरून जग ओळखावं | ५० |
| ७ बंदी जीवनांतील एक आठवण | ६० |
| ८ मालकांची मर्जी | ७३ |
| ९ क्रांतिकारकांचा संसार | ८७ |
| १० भवितव्यतेचा सूड | ९८ |
| ११ केवळ क्रांतीसाठीं | १०० |
| १२ भूमिगताच्या जीवनांत | १२३ |
| १३ हाडक्या | १३५ |

## नवीन प्रकाशनें

१ गुंड्याभाऊ

चिं वि. जोशी

२ लाल किल्ला

नेताजी सुभाषचंद्र बोस

३ आवडत्या गोष्टी

(भाग १-२-३-४)

साने गुरुजी

# प्रस्तावना

" What he ( Nictzsche ) said may be nothing, but the fact that he said it is all-important. Out of such wild intuitions because the heart of the child was in them, the man of the future may have to build his philosophy. "

—*George Santayana*

[ तो ( नित्शे ) जें म्हणाला त्यांत कांहीं नसेलहि, पण तो तें म्हणाला ह्यांत सारें माहात्म्य आहे. असल्या स्वैर अंतः-प्रेरणांतूनच उद्यांच्या माणसाला आपलें तत्त्वज्ञान तयार करावें लागेल, कारण या अंतःप्रेरणांत बालकाचें हृदय होतें. "

—जॉर्ज संतायाना ]

पंचवीस वर्षें होऊन गेलीं त्या गोष्टीला. लोकमान्य टिळक स्वर्गस्थ झाले त्याच्या अगोदर कांहीं दिवस मीं पुण्यांत प्रवेश केला आणि न्यू इंग्लिश

स्कूलमध्यें पाहिल्या इयत्तेंत नांव घातलें. शाळा सुरू होऊन कांहीं दिवस झाले असल्यानें शेवटच्या तुकडींत मला जागा मिळाली. शहरी वातावरणाशीं अपरिचित असल्यानें मी त्या प्रख्यात शाळेंत अगदीं भांबावून गेलों होतों ! कसल्या तरी अज्ञात व अनामिक भीतीनें मन व्यग्र झालें होतें. शाळा सुरू झाल्यावर मधल्या सुटीपर्यंतचा वेळ मीं कसा काढला माझा मलाच माहित! मधल्या सुटीची घंटा झाली आणि सहस्रमुखी कारंजें एकदम सुटावें त्या-प्रमाणें मुलांच्या आरोळ्या व हंसणींखिदळणीं चहूंकडे उधळल्यासारखीं ऐकूं येऊं लागलीं. लाटा अंगावर येत आहेत आणि पायाखालची वाळू घसरत आहे असें कांहींसें विचित्र भय वाटूं लागलें मला. इतक्यांत आमच्या वर्गांत एक उंचेला, गोरा मुलगा झपझप पावलें टाकीत शिरला. टोपी कपाळावर ओढून घेतलेली, गुढघ्यापर्यंत धोतराचा काचा, पायांत पायताणें होतीं कीं नाहीं नक्की आठवत नाहीं ! या मुलाचे डोळे विलक्षण तेजस्वी होते. त्या तेजस्वी मुलाबरोबर कांहीं मुलें होतीं. आणि तो आंत येतांच आमच्या वर्गांतलीं बहुतेक सारीं मुलें मोठ्या उत्साहानें त्याच्याभोंवतीं जमलीं. आपला प्रेमळ सखा आला अशा प्रकारचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसूं लागला. माझ्या वर्गाचा मुख्य उमराणी म्हणाला, "अरे हा एस् एम्. जोशी. 'सी-' मध्यें आहे. मोठा स्कॉलर आहे. पण शिष्ट नाहीं मुळींच .." आणि एस्. एम्. शीं माझा त्यानें परिचय करून दिला. एस्. एम्. नीं त्या वेळीं ज्या प्रेमळपणानें माझी विचारपूस केली त्यामुळें माझ्या भीतीचा ज्वर पार उत-रला. आधार, आदर, आणि आनंद यांनीं मन भरून गेलें. "**याजसाठीं केला होता अट्टाहास**" अशी कृतार्थता वाटूं लागली.

आज इतकीं वर्षें लोटलीं त्या गोष्टीला. पण काल घडल्यासारखा तो प्रसंग मला वाटतो. या दीर्घ काळांत स्थलांतर, व्यवसायांतर, गैरसमज, भांडणें इ. सर्व दुखणीं आमच्या स्नेहाला होऊन गेलीं ! एस्. एम्. आणि मी यांच्यांतली स्वभावभिन्नता तर फारच मोठी होती आणि व्यक्तिविकासा-

बरोबर ती वाढतच गेली. पण एवढ्या सर्व गंडांतरांतून आमचा स्नेह टिकला, नव्हे अधिकाधिक अभ्यंग व बलसंपन्न होत गेला. एस्. एम्. च्या या लेख-संग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचा मला अधिकार असेल जर तो हा दीर्घकालीन सुहृद्भाव एवढाच होय.

कित्येक प्रसंग असे असतात कीं, कितीहि प्रयत्नानें दृष्टीला आवरलें तरी ती मागें पाहिल्याखेरीज रहात नाहीं. माझा तो तेजस्वी बालमित्र आज एक क्रान्तिकारी म्हणून सन्मानिला जात आहे. अशा वेळीं सिंहाव-लोकन केल्यावांचून राहवत नाहीं. त्याच्या गतायुष्यांतलीं माझ्या उत्कट परिचयाचीं कितीतरी चित्रें डोळ्यांपुढून जातात. लहानपणीं लोकांच्या घरीं एस्. एम्. नीं उपसलेले ते कष्ट, वर्गांतली त्यांचीं तीं बिनचूक व तडफदार उत्तरें, दुबळ्या मुलांचीं गाऱ्हाणीं घेऊन त्यांचीं दाद लावण्याकरितां त्यांनीं हट्टी शिक्षकांशीं केलेले ते सामने, राष्ट्रीय महत्त्वाच्या घटनांचे वेळीं नेमस्त शाळाधिकाऱ्यांशीं त्यांचे उडालेले खटके, पर्वती सत्याग्रहाचे वेळीं त्यांनीं हरिजनांतर्फे छातीवर झेललेले ते घाव, प्रतिगामी लोकांनीं त्यांच्यावर केलेले ते भ्याड हल्ले, भाई परमानंदांसारख्या मान्यवर पुढाऱ्यांशीं एका प्रचंड सभेंत त्यांनीं एकाकी असतां धैर्यानें केलेलें तें वाग्युद्ध, अनेकदां आपल्या सुहृदांची व अनुयायांची अलोचन जाग्रणें करून केलेली ती शुश्रूषा, एक ना दोन शेकडों प्रसंग एकामागून एक आठवतात आणि एका उदात्त मनाचा कसकसा विकास होत गेला हें कळून मन साश्चर्य आनंदित होतें. या विकास-क्रमांत आपणहि या मनाच्या संनिध होतों या कल्पनेनें होणारा साभि-मान आनंद शब्दानें पुरेपुर कसा वर्णन करतां येणार ! " निसर्गाप्रमाणें शब्दहि अर्धेच अंतरंग उघडें करून दाखवितात आणि अर्धे झाकून ठेव-तात. " हें कविवचन काय खोटें आहे ?

पण आतां व्यक्तिगत भावकल्लोळांतून वर येऊन या लेखसंग्रहाकडे वळलें पाहिजे. मात्र वर केलेले खाजगी उल्लेख अनाठायीं आहेत असें मला वाटत

नाहीं. एस. एम्. च्या जीवनांतल्या ज्या उदात्त छटा वरील वर्णनांत दिसल्या त्यांचाच सुंदर आविष्कार या लेखांत झालेला दिसेल. एस्. एम्. सारख्या ध्येयवादी कार्यकर्त्यांना जीवनांत कप्याकप्यानें विचारच करतां येत नाहीं. वैयक्तिक जीवन आणि सार्वजनिक जीवन, उच्चार आणि आचार, खाजगी स्नेह आणि कर्तव्यमार्ग या सर्व द्वंदांत जास्तींत जास्त एकसूत्रीपणा आणण्याची खटपट ते करीत असतात. आणि म्हणूनच त्यांचें वाङ्मय वाचल्यांवर त्यांच्या हृदयाचें कपाट जसें आपणांपुढें खुलें होतें त्याप्रमाणें त्यांच्या वैयक्तिक जीवनांतील कांहीं आकर्षक दृश्यें आपण पाहिलेलीं असलीं तर त्यांच्या वाङ्मयांतील कित्येक स्थळें अधिक स्पष्ट व हृदयंगम झाल्यासारखीं वाटतात.

सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्याची प्रचंड चळवळ आपल्या देशांत झाली आणि त्याच सुमारास युवक संघाच्या उदय झाला. युवक संघ ही देशांत सामुदायिक रीतीनें जागृत होऊं लागलेल्या युवकांची संस्था होती. या संस्थेचा त्या वेळचा ध्येयवाद कल्पनारम्य असला तरी त्यांत उत्कटता व त्यागवृत्ति प्रकट होत होती ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. याच वेळीं एस. एम. जोशी यांच्या राजकीय जीवनाचा जन्म झाला. पुढें तीस सालच्या कायदेभंगांत त्यांनीं उडी घेतली. आणि त्यावेळीं देशांत व कारागृहाच्या भिंतीआड सामान्य जनतेच्या विशाल जीवनाशीं झालेला त्यांचा संस्पर्श व समाजवादी ग्रंथांचें कारागृहांत त्यांनीं केलेलें अध्ययन यांमुळें त्यांच्या ध्येयवादाला शास्त्रीय विचारप्रणालीची बैठक मिळाली. केवळ एक नवें तत्त्वज्ञान टूम म्हणून पत्करावें यासाठीं त्यांनीं समाजवादाचा अंगिकार केला असें नाहीं, किंवा माणसावरील श्रद्धा उडाल्यानें वर्गयुद्धाच्या कठोर तत्त्वाला त्यांनीं कवटाळलें असेंहि नाहीं. झुंझार व पुरोगामी राष्ट्रवादाचा स्वाभाविक विकास समाजवादांत होत असतां, त्याच प्रक्रियेंत ज्यांचीं अंतःकरणें निकोपपणें विकसित होत गेलीं अशा समाजवादी युवक नेत्यांपैकीं

एस्. एम्. हे प्रमुख आहेत. आणि या साऱ्या प्रक्रियेचेंच सुबोध व मनःपूर्वक निवेदन म्हणजे हा लेखसंग्रह होय. या दृष्टीनें याला ऐतिहासिक दस्तैवजाची ( Historical Document ) प्रतिष्ठा मिळणार आहे.

हे सारे लेख गेल्या १२–१५ वर्षांत वेळोवेळीं एस्. एम्. नीं लिहिले आणि ते प्रसिद्धहि होत गेले. कांहीं लेख "सामाजिक" या टोपण नांवानें त्यांनीं लिहिलें. एस्. एम्. चें प्रकाशित व अप्रकाशित असें आणखीही पुष्कळ लेखन आहे. पण या संग्रहापुरतें म्हणायचें म्हणजे स्थूल मानानें ललित लेख एकत्र करण्याची दृष्टि ठेविली आहे. "कॉंग्रेसनें माझ्याकरितां काय केलें !" हा पहिलाच लेख ललित आहे कीं नाहीं अशी कुणी शंका घेईल. पण आत्मनिवेदनाचा जो मधुर प्रांजलपणा त्यांत आहे त्यावरून ही शंका सहज फिटण्यासारखी आहे. एका ध्येयवादी मनाचीं विकासाच्या दिशेनें होत गेलेलीं स्थित्यंतरें यांत आपणांला पाहयला मिळतात. या निबंधांतली भूमिका ज्यांना नीट उमगेल त्यांनाच पुढील सर्व लेखांच्या अंतरंगांत सहजतेनें प्रवेश करतां येईल. "मी हरिजन असतों तर" हाहि याच पद्धतीचा चिंतनात्मक व आत्मलक्षी निबंध आहे.

यांतील पुष्कळशा लेखांचें स्वरूप मिश्र आहे. म्हणजे दोन किंवा अधिक वाङ्मयप्रकारांचें त्यांत मिश्रण केलेलें आढळतें. 'इडक्या' हें एक शब्दचित्र असलें तरी त्यांत कथानकहि असल्यानें लघुकथेचा थाटहि या लेखाला आला आहे. 'तुरुंगांतली दिवाळी' ही एकपरीनें गुजगोष्ट आहे, त्याप्रमाणें तींत चिंतनात्मक ( reflective )निबंधाचाहि भाग आहे. 'बंदी जीवनांतील एक आठवण' हें एक स्मृतिचित्र असलें तरी ठसठशीतपणें एका क्रांतिकारक पंजाबी तरुणाचें शब्दचित्रच आपल्या डोळ्यांपुढें उभें राहतें. 'त्यांच्या गांवींहि नाहीं' या लेखाला प्रसंगवर्णनानें सुरुवात होऊन शेवट चिंतनपर होतो. पण असें जरी असलें तरी रंजकता कुठेंहि कमी झालेली नाहीं. 'मांड-जोगी' किंवा 'वसंत-बहार' असे जोड राग एकादा उस्ताद स्वरांचा सच्चे—

पण। बिघडूं न देतां जसा सफाईनें म्हणतो त्याप्रमाणें एस्. एम्. नीं यांतल्या वेगवेगळया वाङ्मयप्रकाराचें मिश्रण बेमालूमपणें हाताळलें आहे. "मालकाची मर्जी" व "भूमिगताचें जीवन" या दोन मात्र शुद्ध लघुकथा म्हणतां येतील.

विचार किंवा भावना यांच्या शब्दरूप देहाला सजविण्याचें कामीं कलावंत आपली सर्व प्रतिभा वापरतो. एस्. एम्. हे या जातीचे कलावंत नाहींत हें उघड आहे. "कला ही निसर्ग नाहीं आणि म्हणूनच ती निसर्गाहून सुंदर आहे." असें महाकवि गटेनें म्हटलें आहे. आणि हा विचार एका विशिष्ट दृष्टिकोणानें बरोबरही आहे. पण एस्, एम्. जोशी यांची ही भूमिका नाहीं. आपणांस पटलेलीं ध्येयें व मूल्यें सुबोध तऱ्हेनें सांगावीत हा हेतु मुख्यतः त्यांनीं मनांत ठेवला आहे. आणि म्हणूनच कथानकाचें अनुसंधान क्वचित् सुटून आत्मनिवेदन सुरु झालें किंवा एका सुंदर दृश्याच्या वर्णनावर एकदम विचारतरंगाचें आवरण पडलें तरी त्याची ते फारशी दिक्कत बाळगीत नाहींत.

पण असें असलें तरी या लेखांत आकर्षकता कमी आहे असें मात्र मुळींच नाहीं. ही आकर्षकता मुख्यतः ज्या गुणानें आली आहे तो गुण म्हणजे मनःपूर्वकता ( Sincerity ). हा एस्. एम्. जोशी यांच्या एकंदर जीवनाचा गाभा आहे आणि तोच वाङ्मयांतही प्रभावी झालेला दिसतो. यांत एस्. एम्. नीं आपलीं दुःखें लपविलीं नाहींत किंवा अज्ञान झाकून ठेवलेलें नाहीं. लहानपणीं गरीबी होती आणि त्यावेळीं कुणी तिचा उल्लेख केला कीं मन संतप्त होई, जेलमध्यें असतां बरोबरचा बालमित्र आज जज्ज होऊन आला तर तो सन्मानपूर्वक आपली गांठ घेईल या आशेनें मन उल्हासित झालें व तो परस्परच गेला त्यामुळें अहंकार दुखावला गेला, ज्यांच्याकरितां जिवाचें रान केलें त्यांच्या गांवींही आपलें कष्टमय जीवन नसावें हें कळून अंतःकरण दुःखी झालें, आपल्यावरून जग ओळखण्याचा प्रयत्न फसला इ. इ. गोष्टी निर्मळ मनानें सांगितल्यामुळें एक मधुर रुचि या संग्रहाला आली

आहे. अर्थात् अज्ञान व दुःख यांचें निवेदन एवढेंच यांतलें आकर्षण नाहीं. या दोन भोवऱ्यांतून वर निघून अधिक उच्च, अधिक उदात्त पातळीवर जाण्याचा प्रयत्न करणारी शुद्ध बुद्धि यांतल्या शब्दाशब्दांतून आपणांला आढळते. वास्तव आणि कल्पनीय यांचें असें सुंदर सहकार्य साधल्यानें या लेखसंग्रहाला एक प्रकारची रम्य पूर्णता आली आहे.

एस्. एम्. हे कलावादी .नाहींत असें मी वर म्हटलें तरी कलेची कांहीं तंत्रें त्यांनीं या संग्रहांतील लेखांत उत्कृष्टपणें हाताळलेली आपणांला आढळतील. उत्कंठा वाढवीत नेण्याचा गुण त्यांच्या लेखनांत चांगल्यापैकीं दिसतो. ‘ भूमिगताच्या जीवनां ’ तलें पत्राचें रहस्य किंवा ‘ आपल्यावरून जग ओळखावें ’ यांतील धकट्याच्या विचित्र मानसिक प्रतिक्रिया पाहिल्यास मी काय म्हणतों तें कळेल. मनांत सांठविलेलीं दृश्यें दृष्टिसमोर उभीं राहतील अशीं करून दाखविण्यांतलें कसब त्यांना चांगलें अवगत आहे.‘त्यांच्या गांवींहि नाहीं’ यांतील रत्नागिरीच्या वास्तूचें दृश्य मीं तो प्रदेश न पाहिला असताहि माझ्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. ‘ हडक्या ’ ची मूर्ति तर आपण कुठेंतरी पाहिली असल्याचा भास होतो ! ‘मालकाची मर्जी ’ व ‘केवळ क्रांतिसाठीं ’ यांतील प्रणयप्रसंगांचीं सूक्ष्म व मादक वर्णनें एस्. एम्. च्या लेखणींतील एका स्वतंत्र गुणांचा प्रत्यय आणून देतात. वर्णन पद्धतीप्रमाणें वाचकांना एका विचाराच्या तंद्रींतून दुसऱ्या विचारांत नेण्याची कला एस्. एम्. ना चांगली साधली आहे.

या लेखसंग्रहांत आढळणारें विचारधन वाचकांना सर्वांत मोलाचें वाटेल.

“ मनुष्याच्या विचारशक्तींत एक प्रकारचं पावित्र्य आणि सत्त्वगुण साठवलेला आहे. ज्या ठिकाणीं विचारांचा शिरकाव झाला तिथून तमोगुणांचें उच्चाटन झालेंच पाहिजे. ”

“दूरवर एकादा बाण सरकन् आकाशांत उंच जातांना दिसायचा. थोडा वेळ आपला प्रकाश पाडून तो खालीं यायचा. आपलं जीवनदेखील या बाणा-

सारखंच नाहीं का ? सर्व शक्ति एकवटून आपण त्या बाणाप्रमाणें उंच भरारी मारण्याचा प्रयत्न करीत आहों, पण शेवटीं बाणाप्रमाणेंच आपली गति होणार नाहीं कशावरून ?'

"जनतेशीं समरस होण्याच्या भरांत आपण सुशिक्षित मंडळी कित्येक वेळीं अत्यंत भावुक व अतिरेकी बनतो."

प्रत्यक्ष अनुभवाच्या मुशींतून तावून सुलाखून निघालेलीं अशीं वचनें ठिकाठिकाणीं सापडतात. आपण कांहीं वेळ पुस्तक मिटून चिंतन करतों आणि मग पुढें वाचूं लागतों. या साऱ्या लेखांना भूतदयेचें आलवाल आणि सहृदयतेची हिरवळ असल्यानें फार शोभा आली आहे.

यांतले बरेचसे लेख तुरुंगांतल्या जीवनाशीं निगडित आहेत. जेलच्या वातावरणांचा आपल्या साहित्य साधनेसाठीं उपयोग करून घेणारे देशभक्त लेखक आपण पाहतों.

"विलायतेमधें असतां आम्ही"

हें जसें पूर्वी परदेशनिवृत्त सुशिक्षितांचें ध्रुवपद असें, तसें—

"तुरुंगामधें असतां आम्ही"

हें या देशभक्त साहित्यिकांचें असतें ! एकादी गोष्ट तुरुंगांत लिहिली किंवा तुरुंगावर लिहिली म्हणजे तिला जळजळीत राष्ट्रीय वाङ्मयाची प्रतिष्ठा मिळालीच पाहिजे असा यांचा छुपा आग्रह असतो ! एस्. एम्. हे याहून अगदीं वेगळे आहेत. त्यांच्यांत हा अहंभाव नाहीं. विशाल मानवी जीवनाचाच जो एक भाग तुरुंगांत त्यांना पाहुला मिळाला त्याच्याशीं समतेनें नव्हे तर आत्मौपम्यबुद्धीनें समरस होण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. आपल्या भावनांचे अंदाज घेणें, सत्यस्वरूप ओळखणें, माणुसकीचा शोध करीत राहणें, पुस्तकी ज्ञान व प्रत्यक्ष जीवन यांचा मेळ घालणें हें सर्व या लेखनांतले उत्कट व्यापार आहेत. आणि म्हणूनच मनोरंजन व उद्बोधन या दोनही दृष्टींनीं या पुस्तकाची योग्यता फार मोठी आहे.

उच्च कला ही श्रद्धेच्या पोटींच जन्माला येते. एस्. एम्. हे सौंदर्य-वादी नाहींत अथवा भक्तिवादी नाहींत आणि तरी त्यांच्या अंगीं असीम श्रद्धा आहे. " वर अनंत आकाश आणि अंतःकरणांत उच्च नैतिक प्रेरणा" हीं कांटनें अपल्या जीवनश्रद्धेचीं दोन महान् तत्त्वें सांगितलीं आहेत. एस्. एम्. हे याच नैतिक जीवनाचे आदर्श आहेत. जगाची व्यवस्था नीतीच्या पायावर झाली पाहिजे, किंबहुना मानवी व्यवहार उंच्च व सुखमय होण्यास नैतिक मूल्येंच पत्करलीं पाहिजेत हा त्यांचा गाढ विश्वास आपणांला त्यांच्या लेख-नांत दिसतो. आणि जीवनांतहि तोच आहे. कारण एस्. एम्. च्या बाबतींत तरी जीवन व लेखन यांत फरक नाहीं.

म्हणूनच एका आदर्श कार्यकर्त्याचें हें लेखन वाचकांना आदरणीय वाटेल याबद्दल मला शंका वाटत नाहीं. माझे मित्र देशमुख कंपनीचे कल्पक संचालक रामभाऊ देशमुख यांनीं हा लेखसंग्रह प्रसिद्ध करण्यास घेतला याबद्दल त्यांना किती धन्यवाद द्यावे ! एम् एस्. ना आपल्या धकाधकीच्या व कार्य-व्यग्र जीवनांत या पुस्तकाच्या मुद्रणाकडे लक्ष द्यायला फुरसत नव्हती. ते जर मुद्रणकार्याकडे लक्ष देऊं शकले असते तर कदाचित् त्यांनीं कांहीं दुरुस्त्या केल्या असत्या. पण त्यांना वेळ न मिळाल्यानें माझ्या मगदुराप्रमाणें मीं हें प्रियतम कार्य केलें आहे. यांत दोष राहिले असतील ते माझे समजावेत- प्रस्तावनेच्या आरंभीं जॉर्ज संतायाना यांचें जें अवतरण आहे त्यांत वर्णिल्याप्रमाणें या एका निर्मळ व बालसदृश मनाच्या स्वैर अंतःप्रेरणा आहेत. उद्यांचा मनुष्य त्यांतून तत्त्वज्ञान निर्माण करील हें वेगळें, पण आजच्या माणसाला त्यांचा मार्गदर्शक म्हणून उपयोग झाल्याशिवाय रहा-णार नाहीं हें खास !

ता. १६ मार्च १९४७ पुणें गोपीनाथ तळवलकर

## पुढील प्रकाशनें

१ तुरुंगांतील पत्रे, भाग दुसरा

वि. स. खांडेकर

२ राजकीय निबंध

सस्. एम्. जोशी

३ ढगा आड

द. र. कवठेकर

# काँग्रेसनें माझ्यासाठीं काय केलें ? १

निवडणुकीच्या क्षेत्रांत उमेदवार म्हणून उभे राहून मतदारांच्याकडे मतांची याचना करायला जाणें हा प्रसंग स्वाभिमानी मनुष्याला थोडासा अप्रिय असाच वाटतो. पण लोकशाहीच्या काळांत अशा प्रकारच्या नसत्या अहंकाराला बळी पडून कोणाचाच टिकाव लागणार नाहीं. शिवाय या कामांतील अनुभवहि कित्येक वेळीं फारच उद्बोधक आणि मनोरंजक असे असतात. म्हणून प्रत्येकानं या मतमागणीच्या कामाचा एक वेळ अनुभव घेण्यासारखा आहे. गेल्या कौन्सिल निवडणुकीच्या निमित्तानं मला हा अनुभव मिळाला. मी स्वतः उमेदवार म्हणून उभा नसल्यानं व राष्ट्रीय सभेच्या वतीनं मत मागण्याचं काम माझ्याकडे असल्यामुळं माझं काम त्या दृष्टीनं पुष्कळच सोपं झालं होतं. सर्वसाधारण मतदार विशेष चौकसपण दाखवीतच नाहींत. ‘हो’ला ‘हो’ म्हणावें आणि प्रचारकाची बोळवण करावी

हा सामान्य अनुभव. अर्थातच ही उदासीन वृत्ति प्रशंसनीय आहे असं कोणीच म्हणणार नाहीं. चौकसपणा वा विरोध यांमध्यें जिवंतपणा दिसून येतो. मला तर विरोधी पक्षाच्या लोकांबरोबर वादविवाद करून त्यांच्या आक्षेपांचं खंडन करण्यांतच विशेष आनंद होत असे. कारण या निमित्तानं काँग्रेसची विचारसरणी यथाशक्ति आपण जनतेंत पसरवीत आहोंत असं समाधान वाटे. सामान्यतः आक्षेप मामुली स्वरूपाचेच असायचे आणि प्रामाणिक व समंजस आक्षेपकाचं समाधान करणं फारसं अवघड नसतं.

एक प्रश्न मात्र अगदीं मूलग्राही आणि बऱ्याच लोकांकडून विचारला जाई आणि त्याला तात्काळ समर्पक उत्तर देणं बरंच अवघड जात असे. तो प्रश्न म्हणजे 'काँग्रेसनं आमच्याकरितां काय केलं आहे?' या प्रश्नाला देखील वरवर उत्तर देऊन उडवून लावणं फार कठीण नाहीं. उदाहरणार्थ, काँग्रेसनं तुम्हांला तुमच्या हक्कांची जाणीव करून दिली; स्वाभिमानी बनवलं; निर्भीड केलं; आणि ताठ उभं रहायला शिकवलं; तुमच्याकारितां सरकारशीं लढा करून स्वातंत्र्याच्या हक्काची घोषणा केली; बलिदान केलं इत्यादि. पण हा प्रश्न एवढ्यावरच संपत नाहीं. काँग्रेसनं समाजाच्या निरनिराळ्या थरां-करितां आतांपर्यंत काय केलं आहे आणि पुढं काय करतां येण्यासारखं आहे याचा विचार झाला पाहिजे. काँग्रेस कार्यकर्त्यांनीं थोडा वेळ अंतर्मुख होऊन या गोष्टीचा विचार करणं अत्यंत आवश्यक आहे. निदान प्रत्येकानं आपल्यापुरतं जरी या प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा फार उपयोग होईल. आणि म्हणूनच आज मी माझ्यापुरता या प्रश्नाचा विचार करणार आहे. हाच प्रश्न मी तुरुंगांत असतांना माझ्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या कित्येक कैद्यांच्याकडून विचारला जाई आणि त्याचं सर्वतोपरीं समाधान करणं मला जमत नसे.

संध्याकाळीं कोठडींत बंद झाल्यावर तुरुंगाच्या त्या एकांतवासांत या प्रश्नावर विचार करूं लागलं म्हणजे मति गुंग होऊन जात असे. कॉलेजांतील

शिक्षणक्रम संपतांच किंवा संपण्यापूर्वीच म्हणा पाहिजे तर, राजकीय चळ॰ चळींत भाग घ्यायला लागावं आणि एकदां भाग घेतल्यावर तो मार्ग सोडून परत फिरण्याची इच्छा होऊं नये याचं काय बरं कारण असूं शकेल ? कोणी म्हणतील कीं आपण इतके पुढें गेलों आहों कीं आतां परत फिरणंच अशक्य आहे. पण हें माझ्या बुद्धीला नाहीं पटत. प्रवृत्ति असेल तर परत फिरणं अगदीं शक्य आहे. पण फिरावंसंच वाटत नाहीं. राजकारणांत उडी घेण्यापूर्वी जी परिस्थिति होती ती तशीच कायम नसली तरी प्रतिकूल नाहीं. थोडीफार अनुकूल आहे असं म्हटलं तरी चालेल. राजकारणाच्या कष्टमय जीवनांत अशी काय जादू आहे, असं कोणतं आकर्षण आहे कीं त्याच मार्गाला चिकटून रहावसं वाटावं ? वाटावं काय ? तो मार्ग सोडला तर कशी अवस्था होते याचं मला एक उदाहरण ठाऊक आहे.

कांहीं महिन्यांपूर्वी मुंबईस एका क्रांतिकारकाची भेट घेण्याचा मला सुयोग आला. भगतसिंगाबरोबर कांहीं काल जीवन घालवलेला असा एक बुद्धिमान तरुण होता तो. परिस्थितीनं नाडला गेल्यामुळं मुंबईस एका कंपनींत त्यानं नोकरी पत्करली होती. भेट होऊन ओळख पटल्यावर थोडा वेळ आम्ही इकडल्या तिकडल्या गप्पा मारल्या. आणि त्याची ती बेफिकीर वृत्ति पाहून मला थोडा वेळ त्याचा हेवा वाटला. पण हें सर्व नाटक आहे याची साक्ष मला थोड्याच वेळांत पटली. तुला तनखा काय मिळतो म्हणून मीं प्रश्न केला आणि रकमेचा आंकडा समाधानकारक आहे असं पाहून मीं म्हटलं, ' वाह, अच्छी तनखा दे रहे है आपको.' त्यावर त्यानं एकाच वाक्यांत उत्तर दिलं 'क्यूं न दे भाइ ? मै आपनी आत्माको जो बेच रहा हूं!' वाक्य उच्चा॰ रीत असतांना त्याच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिलेले मीं पाहिले. असो.

प्रतिकूल परिस्थितींत शाळेचा अभ्यासक्रम पुरा करून कॉलेजांत पाय ठेव– तांना किती उल्हास वाटत होता ! वसंत ऋतूमध्यें वृक्षाला नवी पालवी फुटावी त्याप्रमाणें शाळेच्या वातावरणांतून सुटून कॉलेजच्या विस्तृत आणि खुल्या

वातावरणांत प्रवेश करतांना नवीननवीन विचार, नवोनव कल्पना, आणि अनेक सुखस्वप्नं यांनीं मन नुसतं फुलून गेलं होतं. प्रीतीचा प्रथमच अनुभव घेणाऱ्या प्रणयिनीची उल्हसित वृत्ति, आपल्या प्रियकराला खूष करण्याकरितां चाललेली तिची खटपट, आणि भावी संसाराच्या सजावटीचीं आकर्षक चित्रं रेखाटणारं तिचं मन, यांमध्यें आणि माझ्या त्या वेळच्या मनःस्थितींत किती साम्य होतं! निरनिराळ्या कल्पनाकलिकांनीं व विचारपुष्पांनीं मनाची सजावट करून आपल्याजवळ जें अत्युत्कृष्ट असेल त्याचं प्रदर्शन करण्याकरितां माझे अटोकाट प्रयत्न चालू होते. जीवनाविरुद्ध तक्रारीला जागा नव्हती. अभ्यास करून विद्वत्ता आणि ज्ञान संपादन करणं एवढ्या एकच व्यवसायानं जीविताचं साफल्य होईल असं वाटत होतं. पण हें समाधान फार वेळ टिकलं नाहीं. कॉलेजच्या चार वर्षांच्या प्रवासांतील अर्धाअधिक मार्ग आक्रमल्यावर मनाचा दृष्टिकोन बदलूं लागला. जीवनविकासाला, कर्तृत्व दाखविण्याला कॉलेजचं क्षेत्र अपुरं वाटूं लागलं. कारणं अनेक असूं शकतील. सहाध्यायी लोकांत अगदीं अव्वल दर्जा मिळविणं जमत नसल्यामुळें स्वतः चमकण्याकरितां दुसरं क्षेत्र शोधावंसं वाटलं असेल; आजकालच्या समाजजीवनाशीं फारसा संबंध नसलेल्या मिथ्या ज्ञानाचा जीवनविकासाच्या दृष्टीनं फोलपणा जाणवूं लागला असेल, किंवा जात्याच भावनाप्रधान मनाला केवळ ज्ञानाचा मार्ग रुक्ष वाटला असेल. कारण कांहीं असलं तरी विद्यालयीन क्षेत्रापेक्षां जास्त विस्तृत क्षेत्राच्या मार्गाला मी लागलों एवढें मात्र निश्चित.

लहानपणापासूनच सार्वजनिक कामची मला आवड होती. आणि त्या वेळेच्या माझ्या मगदुराप्रमाणं मीं आपलीं ध्येयंदेखील ठरविलीं होतीं. गरिबींत जन्म घेतलेल्या मुलांना शिक्षण मिळविण्यास काय अडचणी पडतात हें मला स्वानुभवानं माहीत होतं. म्हणून त्यांच्याकरितां एखादी संस्था काढावी असं कित्येक दिवसांपासून वाटत होतं. कॉलेजचं शिक्षण घेणं म्हणजे अत्यंत मोठ्या सुखाचा लाभ करून घेणं असं वाटत असल्यामुळं

असं कांहींतरी ध्येय ठरवावं हें साहाजिकच होतं. पण कॉलेजचं माझं शिक्षण पुरं होण्यापूर्वीच माझं मन त्यासंबंधीं साशंक झालं. केवळ शिक्षणानं जीवनाचा प्रश्न सुटत नाहीं आणि ज्या शिक्षणाचा समाजजीवनाशीं यत्किंचितहि संबंध नाहीं, अशा शिक्षणानं तर नाहींच नाहीं अशी माझी बालंबाल खात्री झाली. वैयक्तिक दृष्ट्या देखील नुसत्या शिक्षणानं किंवा बौद्धिक व्यासंगानं माझ्या मनाचं समाधान होईल असं दिसेना.

समाजांतील जास्तींत जास्त लोकांशीं आपला संबंध यावा असं वाटूं लागलं. मूठभर सुशिक्षित लोकांच्याबरोबर राहून जीवनाची भूक भागेना आणि म्हणून समाजांतील बहुसंख्य वर्गाकडे माझ्या मनानं धांव घेतली. शिवाय तसं पाह्यलं तर मी जरी उच्च ब्राह्मण कुळांत जन्माला आलों असलों तरी परिस्थितीनं मीं बहुसंख्य वर्गापैकींच आहें अशी जाणीव मला आहे व लोकांनीं ती करून देण्याचा बुद्धिपुरःसर प्रयत्नाहि केला आहे. लहाणपणीं माझी पडती बाजू होती, तेव्हां एका आश्रयदात्यानं ‘ मिजास बादशहाची आणि दुकान भडभुंजाचं’ असा मला टोमणा मारला होता. त्या वेळीं मला फार वाईट वाटलं. भडभुंजाच्या दुकानाचा आणि आपल्या परिस्थितीचा मेळ घालण्याचा मी किती दिवस प्रयत्न करीत होतों. पण इच्छा विरुद्ध असल्यामुळं त्या वेळीं मला तें जमलं नाहीं. आज मात्र तो मेळ बसला आहे. आज मला भडभुंजाच्या जीवनाविषयीं जास्त आपलेपणा वाटतो. जास्त सहानुभूति वाटते. इतकेंच काय पण दलित वर्गाविषयीं तटस्थपणानं विचार करणं देखील मला अवघड झालं आहे. त्यांची सर्वच कृत्यें मला समर्थनीय अशीं वाटतात. पारतंत्र्यांत दुसऱ्याच्या दडपणाखालीं रखडणाऱ्या मनाची वाढ खुलेपणानं होऊं शकत नाहीं आणि निरनिराळे मनोगंड निर्माण होतात. तशांतलाच हा प्रकार नव्हे का ?

उगवणाऱ्या अंकुरावर एखादा दगड ठेवावा त्याप्रमाणं विकसणाऱ्या

मनावर परकीय शृंखलाचं दडपण असतं आणि मन दुसऱ्या अनेक व्यवसायांत मग्न झालं तरी राहून राहून त्या शृंखलांची स्मृति त्याला बोंचत असते. त्या शृंखला झुगारून देण्याकरितां त्याची सारखी धडपड चालू असते. गुलामगिरीत राबणाऱ्या देशांतील सर्व कर्तृत्वाचा, प्रतिभेचा आणि बुद्धिसामर्थ्याचा बळी या होमकुंडांत द्यावा लागतो तो याचमुळं. कॉलेजांतल्या छोटेखानी जगांतून मोठ्या जगांत पाऊल ठेवण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या आणि विशेषतः सर्व प्रकारच्या मानसिक दडपणांचा अनुभव घेतलेल्या माझ्या मनाला राजकारणाच्या क्षेत्राचं आकर्षण वाटावं यांत नवल काय ? देशाच्या स्वातंत्र्याकरितां असंख्य हालअपेष्टा भोगून आत्मसमर्पण करणाऱ्या ध्येयात्म्याच्या पावलावर पाऊल ठेऊन आपली जीवनयात्रा सुरू करावी, जनतेच्या हृदयांत स्थान मिळवावं, आणि उदात्त व उच्चतर अशा सात्विक भावनांचा अनुभव घ्यावा असं कोणत्या तरुण मुलाला वाटत नसेल ? सायमन कमिशन बहिष्काराच्या चळवळींत पूज्य लालाजींच्यावर लाठीमार झाला. त्या लाठीनं त्यांच्या शरिरावर जखम झाली, त्याच्यापेक्षां असंख्य पटीनं मोठी अशी जखम त्यांच्या स्वाभिमानी हृदयावर झाली आणि त्यांनीं अल्पावकाशांतच इहलोक सोडला. तरुण हिंदुस्थानचं रक्त सळसळूं लागलं. त्या निमित्तानं मीं पाहिलं जाहीर भाषण केलं. संतापानं माझं डोकं ठिकाणावर नव्हतं. त्या वेळीं सरकारविरुद्ध मी काय काय बोललों तें मला आज स्मरतहि नाहीं.

राजकीय क्षेत्रांत मीं प्रवेश केला आणि युवक चळवळींत भाग घेण्यास सुरुवात केली. जीवनाशीं अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं अशा विषयांवर चर्चा करण्याऐवजीं हिंदुमुसलमानांचा प्रश्न, वसाहतीचं स्वराज्य कीं संपूर्ण स्वातंत्र्य, अस्पृश्यतानिवारण, खादी वगैरे जिवंत प्रश्नांवर आमचे वादविवाद होऊं लागले; ओळखी-पाळखी वाढल्या; दृष्टिकोन व्यापक झाला आणि आयुष्यांत एक नवीन स्वारस्य उत्पन्न झालें. पण केवळ तात्त्विक विवेचन आणि व्याख्यानं यांनीं आमची भूक भागण्यासारखी नव्हती. कांहींतरी

प्रत्यक्ष कृति करून दाखविण्याकरतां आमचं मन धांव घेत होतं. वसाहतींचं स्वराज्य आणि संपूर्ण स्वराज्य ओलांडून संपूर्ण स्वातंत्र्य आम्हीं पसंत केलं, पण पुढं काय हा प्रश्न घेतांना कार्याला हात कसा घालावा ? सुरुवात कोठून करावी हें आम्हांला सुचत नव्हतं; मन भांबावून गेल्यासारखं झालं होतं. अशा वेळीं आम्हांला मार्ग दाखविण्याचं सामर्थ्य एकट्या काँग्रेसशिवाय कोणामध्यें होतं ? आम्ही तिच्याकडे आशायुक्त अंतःकरणानं पहात होतों आणि तिनं आमचं गाऱ्हाणं ऐकलं. राष्ट्रीय स्वातंत्र्याकरितां प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं सुरू झाली आणि आम्हीं त्यांत उड्या घेतल्या. त्या वेळचा तो अनुभव अभूतपूर्व असाच होता. ज्यांच्या दारिद्र्याविषयीं आम्ही दिवसानुदिवस चर्चा करीत होतों त्यांच्याशीं परिचय झाला—परिचय कसला, प्रत्यक्ष दारिद्र्यच पुढं उभं राहिलं. शेंकडों वर्षांच्या पिळणुकीनं जीर्ण झालेली शेतकऱ्याची केविलवाणी मूर्ति पाहून मला काय वाटलं असेल. माझ्या बिकट परिस्थितीचा मी केवढा बाऊ करून बसलों होतों ? त्या मानानं शेतकऱ्याची परिस्थिति काय होती ? मला हसावं कीं रडावं तेंच कळेना. रडण्याकडेच मनःप्रवृत्ति होती. पण शाबास त्या शेतकऱ्याची ! माझ्यापेक्षां त्याच्यांत जास्त जिवंतपणा होता. इतक्या संकटांतहि त्याची उमेद खचलेली नव्हती. काँग्रेसनं शिंग फुंकतांच शेंकडों सरकारी आणि बिनसरकारी दडपणं झुगारून देऊन त्यानं ताठ उभं रहाण्याचा प्रयत्न केला. माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. समाजवादाकडे माझा पहिल्यापासून कल असूनहि केवळ निराशेनं मी 'लढाऊ शेतकरी व कामगार' या शब्दाची कुचेष्टा करीत असें. पण आज उदासीनतेचं पटल दूर झालं. सत्याग्रहाच्या चळवळीच्या अनुभवानं बहुजनसमाजावरचा माझा विश्वास जागृत झाला आणि जीवनांत आशेचा किरण उगवला.

काँग्रेसनं मला तुरुंगाचा अनुभव करून दिला आणि त्यामुळं मानवी जीवन काय आहे याची वास्तविक कल्पना मला झाली असं म्हणायला हरकत नाहीं. मानवी जीवनाचं कोडं मला पूर्णपणें उलगडलं आहे असं नाहीं,

तरी पण पूर्वीपेक्षा आतां पुष्कळच प्रकाश पडला आहे. असंख्य दुःखीकष्टी जीवांचा मला परिचय झाला. त्यांच्यांत मिसळून तुरुंगाच्या भकास जीवनांत हास्यविनोद उत्पन्न करावा आणि एकमेकांचा भार हलका करावा यांत आनंद वाटूं लागला. ज्या भडभुंजाच्या जीवनाशीं समरस होणं मला एके काळीं कमीपणाचं वाटत होतं, त्याच दलित जीवनाशीं त्याचाच एक भाग म्हणून एकरूप होण्यानं एका निराळ्याच उदात्त आणि उच्चतर भावनेचा मला अनुभव आला. एककल्ली शिक्षणानं आपलं मन स्वच्छ होण्याऐवजीं कलुषित झालं होतं याची मला जाणीव झाली व त्या पुस्तकी वर्गनिष्ठ संस्कृतीबद्दल तिरस्कार वाटूं लागला. काँग्रेसनं माझ्या विचारांना धक्का दिला आणि मी खडबडून जागा झालों. केवळ पुस्तकी विद्येची मला अडगळ वाटूं लागली.

तुरुंगांतून बाहेर आल्यावर माझा दृष्टिकोन अगदीं बदलून गेला. कायद्याचा अभ्यास करून कांहीं तरी उपजीविकेचं साधन मिळवावं म्हणून मीं कॉलेजांत पुनः नांव घातलं; पण त्या जीवनांत पूर्वीची गोडी वाटेनाशी झाली. तेथील सहाध्यायी लोकांबरोबर समरस होणं आतां अशक्य झालं. काँग्रेसनं माझ्या विचारांत क्रांति घडवून आणली. निरनिराळीं सुखस्वप्नं उराशीं बाळगून कॉलेजांत आनंदानं वावरणाऱ्या विद्यार्थ्यांकडे पाह्यलं म्हणजे मला कसं चमत्कारिक वाटे. कृत्रिम वातावरणांत वाढणारीं हीं सुंदर फुलझाडं बाह्य जगांतील वादळांपुढं टिकाव धरूं शकणार नाहींत; जीवनास आवश्यक अशीं पोषक द्रव्यं न मिळाल्यामुळं तीं खुरटून जातील; त्यांची वाढ खुंटेल व त्यांचं सर्व सौंदर्य नष्ट होईल.— अशा उदासीनतेच्या विचारांनीं मन खिन्न होऊन जाई. प्रत्यक्ष जीवनाशीं संबंध नसेल तर बाहेरून आणलेल्या उसन्या विचारांनीं किंवा ज्ञानानं मनाचा विकास होऊं शकत नाहीं. नवीन विचार, नवीन कल्पना त्याला सुचणार नाहींत आणि मानसिक जीवन सुसंपन्न होणार नाहीं. प्रापंचिक जीवनाची तर गोष्टच बोलायला नको. निर्धन मध्यमवर्गीय तरुणांनीं यापुढें तसल्या आशा बाळगूं नयेत हाच शहाणपणाचा मार्ग.

ह्या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे काँग्रेसनं माझ्याकरितां काय केलं या प्रश्नाचं उत्तर मिळतं. नुसतं उत्तर मिळतं एवढंच नव्हे, तर कृतज्ञतेनं मन भरून येतं. अपरिहार्य दारिद्र्याची पूर्वी मला लाज वाटत होती. दारिद्र्य ही स्पृहणीय गोष्ट नाहींच, तरी पण त्याबद्दल व्यक्तीला लाज वाटण्याचं कारण नाहीं. कारण तें नष्ट करणं हें व्यक्तीच्या कर्तृत्वावर यापुढं अवलंबून नाहीं. तें नष्ट करायचं तर जीर्ण झालेली समाजरचना प्रथम उखडून काढावयास पाहिजे. आजच्या स्थितींत बहुजनसमाजाच्या नशिबीं दारिद्र्यच आहे. बरो-बरीच्या लोकांची रहाणी पाहून पूर्वी त्यांचा मला थोडासा हेवा वाटे. त्यांच्या सारखं आपण व्हावं असं वाटे आणि सधन नसल्यामुळं मनाला यातना होत. काँग्रेसनं जी शिकवणूक दिली त्यामुळं आज मी माझ्या रहाणीबद्दल, माझ्या फाटक्या कपड्यांबद्दल बेफिकीर असतों, निदान तसा प्रयत्न करतों. त्यामुळं मनाच्या असंख्य यातना दूर झाल्या आहेत. ज्या वेळीं माझ्या आयुष्याचा डाव कुजल्यासारखा झाला होता, मानसिक विकास थांबून ऱ्हासाचीं चिन्हं दिसूं लागलीं होतीं, त्या वेळीं काँग्रेसनं माझ्या जीवनांत अजब क्रांति घड-वून आणली. जास्त व्यापक अशा समाजजीवनाशीं खराखुरा संबंध घडवून आणून त्यांत आपलं स्थान कोणतं याची जाणीव करून दिली. तुंबलेल्या पाण्याच्या डबक्याप्रमाणं कुजलेल्या माझ्या क्षुद्र जीवनांत जिवंत पाण्याचा झरा निर्माण केला आणि तो झरा अफाट जीवगंगेला मिळविण्याचा मार्ग करून दिला. थोड्या वेगळ्या शब्दांत सांगावयाचं तर काँग्रेसनं माझ्याकरितां एक स्वतंत्र प्रपंच निर्माण करून दिला असं म्हणतां येईल.

एकाद्या बालकानं आईला विचारलं कीं तूं माझ्याकरितां काय केलंस ? तर ती त्याचं उत्तर काय देऊं शकेल ? तिला फार झालं तर इतकं म्हणतां येईल कीं, ' मीं तुला जन्म दिला. तुला इच्छाआकांक्षांनीं भरलेलं जीवन दिलं. ' ज्या कोणाला जीवन ही एक माया वाटत असेल अशा निरासक्त माणसानं म्हणावं पाहिजे तर, कीं ' आईनं माझ्याकरितां कांहीं केलं नाहीं. '

पण ज्यांना जगावंसं वाटतं, ज्यांची जीवनावर आसक्ति आहे त्यांनीं आईचे उपकार स्मरलेच पाहिजेत. कॉंग्रेसचे मजवरील उपकार अशाच प्रकारचे नाहींत का ? तिनें माझ्याकरतां हा नवा संसार थाटून दिला नाहीं का ? अनेक महत्त्वाकांक्षा आणि ध्येयांनीं तो भरलेला आहे. तो सोडावा असं वाटत नाहीं. रोजच्या व्यवहारांत देखील आपण वैतागून मरण्याची भाषा बोलतों, पण ती एक क्षणभरच. मृत्यु जितका दूर जाईल तितकं आपल्याला हवं असतं. तशीच अवस्था कित्येकदां राजकारणांत पडलेल्या माझ्यासारख्या कॉंग्रेसकार्यकर्त्यांची होते. मला फार त्रास झाला, यातना भोगाव्या लागल्या व विशेषतः ध्येयसिद्धीबद्दल मन थोडंसं निराश झालं म्हणजे मी राजकारण-संन्यासाची भाषा बोलूं लागतों. पण संन्यास घेण्याची खरीखरी इच्छा कधींच नसते. तें वैराग्य म्हणजे स्मशानवैराग्याप्रमाणें क्षणिक असंच असतं. कॉंग्रेसनं थाटून दिलेल्या संसारावर माझं प्रेम आहे, किंबहुना आसक्ति आहे आणि त्यामुळंच मला जगण्यांत मौज वाटते. तेव्हां ' कॉंग्रेसनं माझ्याकरितां काय केलं ? ' असं म्हणण्यांत काय अर्थ आहे ! कॉंग्रेसनं मला पुनर्जन्मच दिला असं म्हटलं तरी चालेल.

## तुरुंगांतील दिवाळी

## २

लेखाचं नांव वाचतांच वाचक म्हणतील, ' काय ? तुरुंगांत आणि दिवाळी ? ' कोणी म्हणतील कीं, ' तुरुंग या शब्दाची चेष्टा आहे ही खरोखर. ' तर कोणाला त्याचं कौतुकहि वाटेल. मला वाटतं, कीं ज्यांना तुरुंगाचा थोडाफार अनुभव आहे त्यांना त्यांत आश्चर्य तर वाटणार नाहींच पण उलट त्या काळच्या स्मृति जागृत होऊन एक प्रकारची सुखसंवेदनाच होईल. ' गेले एकदांचे ते दिवस ! ' असं म्हणून ते एक समाधानाचा सुस्कारा टाकतील.

ज्या कोणाचे इष्टमित्र अजून तुरुंगांत खितपत पडलेले असतील, त्यांच्या मनाला किंचित् चरका बसेल; आनंदाला तर गालबोट लागेल. ' तुरुंगांतील दिवाळी ' या कल्पनेमध्यें आश्चर्य करण्यासारखं वस्तुतः कांहींच नाहीं. दिवाळी हा एक असा सण आहे, कीं तो प्रत्येक मनुष्य — रावापासून रंका-

पर्यंत — आपापल्या परिस्थित्यनुसार साजरा करीतच असतो. राव या शब्दाची योजना करतांना मराठींतल्या एका म्हणीची मला आठवण होते. ती म्हणजे माझ्या विधानाच्या अगदीं विरुद्ध आहे. असं म्हणतात कीं ‘ राजाला दिवाळी ठाऊक नसते. ’

पण खरं पाहिलं तर माझ्या मनांत राजा आणि दिवाळी या दोनच शब्दांची सांगड बसल्यासारखी झाली आहे. कारण लहानपणीं आमच्याकडे थिबा राजाची दिवाळी फार प्रसिद्ध असे. रत्नागिरीच्या जवळ एका डोंगरावर ह्या ब्रम्ही राजाला ब्रिटिश सरकारनं डांबून ठेवलं होतं आणि तिथं तो मोठ्या थाटामाटानं आपली दिवाळी साजरी करीत असे. विशेष म्हणजे त्याची दिवाळी इतरांच्या दिवाळीच्या अगोदर व्हायची आणि आजूबाजूच्या कित्येक मैलांवरच्या खेड्यांतून ही दिवाळी पहायला लोक जमायचे. त्यामुळं माझ्या मनांत दिवाळी हा शब्द राजा या शब्दाबरोबर निगडित झाला असावा. ‘ राजाला दिवाळी ठाऊक नसते ’ याचा अर्थ इतकाच असावा कीं तो काय दररोज आनंदांत आणि चैनींत असणार, त्याला दिवाळीचा दिवस आणि एक नेहमींचा दिवस यांत फरक काय दिसणार ? पण आमच्या हिंदुस्थानांत आज जे असंख्य राजेमहाराजे आहेत त्यांना राज्यकारभारचं विशेष काम नसल्यामुळें वेळ घालविण्यासाठीं दुसरे अनेक कारभार करावे लागतात त्यांतलाच हा एक प्रकार असावा.

असो. सांगायचं तात्पर्य असं, कीं दिवाळीचा सण सर्व माणसं साजरा करतातच आणि आम्ही कैदी लोक त्याला अपवाद नाहीं. किंबहुना दिवाळीच्या सणाचं महत्त्व आम्हांला जितकं जाणवतं, तितकं लहान मुलांखेरीज इतरांना जाणवत असेल कीं नाहीं याची मला शंका आहे. वाढत्या वयाबरोबर व्यापहि वाढत जातात आणि सणाचं स्वारस्यदेखील कमीकमी होत जातं. तुरुंगांत गेलं म्हणजे पुन्हा एक वेळ हे सर्व व्याप कमी होतात आणि लहानपणच्या निरनिराळ्या गोष्टींचं चिंतन करण्यास वेळ मिळतो.

लहानपणीं किती उत्कंठेनं त्या दिवसाची आम्हीं वाट पहायची ! नरक-चतुर्दशीच्या आदल्या रात्रीं मला त्यामुळें लवकर झोंपदेखील यायची नाहीं. तुरुंगांत असतांना देखील दिवाळीच्या आदल्या दिवशीं रात्रीं पथारीवर पडलं म्हणजे मला त्या गोष्टी आठवायच्या आणि मौज वाटायची. किती निरागस आनंद तो लहानपणचा ! शाळा बंद व्हायच्या; फटाके वाजवायला मिळायचे; गोडगोड पक्वान्नं मिळायचीं; आणि तीनचार दिवस तरी शाळेची आणि अभ्यासाची कोणी आठवण करून द्यायची नाहीं. खेळायला सवरायला पूर्ण परवाना असायचा. अन् दिवाळी संपली म्हणजे किती वाईट वाटायचं. विशेषतः भाऊबिजेच्या दिवसाची मला फार आठवण होई आणि आपल्या असहाय्य स्थितीबद्दल वाईट वाटे. लहानपणीं खोड्या करणं आणि लहान भावंडांना चिडवणं यांतच मौज वाटते. माझी सर्वांत धाकटी बहीण ‘ मला ओंवाळणी काय घालणार ? ’ म्हणून मागं लागायची आणि मी म्हणायचा ‘ कापसाचं बोंड. ’ कोणाला माहीत कापसाच्या बोंडानंच माझ्या मनाची कां एवढी पकड घेतली होती ! पण कापसाचं बोंड म्हणजे सर्वांत कमी किंमतीचा पदार्थ मला वाटे. मी असं म्हणे, पण प्रत्यक्ष ओंवाळण्याची वेळ आली म्हणजे आईच्या दराऱ्यामुळं मला तसं करण्याचा धीर होत नसे. तरी पण एकदां मीं तें धारिष्ट केलंच. ओंवाळणी घालण्यासाठीं आईनं दिलेला रुपाया तसाच ठेवून मीं कापसाचं बोंड आरतीमध्यें टाकलं. सर्व मंडळी हंसली. मला कृतकृत्य वाटलं.

माझ्या बहिणीकडे मीं विजयानंदानं पाह्यलं आणि तिच्या डोळ्यांत दोन मोठाले अश्रु उभे राहिलेले मीं पाहिले. तुरुंगांत ज्या ज्या वेळीं मला दिवाळीच्या सणाची आठवण होई त्या त्या वेळीं ते अश्रु माझ्या डोळ्यांसमोर उभे रहात आणि माझ्या डोळ्यांना पाणी येई. त्या वेळीं ओंवाळणी घालणं म्हणजे काय ? मी मिळवता थोडाच होतों ! आईनं द्यायचं आणि आम्हीं ओवाळणी घालायची व पुन्हा तिनंच ते पैसे आपल्या ताब्यांत घ्यायचे. असा उजव्या

हातानं देऊन डाव्या हातानं परत-घ्यायचा प्रकार ! पण आज काय परिस्थिति आहे ! आतां ताई आपल्या घरीं आहे; शेजारणीपाजारणींचे, तिच्या मैत्रिणींचे भाऊ त्यांना मोठ्या प्रेमानं येऊन भेटत असतील आणि त्यांच्या बहिणी त्यांना ओंवाळीत असतील. त्या वेळीं माझ्या ताईला काय वाटत असेल ? आपला भाऊ असून देखील आज भाऊबिजेला येऊं शकत नाहीं ! खरंच, एक पत्र पाठवायचं म्हटलं तरी कैद्यांच्या हातचं नसतं. लहानपणीं कापसाचं बोंड तरी घातलं; पण आज एक कागदाचं चिठोरं देखील मला पाठवतां येत नाहीं ! असे विचार येऊन मन उदास होई. अशा प्रकारें विचार करून मन थकलं म्हणजे त्यात झोप लागावी.

बाह्य जगांत आपणांला स्वप्नाची मुळींच किंमत वाटत नाहीं. पण तुरुंगांत स्वप्नं –चांगलीं स्वप्नं– हीं देखील एक दौलत आहे. जागृतावस्थेंत ज्यांच्या भेटीगांठी होत नाहींत, त्यांच्या भेटी–अगदीं खऱ्याखुऱ्या भेटी–स्वप्नांत होतात. अशाच एका दिवाळीच्या दिवसाची मला आठवण आहे. मी विचार करीत करीत झोंपीं गेलों आणि पहांटेच्या सुमारास मला एक अगदीं गोड स्वप्न पडलं.

एक रम्य देखावा होता. दिवाळीचा सण होता. नरकचतुर्थीच्या अभ्यंग-स्नानाचा दिवस. इतर सर्व माणसं उठलीं होतीं तरी मी उठलों नव्हतों, म्हणून माझी बहिण माझ्या खोलींत आली आणि मला हालवून म्हणाली, ‘ भाऊ, उठायचं नाहीं का तुला ? बघ तुझ्या आधीं उठून आम्हीं आंघोळी केल्या. मी आतां नानांच्या आंघोळीला फटाक्यांचा सर लावणार. ’ असं ती म्हणत आहे तोंच फटाक्यांचा आवाज कानीं येऊन मी एकदम जागा झालों. पाहातों तों काय ? मी घरीं नसून अंधारकोठडींत पडलों आहें आणि माझ्या बहिणीनं वाजवलेले फटाके मला ऐकूं येत नसून जवळच्या पोलिसलाइनींत फटाक्याचे बार होत आहेत. किती गोड होतं स्वप्न ! पण त्या फटाक्यांनीं तें नष्ट केलं. जेल उघडायला अजून बराच अवकाश होता, तरी मी उठलों

आणि संध्याकाळीं भरून ठेवलेल्या [illegible] पाण्यानं चूळ भरून पुन्हा पथारीवर येऊन बसलों. फटाक्यांचे आवाज अजून होतच होते. मुलांचं हंसणंखिदळणंदेखील चांगलं ऐकूं येत होतं. पण त्यांच्या आनंदांत मला समरस होतां येईना ! मला त्यांचा हेवा वाटला. मनुष्यस्वभाव किती स्वार्थी आहे !

मी नरकचतुर्दशीच्या सणाचा विचार करूं लागलों. बाहेर असतांना नरकासुराची गोष्ट मीं ऐकली होती. पण त्या दिवशीं नरकचतुर्दशीचं महत्त्व अगदीं निराळ्याच अर्थानं मला समजलं. मलमूत्रविसर्जनादि कार्य त्या टीचभर कोठडींत करावीं लागत असल्यामुळं मी शरीरानं तर नरकांत होतोंच, पण माझी मनोवृत्तिदेखील मुलांच्या आनंदाचा हेवा करण्याइतकी दूषित झाली होती. शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या मी अशुद्ध वातावरणांत होतों. मीं खूप विचार केला. मनुष्याच्या विचारशक्तींत एक प्रकारचं पावित्र्य आणि सत्त्वगुण सांठवलेला आहे. ज्या ठिकाणीं विचाराचा शिरकाव झाला तिथून तमोगुणाचं उच्चाटन झालंच पाहिजे, ह्या सिद्धान्ताची सत्यता मला त्या दिवशीं चांगली पटली. हळूहळू मनावरील उदासीनतेचं पटल दूर होत गेलं. प्रातःकालच्या प्रसन्न वातावरणाचा देखील परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं आणि खोलीचा दरवाजा उघडण्याकरितां शिपाई आला तेव्हां माझं मन चांगलं प्रसन्न होतं. नरकचतुर्दशीचा सण शरीरानं आणि मनानं शुद्ध होऊन साजरा करण्याचं मीं ठरवलं होतं.

झटकन् बिस्तरा गुंडाळून मी बाहेर पडलों. बिस्तरा नेहमींप्रमाणं एका ओळींत ठेवून मी नळाकडे चाललों होतों. इतक्यांत समोरून इब्राहिम आला आणि ' वकीलसाहेब, दिवाळी मुबारक ' म्हणून मोठ्या प्रेमानं त्यानं माझ्याशीं हस्तांदोलन केलं. ( दिवाळीचा सण तुम्हांला आनंदाचा जावो असं याचं रूपांतर केलं तरी चालेल. इंग्रजींतील Happy New Year सारखाच हा वाक्प्रचार आहे. ) ' शुक्रीया दोस्त ' ( मी तुझा आभारी आहें ) म्हणून मी आपल्या कामाला गेलों. कोणाला असं वाटण्याचा संभव आहे,

कीं हें सर्व औपचारिक असेल; पण ती समजूत चुकीची आहे. आपद्ग्रस्त लोकांमध्यें जो एकोपा पहावयास मिळतो तो इतरत्र अनुभवास येत नाहीं. तुरुंगामध्यें ही गोष्ट विशेष प्रामुख्यानं माझ्या दृष्टोत्पत्तीस आली. हिंदु-मुसलमान एरवीं किती भांडले तरी एकमेकांच्या उत्सवप्रसंगीं ते एक होऊं शकतात. त्यांनीं ' दिवाळी मुबारक ' म्हणून आमच्याशीं हस्तान्दोलन करावं; तर आम्ही ' ईद मुबारक ' म्हणून त्यांना प्रेमानं भेटावं. सुरतच्या हिंदुमुसलमानांच्या दंग्यांत जन्मठेपीची शिक्षा झालेले मुसलमान कैदी अशा प्रकारानं वागत असतांना मीं पाहिले आहेत. आहे त्यांत आपले सण साजरे करण्याची प्रत्येकाची इच्छा असते. हां, या सणांच्या निमित्तानें देखील एखादे वेळीं भांडणं होतात; पण तो नित्यक्रम नसून नैमित्तिकच समजला पाहिजे.

मीं दिवाळीचा सण साजरा करायचं ठरवलं; पण तुरुंगांत दिवाळी साजरी कशी करायची ? बाहेर लोक अभ्यंगस्नानं करतात, चांगले कपडे घालतात, सुग्रास अन्न खातात आणि सिनेमानाटकांसारखीं मनोरंजनाचीं साधनें त्यांना उपलब्ध असतात. सर्व धडपड असते ती आपल्याजवळ जें कांहीं उत्कृष्ट म्हणून असेल त्याचं प्रदर्शन करावयाची ! आतां जेलमध्यें हें कसें काय जमावं मी प्रातर्विधि आटोपून थंड पाण्यानं यथेच्छ स्नान केलं. अर्थात् कायद्याप्रमाणं हें होऊं शकणार नाहीं; पण कायदा मनुष्य करीतच असतो आणि त्याची अंमल बजावणी करणारे अधिकारी-मग ते जेलचे निर्दय अधिकारी का असेनात जोंपर्यंत मनुष्य कोटींतील आहेत, तोंपर्यंत कायदा थोडाफार आपल्याला वाकवतां येतोच. असो. थंड पाण्यानं दिवाळीच्या दिवशीं स्नान ! घरीं असं कोणीं करूं दिलं असतं कां ? लहानपणीं एकदां दिवाळीच्या अभ्यंगस्नानानंतर मी तापानं आजारी पडलों होतों त्या वेळीं माझ्या भावंडांनीं माझी खूप चेष्टा केली, ' दोन घंगाळ पाणी जास्त घेतल्याबरोबर ताप आला म्हणे ! ' थंड पाण्यानं स्नान करतांना मला त्या गोष्टीची नेहमीं आठवण होई आणि वाटे, कीं आतां ती मंडळीं हें दृश्य पहायला असती तर काय

मैाज झाली असती ? पण कुठं होती ती मंडळी ! त्यांपैकीं कांहींनींतरी माझी कायमची रजा घेतली आहे आणि आहेत तीं तुरुंगांत येऊन माझं कौतुक कसं करणार ?

दिवाळी म्हटली कीं सुवासिक तेलं अन् अत्तरं आलींच पाहिजेत असा जणूंसंकेतच ठरलेला आहे. पण तुरुंगांत कोठलीं अत्तरं आणि तेलं? तरीपण दिवाळींत अत्तर नाहीं म्हणजे काय ? त्यांतच भानगडी करून कांहीं 'पटेल' लोक अत्तरं मिळवतातच. दिवाळीच्या दिवशीं कांहीं ठराविक 'पटेलां' च्या जवळ अत्तार इटकून निघायचंच ! (पटेल म्हणजे तुरुंगांत देखील जी मंडळी थोडीफार 'माया' जवळ बाळगतात असे लोक ). खाण्याच्या बाबतींत म्हणावं तर पंचपक्वान्नं जेलमधें थोडींच मिळणार ! तरीपण त्यांतल्या त्यांत आम्ही सण साजरा करतों.

रविवारचा गूळ दिवाळीच्या दिवशीं देण्याची अधिकाऱ्यांनीं मेहरबानी केली तर फार मोठं कार्य झालं. कायदेशीर रीत्या थोडा गूळ मिळाला म्हणजे त्याच्या भरीला अन्य मार्गांनीं आणखी आणतां येतो. दहाबारा मंडळींनीं आपल्या ज्वारीच्या भाकरी कुसकराव्या, त्यांतच वॉर्डरांच्या गव्हाच्या पोळ्या मिसळाव्या आणि त्यांत गूळ घालून त्याचे लाडू करावे असा सामान्य नियम. एकदोन वार्डर अशा प्रसंगीं आपली एक गव्हाची रोटी आणून मला देत. प्रथम प्रथम मला संकोच वाटे; पण नाहीं म्हणावं तर त्यांना वाईट वाटे. म्हणून ती घेण्याचंच मीं ठरवलं आणि सर्वांनीं एकत्र जेवण करावं असा प्रघात पाडला. गूळ मिसळून केलेले ते लाडू आम्हांला फार गोड लागत. चारचौघांनीं एकत्र बसून हास्यविनोद करीत जेवण करावं यांत मोठी मौज आहे. सर्वांचीच परिस्थिति सारखी असल्यामुळं कोणाचंच कोणाला वैषम्य नाहीं. यावर कळस म्हणजे धूम्रपानाचा चढायचा. अर्थातच तो कायद्याच्या कक्षेबाहेर. खाकी कागदाची भली मोठी एक विडी तयार व्हायची आणि

इतिहासपूर्व काळांतील साधनांचा उपयोग करून— चकमकीनं— वान्हि प्रज्वलित करायचा. त्यांतल्या त्यांत जरा जास्त सन्मान्य अशा सभासदांस पहिला दम मारण्याचा मान मिळायचा. प्रथम प्रथम मला तसं करण्याबद्दल सांगण्यांत येई, पण त्यांच्याशीं एवढ्या एका बाबतींत मी समभागी होऊं शकत नव्हतों, किंवा तसें न करण्याचं मीं ठरवलं होतं. लाडवांच्या जेवणावर धूम्रपानाचा कार्यक्रम झाला म्हणजे सर्व यथास्थित झालं असं समजायला हरकत नाहीं. ती जर का उणीव राहिली, तर मग सर्व असून नसल्यासारखंच !

पण वर वर्णन करून सांगितलेला कार्यक्रम नेहमींच गुण्यागोविंदानं पार पडत असे असं कोणी समजेल तर तें चुकीचं आहे. मानवी स्वभाव हा सर्वांतोपरीं उदात्तच आहे असं नाहीं. आणि तुरुंगांत तर तसा तो रहाणं अशक्यप्रायच आहे. अशा प्रकारच्या सणावारीं कांहींकांहीं मोठे नमुनेदार प्रसंग आम्हांला पहायला मिळत. उद्यां दिवाळी म्हणून कोणीतरी तेलाची घाणी चालली असेल त्यांतून थोडंसं तेल काढून ठेवायचाच. कोणाला वाटेल, कीं डोक्याला लावण्यासाठीं म्हणून; पण तसं नाहीं. तिळाचं ताजं तेल वर वर्णन केलेल्या गुळाच्या लाडूंत घातलं म्हणजे मोठी बहार येते. अर्थातच ज्या कोणाला त्यांत हिस्सा मिळणार नाहीं किंवा ज्याला एकाद्याचा हेवादावा साधायचा असेल, त्यानं डोळा ठेवून अधिकाऱ्याकडे चुगली करावी हें साहाजिकच आहे. मग काय विचारतां ? एकच गोंधळ माजायचा ! वातावरण गरम व्हायचं आणि बाहेर आपल्या अगदीं शेजारी जरी खून झाला तरी जेवढी चर्चा व्हायची नाहीं तेवढी चर्चा व्हायची. एकामागून एकानें चुगलखोराची कठोर शब्दांनीं निर्भत्संना करावी आणि नीतिमत्तेवर मोठमोठालीं व्याख्यानं देऊन आपल्या सदसद्विवेकबुद्धीचं समाधान करून घ्यावं. अर्थातच निर्भर्त्सना करणारे स्वतः चुगली न करणारे असतात असं मानण्याचं मुळींच कारण नाहीं. मानवी जविन अशा प्रकारच्या विरोधांनीं भरलेलं एक कोडं आहे. माणसं प्रसंगानुरोधानं आपला जीव जगवण्यासाठीं

खोटं कसं बोलतात, चुगल्या करून स्वार्थ कसा साधतात, हें देखील पहाण्यासारखं असतं.

असो. या ठिकाणीं या विषयावर इतकं लिहिण्याचं कारण म्हणजे लेख वाचून कोणाचं असं मत होऊं नये, कीं तुरुंगांत अगदीं मनपसंत परिस्थिति असते. म्हणून वस्तुस्थिति त्यांच्याहून अगदीं निराळी असते असंच म्हटलं पाहिजे. तुरुंगांत राहिल्यानं मानवी मनाबद्दलचे भौतिकवाद्यांचे विचारच जास्त बरोबर आहेत असं वाटूं लागतं.

खाण्याजेवण्याचा हा प्रकार झाला. तुरुंगामध्यें याखेरीज आणखी काय करतां येण्यासारखं आहे ? तिथं मनुष्याजवळ त्याचं असं म्हणजे शरीर आणि मन हेंच काय तें असतं. सणावारीं आपलं व्यक्तिमत्व दाखविण्याचं साधन म्हणून त्याचाच उपयोग करणं अवश्य असतं आणि तसं प्रत्येक मनुष्य आपा-पल्या परीनं करीतहि असतो. कोणी पंजा लढवून (पंजांत पंजा अडकवून एक-मेकांची शक्ति अजमावण्याचा एक प्रकारचा बैठा खेळ) इतरांच्यावर आपलं वर्चस्व दाखविणार, तर कोणी गाणंबजावणं करून लोकरंजन करणार. एका कैद्याचा आवाज इतका गोड होता, कीं सुटीच्या दिवशीं सर्वांची त्याच्यावर मागणी असायची. पण जेलमध्यें वाटेल तिकडे फिरण्याची थोडीच परवानगी आहे ! ज्याला त्याचं गाणं ऐकायचं असेल, त्यानं जमादाराची मनधरणी करून किंवा अन्य प्रकारानं त्याला आणायचा; आणि तो आला म्हणजे एक उत्तर हिंदुस्थानी भय्या होता त्यालाही आणावा लागे. तो मडक्यावर ठेका फार उत्कृष्ट धरावयाचा आणि गंमत अशी कीं शेवटीं रंगांत आला म्हणजे तें फोडून टाकायचा. बस, असं झालं म्हणजे अगदीं कमाल झाली. एक गाणं संपलं म्हणजे लोकांनीं, ‘ वाह भाई वाह ! आज तो कमाल कर दिया.’ सगळ्यांत सांगण्यासारखी एक गोष्ट म्हणजे त्या गाणाराला अशा दिवशीं पैशाची कमाई देखील व्हायची. पुढें मला असं कळलं कीं, तो गाणारा कैदी आपल्या वर्षाच्या तंबाखूची तरतूद ईद आणि दिवाळीच्या सणांवर करीत असे.

आमची आणखी एक दौलत म्हणजे मनाची. आम्ही चारपांच सुशिक्षित कैदी होतों. एकदां आमच्यामध्यें असा प्रश्न निघाला, कीं आपण दिवाळीच्या दिवशीं काय करावं ? तेव्हां एकानं असं सुचवलं, कीं प्रत्येकानं कांहीं तरी लिहून दाखवावं. एकानं एक गोष्ट लिहिली; दुसऱ्यानं ' दिपवाळी ' म्हणून लघुनिबंध लिहिला. अजितसिंगानं मात्र एक गझल लिहून सर्वांच्यावर ताण केली. ' दिवाळीचे फटाके ' हा त्याचा विषय होता. एका मित्रानं विचारलं, 'अजित, आतां पुन्हां फटाके वाजवायला कधीं मिळतील !' त्यावर दिवाळीचं वर्णन करून शेवटच्या कवितेंत असं म्हटलं, कीं ' मला आतां फटाके वाजवायचे नाहींत. कारण मीं आयुष्याची दिवाळी एकच फटाका वाजवून साजरी केली आहे, ( कोर्टांत पिस्तूल झाडून माफीच्या साक्षीदाराला मारण्याचा प्रयत्न त्यानं केला होता. ) मला दिवाळी चांगली आठवते. कारण मीं आपल्या आयुष्यांत पहिली आणि बहुतकरून शेवटची अशी कविता लिहिली ती याच निमित्तानं.'

दिवाळीसारख्या सणाच्या निमित्तानं आणखी एक कार्यक्रम व्हायचा. कोणाचीं भांडणं असतील तर तीं त्या दिवशीं मिटवायचा प्रयत्न होत असे. साहेबानं किंवा कोणी मध्यस्थानं येऊन 'हाथमें साथ मिला देनेका' कार्यक्रम झाला म्हणजे भांडण मिटलं असं समजायचं. त्या दिवशीं त्यांनीं एके ठिकाणीं बसून खाल्लं म्हणजे तडजोडीवर सील झालं असं मानायला हरकत नाहीं. खरंच, अगदीं कौतुक करण्यासारखी गोष्ट नाहीं का ही ? तुरुंगांत देखील सणांचं केवढं महत्त्व हें ! कलह कोणालाच मनापासून नको असतो. सहवास आणि सलोखा हीच मानवी मनांतील प्रभावी भावना आहे. इष्टमित्रांच्या प्रेमळ सहवासांतून हंसून खेळून दिवस काढावे असं कोणाला वाटत नाहीं ? तरीपण आजची जागतिक परिस्थिति मोठी विचित्र आहे. आज मानव्याचा कायदा नसून जंगलाचा कायदा अस्तित्वांत आहे आणि त्यामुळं कलह अपरिहार्य आहे. विश्वाचं संगीत कलहामुळं कर्कश झालं आहे. या अंधार-

नगरींत थोडासा प्रकाश आणावा, कर्कश गीतामध्यें थोडंसं मार्दव आणावं, म्हणूनच मनुष्यानं दिवाळीसारखे सण शोधून काढल्यासारखे वाटतात.

बाकी एका दृष्टीनं तुरुंगांतली दिवाळी म्हणजे जगाविराहितच. कारण दिवाळी म्हणावयाची आणि त्यांत दिव्यांचा अभाव असायचा ! ज्या वेळीं खरी दिवाळी असायची म्हणजे सर्वत्र दिवे लागायचे, त्या वेळीं आम्ही अंधाऱ्या कोठडींत पडून रहायचं ! दूरवर एकादा बाण सरकन् आकाशांत उंच जातांना दिसायचा. थोडा वेळ आपला प्रकाश पाडून तो खालीं यायचा. आपलं जीवनदेखील या बाणासारखंच नाहीं का ? सर्व शक्ति एकवटून आपण त्या बाणाप्रमाणं उंच भरारी मारायचा प्रयत्न करीत आहों; पण शेवटीं बाणाप्रमाणंच आपली गति होणार नाहीं कशावरून ? असे विचार मनांत येऊं लागले म्हणजे मन थोडंस उदास होई. मनामधें ध्येयज्योति सारखी तेवत नसेल तर तुरुंगांतल्या या आंधळ्या दिवाळींत मौज वाटणार नाहीं. एकदां असाच विषण्ण मनस्थितींत बसून मी बाहेर आकाशांत उंच जाणाऱ्या बाणाकडे पहात होतों. पहारेवाला आला आणि मला विचारमग्न पाहून म्हणाला,

'क्यूं वकीलसाहब, क्या सोच रहे हो ?' (कसला विचार करीत आहां ?)

'कुछ नहीं. ऐसाहि बैठा हूं.' (कांहीं नाहीं, असाच बसलों आहे.) मी टाळाटाळी करण्याच्या उद्देशानें म्हणालों.

'अजी नहि जी. आप तो सोचते होंगे कि अगर इस वक्त बाहर होता तो मोटरमें सैर करने जाता यार दोस्तोंके साथ, और रोशनीकी मजा देखता. लेकिन आज इस अंधेरेमें पडा हूं.' (छे, छे. तुम्ही म्हणत असाल, कीं आतां बाहेर असतों तर इष्टमित्रांबरोबर मोटारींतून फिरायला गेलों असतों; व रोषणाईची मजा पाहिली असती. पण आज या अंधारांत खिचपत पडलों आहे.)

'अरे भाई, क्या उटपटांग बातें करते हो ? मैं बिलकूल गरीब आदमी

हूं. मुझे मोटर कैसे मयस्सर होगी ?' (अरे, काय उगाच कांहींतरी बोलतो आहेस ? मी अगदीं गरीब मनुष्य आहें, मला मोटर कशी मिळेल ?)

'यह तो आपकी कसर नफसी है. (हा आपला विनय आहे.) अच्छा. वकीलसाहब, मैंने कभी आपसे पूछा नहिं, लेकिन, आज पूछता हूं, क्या आप सिगरेट पीयेंगे ?' (ठीक आहे, मीं आजपर्यंत तुम्हाला कधीं विचारलं नव्हतं, पण आज विचारतों, आपण सिगरेट ओढाल का ?)

'रामावतार, मैं तुम्हारे इस मोहब्बत के लिये बहोत एहसानमंद हूं. लेकिन मैं सिगरेट नहिं पीता.' (रामावतार, तुझ्या ह्या स्नेहाबद्दल मी तुझा फार आभारी आहें. पण मी सिगारेट ओढीत नाहीं.) मी म्हणालों.

मी 'नाहीं' म्हटलं म्हणून त्याला वाईट वाटलेलं दिसलं. मीं म्हटलं, किती प्रेमळ मनुष्य आहे ? मी एक सुशिक्षित तरुण विडी कशी ओढणार, मला सिगरेटची संवय असणार म्हणून मुद्दाम त्यानं सिगरेट आणली होती. एकदां वाटलं, काय बिघडलं असतं ओढली असती तर ? त्याला तर बरं वाटलं असतं! माझ्याबद्दलचा त्याचा आपलेपणा पाहून मला हुरूप वाटला. आपलं आयुष्य त्या दारूच्या बाणासारखं असलं तरी कांहीं हरकत नाहीं. वर जातांना तरी तो लोकांना आपला मार्ग दाखवतो ना ? खालीं येतांना कोणाच्या नजरेंत येत नाहीं. तेंच चांगलं. मानवी जीवन त्या बाणाइतकं जरी यशस्वी झालं तरी मला समाधान आहे.

## त्यांच्या गांवींहि नाहीं! ३

एका महत्त्वाच्या सभेसाठीं मी रत्नागिरीला गेलों होतों. सभा संध्याकाळीं होती, पण मुंबईच्या बोटीनं मी सकाळींच बंदरावर येऊन उतरलों. हेतु असा कीं, सभेपूर्वी स्थानिक कार्यकर्त्यांबरोबर चांगला विचारविनिमय करतां यावा. पण किनाऱ्यावर उतरल्यावर मीं सभोंवार नजर फिरविली आणि अचानक आमच्या गांवचा डोंगर माझ्या दृष्टीस पडला. माझी दृष्टि बराच वेळपर्यंत त्यावर खिळून राहिली. गतकालांतील सर्व सुखदुःखांचे प्रसंग आणि लहानपणच्य आठवणींनीं मन उचंबळून आलं आणि एकाकी आपल्या गांवीं जाण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली. मला नेण्यासाठीं बंदरावर आलेल्या माझ्या स्नेह्याला मीं म्हटलं, " हें पाहा, सभा आहे संध्याकाळीं, तोंपर्यंत मी घरीं जाऊन येतों आमच्या. "

" आज रे कुठला एवढा पान्हा फुटला घराचा ? " त्यानं चेष्टेच्या स्वरांत विचारलं. मी उगाच कांहींतरी बोलतों आहे अशी समजूत झाली असावी त्याची. पण वस्तुस्थिति तशी नव्हती. मी खरोखरच आपल्या गांवीं जाण्यास अधीर झालों होतों. आणि सर्वांनीं मोडता घातला तरी मी गेलोंच आपल्या घरीं. त्यांना मोठं आश्चर्य वाटलं आणि तें साहजिकच होतं. अनेक वेळीं रत्नागिरीस येऊन देखील अवघ्या पांच मैलांवरच्या आपल्या गांवीं कधीं न जाणारा हा प्राणी आजच इतका अधीर कां झाला ? त्यांनाच्नसं काय पण माझं मला देखील क्षणभर आश्चर्य वाटलं. गतायुष्याचा चित्रपट डोळ्यापुढं उभा राहिला.

आम्हीं घर सोडून आल्याला उणींपुरीं पंधरा वर्षं झालीं; पण एवढ्या अवधींत मी एकदांहि घरीं गेलों नव्हतों. त्या वेळीं मी बारातेरा वर्षांचा असेन. त्या प्रसंगाची मला चांगली आठवण आहे. कोंकणांतील यःकश्चित् खेडं तें. देशावरच्या शहराच्या मानानं तिथं काय होतं ? तरीपण तें सोडून येतांना मला अतोनात दुःख झालं. मीं स्वतः ज्यांना पाणी लावलं अशीं नुकतींच लागाला आलेलीं नारळीपोफळींचीं झाडं, रायवळ आंबे, कलमी आंबे, फणस— सर्व कांहीं जागच्या जागीं सोडून आम्ही देशावर आलों. माझ्या शाळूसोबत्यांचा निरोप घेतांना मला गहिंवर आला.

पण मानवी मन मोठं विचित्र आहे. अगदीं अल्पावकाशांतच मला त्या वैभवाचा विसर पडला. एका अगदीं संकुचित क्षेत्रांतून विस्तृत क्षेत्रामध्यें मीं प्रवेश केला. तोंपर्यंत आमच्या गांवाबाहेरच्या जगाची मला विशेषशी कल्पनाहि नव्हती. आमचं गांव हेंच जग आणि त्यांत मला समाधानहि वाटत असे. क्वचित् प्रसंगीं बाह्यजगाची आवश्यकता भासे, पण फारच थोडा वेळ; दिवाळी आली म्हणजे फटाक्यांची आठवण होऊन माझं मन पुण्या-मुंबईचीं काल्पनिक चित्रं रंगविण्याचा प्रयत्न करी; पण वडील भावानं घरीं येतांना ते आणले म्हणजे तो प्रश्न निकालांत निघे. त्या जगांत प्रत्यक्ष

पाय ठेवल्याबरोबर माझी दृष्टि फाकली. नव्यानव्या इच्छा-आकांक्षांनीं मनाचा ताबा मिळविला. पूर्वी कधीं स्वप्नांतही आल्या नसतील अशा गोष्टींबद्दल आसक्ति उत्पन्न झाली आणि त्या मिळविण्यासाठीं माझी धडपड सुरू झाली. भुकेलेल्यानं अन्नाचा पाठलाग करावा त्याप्रमाणं मी त्यांचा पाठलाग करूं लागलों. नेहमींच माझ्या प्रयत्नांत यश आलं असं नाहीं. मार्गामध्यें अनेक अडचणी उपस्थित होत, पण त्यांच्याशीं झगडण्यांतच मनाला एक प्रकारें समाधान होऊं लागलं. जीवन पूर्वींपेक्षां जास्त समृद्ध झाल्याचं प्रत्ययास आलं. कर्मभूमीपुढं जन्मभूमि अगदीं मागं पडली. “ काहो, तुम्हाला आपल्या गांवीं जावंसं नाहीं का वाटत ? ” असं माझे इष्टमित्र मला विचारीत. “ ठेवलं आहे काय त्या भिकार कोंकणांत ? ” मी उद्दामपणानं उत्तरादाखल प्रश्न करी. असं असूनहि आज मला घरीं जाण्याची तीव्र इच्छा झाली. कां बरं ?

या प्रश्नाचं अचूक उत्तर देणं कठीण आहे. मानवी मनामध्यें कायकाय हेतु दडलेले असतील, हें कुणीं सांगावं ? पण एक गोष्ट मात्र खरी, कीं त्या वेळीं मी अशा कांहीं मनःस्थितींत होतों कीं मला एकटेपणाचा अगदीं कंटाळा आला होता. कोणाचा तरी सहवास घडावा असं वाटत होतं, कोणीतरी आपल्याबद्दल सहानुभूति दाखवावी अशी अपेक्षा होती. गांव पाहिल्यावर साहजिकच माझ्या लहानपणच्या सोबत्यांची मला आठवण झाली. सहानुभूतीच्या अपेक्षेनं आणि प्रशंसेच्या लोभानं माझ्या मनानं तिकडे ओढ घेतली. आपल्या सोबत्यांनीं आपल्या कष्टमय जीवनाबद्दल सहानुभूति दाखवावी आणि कर्तबगारीचं कौतुक करावं असं कोणाला वाटणार नाहीं ?

मनुष्यप्राणी प्रशंसेचा आणि सहानुभूतीचा किती भुकेला आहे ? किंबहुना शरीरपोषणास लागणाऱ्या अन्नपाण्याच्या खालोखाल इष्टमित्रांच्या सहानुभूतीवरच तो जगत असतो, असं म्हणायला हरकत नाहीं. सामाजिक जीवनाची त्याला फार आवश्यकता आहे असं आपण म्हणतों त्याचं कारण तरी

दुसरं काय असूं शकेल ? सुखदुःखामध्यें इतरांनीं सहभागी व्हावं असं आपल्याला वाटत असतं म्हणून तर आपल्याला समाज हवासा वाटतो. आतां ही गोष्ट मात्र खरी, कीं हा अनुभव केवळ शब्दार्थानं समाजांत राहूनहि होणार नाहीं. कित्येक वेळीं समाजांत राहूनहि मनुष्याला एकटे-पणाचे कष्ट सहन करावे लागतात आणि त्याच्या उलट समाजापासून अगदीं दूर अशा तुरुंगाच्या कोठडींत राहून देखील त्याला सामाजिक जीवनाचा अनुभव घेतां येतो. तुरुंगांत असतांना पत्रद्वारां माझ्यावर सहानुभूतीचा आणि प्रशंसेचा जो सरसहा वर्षाव होत असे, त्याची आठवण झाली म्हणजे मला कित्येक वेळीं असं वाटूं लागतं, कीं तुरुंगा-बाहेर स्वतंत्र जीवनापेक्षां आंतील बंदी-जीवनच जास्त सुखप्रद होतं. असो.

मोटारींत बसून मीं आपल्या गांवचा रस्ता धरला. एकामागून एक ओळ-खीचीं स्थळं दिसूं लागलीं. पूर्वायुष्यांतल्या स्मृति जागृत झाल्या. अडचणीं-तून मार्ग काढून पुढं सरकलं म्हणजे पूर्वींच्या अडचणींच्या आठवणीनं देखील एक प्रकारची सुखसंवेदना होते. पण तेंहि माझ्या बाबतींत पूर्णपणें शक्य नव्हतं. माझं सुख दुःखमिश्रित होतं. कारण ज्यांच्याबरोबर मी खेळलों, बागडलों, भांडलों, त्या माझ्या बालमित्रांपैकीं बरेचसे अल्पवयांत मला सोडून गेले आहेत, या गोष्टीची मला विस्मृति पडणं शक्य नव्हतं. अशा मनः-स्थितींतच मी गांवांत आलों. एका मित्राच्या घरीं जाण्याचा विचार केला. मीं त्याला ओळखलं; पण मी अचानकपणें आलों असल्यामुळं मला तो ओळखूं शकला नाहीं. माझ्या शरिराची त्याला ओळख पटली; पण माझ्या हृदयाची पटणार होती का ? मी राहणार नसून लगेच जाणार आहे हें ऐकून त्याला वाईट वाटलं. त्यानं पाडाच्या आंब्यांची एक टोपली माझ्यापुढं आणून ठेवली. एकामागून एक आंबे माझ्या ओळखीचे निघाले आणि आम्हीं लहानपणच्या मौजा आठवून खूप हास्यविनोद केला. किती विचित्र आहे मानवी जीवन ! सकाळीं लवकर उठून शेजाऱ्याच्या आंब्याखालीं जाऊन

आंबे गोळा करून आणायचे हा आमचा लहानपणीं एक उद्योग असे आणि त्यामुळं आमचीं कडाक्याचीं भांडणं होत असत. आज तेच आम्ही त्याच झाडांचे आंबे एकत्र बसून खात होतों आणि कोया आगरांत भिरकावून देत होतों.

" पण काय रे, तूं हल्लीं उद्योग काय करतोस ? वकिलीची परीक्षा दिलीस असं एकदा ऐकलं होतं ! " जनार्दनानं प्रश्न केला.

" छे रे बाबा, वकिली वगैरे कांहीं करीत नाहीं. हेंच आपलं कॉंग्रेसचं काम करतों. " मीं म्हटलं.

" तें आहे रे ठाऊक आम्हांला. खोतांच्याकडे केसरी येतो, त्यांत आम्ही वाचतों तुमच्या चळवळींची माहिती कधीकधीं. तूंच ना एकदा त्या महारड्यांना घेऊन देवळावर सत्याग्रह केला होतास ? " त्यानं किंचित् तिरस्कारानं विचारालं.

'महारडा' हा शब्दप्रयोग ऐकून मला अवघड वाटलं; पण आश्चर्य वाटलं नाहीं. कारण कोंकणामध्यें अस्पृश्यवर्गाला माझ्या लहानपणीं ज्या प्रकारें वागविण्यांत येत असे, त्याच्याशीं तुलना करतां हा शब्दप्रयोग अगदीं सामान्य होता. अर्थात् पंधरा वर्षांनंतरहि तीच परिस्थिति कायम राहावी याबद्दल मात्र मला वाईट वाटलं. अस्पृश्य हा प्रयोग अनादराचा वाटल्यामुळं गांधीजींनीं त्यांना हरिजन म्हणायला सुरवात केली, तरी यांच्या तोंडी 'महारडे' हा शब्दच कायम राहावा याचं मला आश्चर्य वाटलं ! मीं माझा दृष्टिकोन पटवून देण्याचा प्रयत्न केला, जीवनमूल्याची महति वर्णन केली—आणि पुष्कळशा वादविवादानंतर त्याला माझं म्हणणं पटल्यासारखं दिसलं. मला समाधान झालं. पण लगेच त्यानं विचारलं,

" अरे, इतकं आकांडतांडव करतोस त्याबद्दल कॉंग्रेस रुपये तरी किती देते तुला ? "

" रुपये कसले ! कॉंग्रेसमध्यें पगार वगैरे कांहीं मिळत नसतो. आपल्या

समाधानासाठीं करायचं असतं हें." मी थंडपणानं बोलून गेलों.

"हात्तेच्या! मग रे काय फायदा? धर्माविरुद्ध वागायचं आणि फायदाहि नाहीं हें नाहीं बुवा आपल्याला पसंत!" त्यानं सहजगत्या आपलं मत मांडलं.

"जनू, पैसा मिळविण्यांतच का सुख आहे?" मीं म्हटलं.

"मग कशांत आहे? अरे, तुझ्याजवळ चार पैसे असले तर तुला कोणी विचारतील; नाहींतर ढुंकूनदेखील पाहाणार नाहींत! ज्यांच्याजवळ थोडीफार माया आहे अशीं माणसं तुमच्या चळवळींत आलीं म्हणजे तुम्ही कोणीकडच्या कोणीकडे पडून जाल. पाहा पाहिजे तर अनुभव घेऊन. आणि तें एक वेळ सोडलं तरी तुझा चरितार्थ तरी कसा चालतो अशा परिस्थितींत?" त्यानं अगदीं सहजासहजीं प्रश्न केला.

हा प्रश्न मला आजपर्यंत कितीजणांनीं विचारला असेल याची मोजदाद करतां येणार नाहीं. माझं मन उदास झालं. मोठ्या उमेदीनं मी त्याच्याकडे गेलों होतों; पण माझी निराशा झाली. त्या बाबतींत आणखी कांहीं बोलावं असं सारखं वाटत होतं, पण इतक्यांत मोटारीचा हॉर्न ऐकूं आला. वरच्या घाटीवर येऊन महारानं आरोळी दिली. मी जनूचा निरोप घेऊन घाटी चढत वर गेलों आणि म्हटलं "अर्जुना, अरे खालीं कां नाहीं आलास?" तो म्हणाला, "भाऊ तुमच्या शहरांत चालतं तें; पण इकडे कसं चालेल?" मी गप्प बसलों. मोटारींत चढतांचढतां त्याच्या हातावर पोस्ताला म्हणून आठ आण्याचे पैसे ठेवले "बरं आहे भाऊ रामराम!" तो म्हणाला, आणि मोटार चालू झाली.

मी केवढ्या उमेदीनं गेलों होतों आणि मला अनुभव काय आला? मला वाईट वाटण्याऐवजीं हसूंच आलं. मीं म्हटलं या लोकांचं जगच निराळं आहे. बऱ्या वाईटाच्या यांच्या कल्पनाहि आपणांपेक्षां भिन्न आहेत. आपल्या कल्पना एकदोन तासांत त्यांना पटवून देण्याच्या अट्टाहास बाळगण्यांत

काय हंशील आहे ? हरिजनांच्या बाबतींत बराच वेळ चर्चा केल्यावर जनार्दनाची समजूत पटल्याचा मला नुसता भास झाला होता. मला हें कार्य करण्याबद्दल कॉंग्रेसकडून कांहींतरी चांगला पगार मिळत असावा अशा कल्पनेनं त्यानं प्रेमाखातर आपला विरोध काढून घेतला होता इतकंच. पैशाशिवाय जगांत दुसरं कांहीं नाहीं. पैसेवाल्यांनाच जगांत मानमरातब आणि सुख मिळतं हा त्याचा सिद्धांत होता. आणि तसं पाह्यलं तर हें उघडंनागडं सत्यच नाहीं का ? ज्या गोष्टीचा अनुभव घेण्याचा त्यानं मला उपदेश केला; ती गोष्ट रोजच्या परिचयाची नाहीं का ? त्याला तसं वाटलं तर त्याच्यावर नाराज होण्यांत काय हंशील ? अशा प्रकारच्या घटनांनीं आपलं मन नाहीं का अस्वस्थ होत ? आपल्याजवळ पैशाचं बळ नाहीं त्यामुळं आपल्या कर्तबगारीला वाव मिळत नाहीं असं वारंवार मला वाटत असतं, मन उद्विग्न होतं, अंगाचा तडफडाट होतो ! मग जनूला तसं वाटलं तर त्यांत आश्चर्य काय आहे ?

आश्चर्य कांहींच नाहीं. पण त्यांच्या सवालाचं उत्तर काय ? पैशावर जर सर्व गोष्टी अवलंबून आहेत तर भल्याबुऱ्या मार्गांनीं पैसा कां मिळवूं नये प्रथम ? मजजवळ थोडेसे पैसे असते म्हणजे माझं चालतं कसं हा प्रश्न तरी कोणीं केला नसता. बाकी या बाबतींत लोकांची जिज्ञासा फार दांडगी. हा प्रश्न विचारणारे कांहीं लोक खरोखरच सद्बुद्धीनें विचारतात हें मला ठाऊक आहे. कोणाच्या मनांत कांहीं मदत करण्याची इच्छा असते, तर कोणी आपण चळवळींत पडलों म्हणजे आपलं कसं होईल हें जाणण्याच्या बुद्धीनं विचारीत असतो. पण अशी मंडळी फार थोडी ! पुष्कळसे लोक केवळ छद्मीपणानंच विचारीत असतात. ज्याअर्थीं तुम्ही कांहीं उद्योग करीत नाहीं त्याअर्थीं तुम्ही फंडगुंडी करीत असलं पाहिजे असाच अर्थ त्यांच्या प्रश्नांत अभिप्रेत असतो. पैसा आणि त्यापासून मिळणारीं सुखं हेंच ज्यांनीं आपलं आदिदैवत ठरवलं असलं त्यांना असं वाटणं अगदीं साहजिक आहे.

मनुष्य कांहीं आकाशांतून पडत नाहीं. त्याला आईबाप, इष्टमित्र असतात आणि त्यांचं प्रेम केवळ पैशावरच अवलंबून नसतं या गोष्टीची त्यांना जाणीव नसते. जनार्दनानं उपस्थित केलेल्या प्रश्नाचं उत्तरहि यांत मिळण्यासारखं आहे. मी आज पैसे मिळविण्याचा उद्योग करीत नसूनहि माझं चाललं आहे, एवढ्या एकाच गोष्टीवरून पैसा म्हणजेच सर्वस्व हा सिद्धांत खोटा पडत नाहीं का? असं असूनहि त्याच्या प्रश्नानं मला थोडा वेळ तरी भांबावून सोडलं; आणि त्याचं कारण म्हणजे मला माझं चालावं एवढीच अपेक्षा नसून मानमरातबाची व प्रशंसेची अभिलाषा आहे.

मीं मनांत म्हटलं, कीं एवढं करून आपल्या मनाला शांतता नाहीं हें खरं ना! मग तो म्हणतो त्याप्रमाणं मानमरातबाचीं साधनं हस्तगत करण्याचा प्रयत्न कां करूं नये? पण हा विचार फार वेळ टिकला नाहीं. कारण एक तर तीं साधनं भल्याबुऱ्या मार्गांनीं हस्तगत करणंहि सोपं नाहीं आणि एक वेळ तें शक्य झालं तरी आपल्या मनाला समाधान होईल हें कशावरून? पैसा मिळाला तर सर्व लोक येतील आपल्याकडे हांजीहांजी करीत; लोकांच्या दृष्टीनं आपण फार मोठे होऊं; पण आपल्या दृष्टीन होऊं असं नाहीं. जगाला फसवलं तरी स्वतःला फसवणं कांहीं सोपं नाहीं. आणि तें जमलं नाहीं तर हातचं सोडून पळत्याच्या पाठीस लागल्यासारखं होईल. मीं आपला पराजय कबूल केला. त्यानं सांगितलेल्या मार्गाचा अवलब करणें आपल्याच्यानं होणार नाहीं हें मला कळून चुकलं. वास्तविक पाहतां हा कांहीं पराजय नाहीं. जीवनाचा दृष्टिकोनच भिन्न असल्यामुळं विचारसरणींत हा फरक पडत आहे. पैसे मिळविण्याच्या प्रयत्नांत अपयश येईल म्हणूनच मी तो मार्ग सोडून देत आहें, ही गोष्ट खरी नाहीं. कारण यशापयशावर जीवनाचं सार्थक अवलंबून नाहीं. नुसतं झगडण्यांतहि एक प्रकारचा आनंद आहे. परिणामावरच तो सर्वस्वीं अवलंबून नाहीं. जीवनाचीं मूल्यं काय या मूलभूत प्रश्नावरच आमचा मतभेद होता. आपण ज्या गोष्टीचा विचार

करतों, जीं सुखस्वप्नं पाहातों त्यांचा त्याला गंधहि नव्हता. त्या गोष्टी त्यांच्या गांवींहि नव्हत्या ही गोष्ट माझ्या लक्षांत आली.

पण एखादी गोष्ट बुद्धीला पटली तरी हृदयाला रुचत नाहीं. माझ्या धडपडीबद्दल माझ्या गांवच्या लोकांनीं सहानुभूति दाखवावी अशी माझी अपेक्षा होती. पण माझा मार्ग ज्यांना पटत नव्हता त्यांना त्याबद्दल सहानुभूति कशी वाटणार? आपल्याहि मनाचं समाधान करणं आणि सरसकट सर्वांची सहानुभूति मिळवणं ही गोष्ट अशक्यप्राय आहे. पण तिचा लोभ कांहीं सुटत नाहीं. मीं खूप विचार केला, मनाची समजूत घालण्याची पराकाष्ठा केली, पण व्यर्थ! शेवटीं असं वाटलं, कीं नुसता विचार करून हा प्रश्न सुटण्यासारखा नाहीं. या कोड्यांतून सुटका करून घेण्याचा एकच एक उपाय म्हणजे आपल्या आवडीच्या एखाद्या कामांत मन गुंतवून टाकणं. आणि शेवटीं त्याच उपायाचा मीं अवलंब केला. रत्नागिरीस पोंचल्यावर व्याख्यानाचा आणि चर्चेचा कार्यक्रम होतांच त्या चक्रांत एकदां पट्टा अडकवून दिल्याबरोबर यंत्राप्रमाणं सर्व कार्य सुरळीत चालू झालं.

## मी हरिजन असतों तर ! ४

" ब्रिटिश साम्राज्यवाद हा आमचा शत्रू नसून मित्र आहे. सवर्ण हिंदु हेच आमचे खरे शत्रू आहेत. " एका सुशिक्षित हरिजनबंधूंनीं माझें बोलणें मध्येंच थांबवून अगदीं मोकळ्या मनानें पण जड अंतःकरणानें सांगितलें.

हरिजनांच्या प्रश्नाबाबत आम्ही चर्चा करीत होतों. ब्रिटिश साम्राज्यशाही हेंच आजच्या हलाखीच्या परिस्थितीचें मुख्य कारण असून हरिजनांसकट सर्व दलितवर्गांनीं प्रथम एक साम्राज्यविरोधी मोर्चा निर्माण करून आपलें राजकीय स्वातंत्र्य मिळविलें पाहिजे, ही विचारसरणी त्यांच्या मनावर ठसविण्याचा मी प्रयत्न करीत होतों. माझ्या बोलण्यांतील मथितार्थ लक्षांत येतांच आरंभीं दिलेलें विधान करून त्यांनीं मला अडविलें. क्षणभर मी अगदीं स्तब्ध राहिलों. " सवर्ण हिंदु हे आमचे शत्रू आहेत " या विधाना-

बद्दल मला आश्चर्य वाटलें नाहीं. कारण तें कठोर असलें तरी त्यांत पुष्कळच सत्यांश आहे. पण " साम्राज्यशाही सरकार आम्हांला मित्राच्या जागीं आहे " हा विचार मला नवीन होता, आणि तो मंजूर करण्यास माझें मन तयार होईना ! मी बुचकळ्यांत पडलों असून मला त्यांचें म्हणणें पटलें नाहीं असें ओळखून ते म्हणाले, " तसं कशाला ! मी तुमच्यापुढं एक उदाहरणच ठेवतों. ती एक घडलेली गोष्ट आहे. ती ऐकल्यावर तुम्हाला माझं म्हणणं पटतं का पाहा. "

त्यांनीं जी गोष्ट सांगितली ती ऐकून अंगावर शहारे आले ! मनाला अत्यंत खेद झाला. कॉलेजचें शिक्षण घेतलेल्या एका हरिजन तरुणास सरकारी न्यायखात्यामध्यें नोकरी लागली. कांहीं दिवस जिल्ह्याच्या ठिकाणीं काम केल्यावर त्याची एका तालुक्याच्या गांवीं बदली झाली. भाड्याच्या मोटारमधून खालीं उतरल्यावर त्यानें स्टँडवरच्या एका पोलीस शिपायाजवळ " कोर्ट कुठं आहे ? " म्हणून चौकशी केली. शिपाईबाबांनीं त्यांचें नांवगांव विचारलें. तरुणानें आपलें आडनांव " महार " असें सांगतांच शिपाईबाबांच्या चर्येत एकदम फरक पडला ! त्यांची मान किंचित् ताठ झालेली दिसली. त्यांनीं त्या हरिजन तरुणाला एक वेळ पायांपासून डोक्यापर्यंत न्याहाळून पाहिलें आणि किंचित् तुच्छतेनें म्हटलें, " वा राव ! रुबाब तर खूप केलाय् कीं ! " आपण एका तरुणाच्या हृदयावर जखम करीत आहोंत याची त्याला जाणीव नव्हती. जाणीव कशाला असेल ? आपण उच्च जातींतले आहोंत या विचारानें त्याचें मन कलुषित होतें आणि क्षुद्रपणा नष्ट करून उदात्त विचार निर्माण करण्याइतकें शिक्षणहि त्याला मिळालेलें नव्हतें. हरिजन तरुणाचा पोषाख नीटनेटका आणि एका सुशिक्षित व सुसंस्कृत तरुणाला साजेसा होता. पण एका महारानें नीटनेटका पोषाख करावा ही गोष्टच त्या उच्चवर्णीय पण असंस्कृत आणि अशिक्षित शिपायाला रुचली नाहीं.

स्वागताला अशा प्रकारें सुरवात झाल्यावर एकंदर आदरातिथ्य कसें झालें

असेल त्याचें विस्तरशः वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. भाडें देऊन देखील राहण्यासाठीं चांगलीशी एखादी जागा द्यायला कोणी तयार होईना; जेवण तर दूरच राहिलें; पण हॉटेलमध्यें बाकावर बसून इतरांसारखा निवान्तपणें चहा पिण्याची देखील त्याला मनाई होती. बाहेरच्या एका फळकटावर हरिजनांच्यासाठीं खास राखून ठेवलेल्या अगदीं गलिच्छ परिस्थितींत असलेल्या फुटक्यातुटक्या एकदोन कपबशा होत्या. कायदेकौन्सिलमध्यें जर हरिजनांसाठीं राखीव जागा तर हॉटेलमध्यें राखीव कपबशा कां नसाव्या ? कपबशांकडे पाहूनच चहा पिण्याची त्याची इच्छा निवाली. सगळ्यावर कळस म्हणजे त्यानें पायखाना कोणता वापरावा हादेखील एक प्रश्नच होता. दररोज हरिजनांकडून आपला पायखाना साफ करून घेणारी मंडळी एका हरिजनाला तो वापरूं द्यावयास थोडीच परवानगी देणार ! मनुष्यानें आश्रय देण्याचें नाकारल्यामुळें त्याला निसर्गाचाच आश्रय करावा लागला. हा सर्व प्रकार अनुभवल्यावर त्या तरुणाला काय वाटलें असेल ? त्याच दिवशीं संध्याकाळीं उपाशी पोटीं तो परत आला आणि आपल्या बदलीचा हुकूम रद्द करून घेण्याच्या खटपटीस लागला.

मला हें सर्व खरें वाटणार नाहीं म्हणूनच कीं काय, त्या हरिजन गृहस्थांनीं त्या तरुणानें बदली रद्द करण्यासाठीं केलेल्या विनंतीअर्जाची एक नक्कल माझ्या हातांत दिली. त्या दिवशीं घडलेला सर्व प्रकार साद्यंतपणें त्या अर्जांमध्यें लिहिलेला होता. माझी अगदीं खात्री पटली. माझें मन अस्वस्थ झालें आहे असें पाहून ते पुढें म्हणाले, “ हें पाहा, यासाठींच आम्ही असं म्हणतों, कीं देशाचा एखादा भाग आम्हांला अलग पाडूनच द्या ना. म्हणजे आम्ही आपला स्वतंत्र समाज करून सुखानं राहूं. ” स्वतंत्र वसाहत करून राहण्याची त्यांची ही कल्पना मला भयानक वाटली. ती ऐकून माझ्या मनाला धक्काच बसला !

हरिजनांचा प्रश्न किती बिकट आहे याची मला थोडीशी कल्पना आली.

ज्या साम्राज्यशाहीला आपण आपला शत्रू म्हणून आतांपर्यंत समजत आलों आणि जिच्याविरुद्ध सतत लढा चालू ठेवण्याचा आपण निर्धार केला त्या साम्राज्यशाहीसंबंधींच्या माझ्या हरिजन बांधवांच्या या मित्रत्वाच्या भावना ऐकून प्रथम मला राग आला होता. पण त्या हरिजन तरुणाच्या हकीकतीनें मला विचार करायला लावलें. आणि या प्रश्नाबाबत माझे जे आडाखे होते ते पुन्हा एक वेळ तपासून घेण्याची मला आवश्यकता भासूं लागली.

हरिजन बांधवांची ही मनोवृत्ति समजून घेण्याचा मी प्रयत्न करूं लागलों. माझ्या मनांत विचारांचें काहूर निर्माण झालें. या घटनेचा परिणाम त्या तरुणाच्या मनावर काय झाला असेल बरें ? कोणाहि स्वाभिमानी व सहृदय मनुष्याच्या अंतःकरणाला घरें पडावीं असाच तो अनुभव होता. लहानपणीं माझ्या गरिबीची जाणीव करून देण्याच्या क्षुद्र भावनेनें एका नातेवाइकांनीं मला ' मधुकऱ्या ' म्हणून संबोधलें त्या वेळीं माझ्या अंगाची कशी आग झाली होती त्याची मला पूर्ण आठवण झाली. खरें पाहिलें तर ती वस्तुस्थिति होती. मला राग येण्याचें कारण नव्हतें. तरीसुद्धां फार राग आला. आज त्या हरिजन तरुणाला भोगाव्या लागलेल्या अपमानाच्या मानानें माझा अपमान किती क्षुल्लक होता ? अचानक एक विचार माझ्या मनांत येऊन गेला. — " मी हरिजन असतों तर ! "

कॉलेजमध्यें इतर तरुणांच्या बरोबर शिकत असतांना आपल्या भावी जीवनाचीं किती मनोहर चित्रें त्यानें रेखाटलीं असतील, कोणतीं सुखस्वप्नें पाहिलीं असतील, किती विविध प्रकारच्या इच्छा-आकांक्षा उराशीं बाळगल्या असतील, याची कल्पना करणें फारसें अवघड नाहीं. ज्याला कॉलेज-जीवनाचा थोडाफार अनुभव असेल त्यानें आपल्या आठवणी ताज्या करून पाहाव्या म्हणजे ही गोष्ट त्याला सहज समजूं शकेल. पण त्या रम्य कल्पनामय जगांतून प्रत्यक्ष जगांत पदार्पण करतांच त्याला पहिली ठोकर बसली. एका दिवसांत त्याच्या सर्व आकांक्षा धुळीला मिळाल्या ! सुखस्वप्नांची राखरांगोळी

झाली ! वास्तविक पाहातां एक सुशिक्षित सवर्ण हिंदु तरुण आणि तो हरिजन तरुण यांच्यामध्यें काय फरक होता ? पण दुष्ट रूढीनें आणि जात्यहंकारानें त्याच्या हृदयाला जखम केली. ज्या दुष्ट रूढीनें त्याच्या जीवनांत कांटे कालविले आणि ज्या निष्ठुर समाजानें त्याला मनुष्यांतून उठविलें त्या समाजाबद्दल त्याच्या मनांत कायमची अढी बसली तर त्यांत आश्चर्य करण्यासारखें काय आहे ? साम्राज्यशाही सरकारनें त्याला नोकरी दिली, पण समाजानें त्याला झिडकारलें, त्याच्या स्वाभिमानावर आघात केला, अशा वेळीं साम्राज्यशाही हा आमचा शत्रू नसून, मित्र आहे, सवर्ण हिंदु हेच आमचे खरे शत्रू आहेत, असे विचार त्याच्या मनांत आल्यास त्याला जबाबदार कोण ?

दुसऱ्या माणसाच्या परिस्थितीचा विचार करतांना आपण त्याच्या सुखसोयी तेवढ्याच जमेस धरतों आणि दुःखांकडे डोळेझाक करतों. त्यामुळें त्याची परिस्थिति आपणांस स्पृहणीय वाटूं लागते. ब्राह्मण जातमध्यें जन्माला आल्यामुळें ब्राह्मणेतर बहुजनसमाजाचा विश्वास संपादन करणें फार जड जातें. त्यामुळें आपल्याला अत्यंत अप्रिय अशा तत्त्वांचा व्हावा तसा प्रसार होऊं शकत नाहीं. इतकेंच काय, पण कोणीहि विघ्नसंतोषी मनुष्य जातीय भावनेचा फायदा घेऊन केलेला कामाचा देखील खेळखंडोबा करूं शकतो असा कटु अनुभव आला म्हणजे आपण ब्राह्मणेतर कुळांत जन्माला आलों असतों तर काय बहार झाली असती असा विचारदेखील कित्येक वेळां माझ्या मनांत येऊन गेल्याचें मला आठवतें. तीच गोष्ट अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या हरिजनबांधवांची. त्यांच्या दास्यविमोचनाचा विचार करूं लागलों म्हणजे "आपण हरिजन असतों तर" असे विचार देखील माझ्या मनांत आलेले आहेत. आज पुन्हां तोच विचार माझ्या मनांत आला. पण अगदीं निराळ्या भूमिकेवरून. हरिजन होण्यांत काय दुःखें आहेत याची थोडी थोडीशी कल्पना आतां मला आली व आपले पूर्वींचे विचार किती उथळ होते हें समजून चुकलें. त्या वेळीं बहुजनसमाजाची होत असलेली कुचंबणा आणि

पदोपदीं उच्चवर्णीयांकडून होणारा जुलूम आणि अपमान मी जमेस धर- ण्याचें विसरून जात असे.

खरोखर मी हरिजनांच्या पोटीं जन्माला आलों असतों तर आज माझी जी परिस्थिति आहे ती प्राप्त करून घेणें मला शक्यच असतें काय? जें शिक्षण मीं मिळविलें आहे तें मी हरिजन असतों तर मला मिळूं शकलें असतें काय? आणि एक वेळ मिळालें असतें असें धरून चाललें तरी निर- निराळया प्रलोभनांपुढें माझा टिकाव लागला असता असें गृहित धरणें धाड- साचें नाहीं का ? सार्वजनिक कार्यासंबंधीं माझ्या ज्या इच्छा आणि महत्त्वा- कांक्षा आहेत त्यांची कसोटीच अद्याप झालेली नाहीं. प्रलोभनेंच नसल्यामुळें तत्त्वभ्रष्ट होण्याची वेळ फार करून आली नाहीं. एका विशिष्ट मर्यादेनंतर आपल्या जीवनाला एक प्रकारची स्थिरता येते आणि कालमानानें व अनु- भवानें आपली ध्येयनिष्ठादेखील प्रखर होते हें खरें; पण ती मर्यादा ओलांड- ण्यापूर्वी आपल्या मार्गामध्यें प्रलोभनें आलीं तर त्याला आपण बळी पडणार नाहीं असें थोडेंच आहे ! हरिजनांच्या कोणत्याहि कसोटीला मी उतरलों असतों तर माझा ध्येयवाद कायम टिकवूं शकलों असतों पण असें गृहीत धरलें तरी सामाजिक कार्य आणि अपमान सहन करावा लागला असता त्याची काय वाट? त्या हरिजन तरुणाच्या हृदयविदारक व करुणास्पद अनुभवानें माझ्या डोक्यांत चांगला प्रकाश पडला. मी कल्पनेच्या जगांत वावरत होतों. त्यानें मला प्रत्यक्ष परिस्थिति काय आहे याची जाणीव करून दिली. हरिजनांबद्दल मला वाटत आलेली सहानुभूति कितीतरी पटींनीं वाढली.

हरिजनांवर होणारा हा सामाजिक जुलूम कसा नाहींसा करतां येईल याचा विचार करूं लागलों. साम्राज्यवादी सरकारनें त्या तरुणाला नोकरी दिली, मग हा सामाजिक जुलूम नाहींसा करण्याचें पुण्यकार्य करण्यास तें कां पुढें येत नाहीं ? साम्राज्यवादी सरकारला आपला मित्र समजणाऱ्या हरिजनांनीं या प्रश्नाचा देखील विचार करावयास हवा. सवर्ण हिंदूंच्या जुलुमाचा प्रतिकार

करून स्वतःस न्याय मिळवून घेण्याचा हरिजनांनीं प्रयत्न केला तर काय होईल ? कायदा त्यांच्या मार्गांत येईल. हा कायदा आणि ही समाजव्यवस्था साम्राज्यवादी सरकारनें आपल्या संगिनींच्या जोरावर टिकवून धरली आहे. साम्राज्यशाहीच्या या संगीनी जर काढून घेतल्या तर हरिजनांना आपला लढा लढवून त्याचा सोक्षमोक्ष करून घेतां येईल. पण जोंपर्यंत ही राज्य-व्यवस्था कायम आहे तोंपर्यंत ही गोष्ट शक्य नाहीं.

हरिजनांवर सामाजिक अन्याय होत आहे ही गोष्ट मान्य करून देखील सरकार आजपर्यंत त्रयस्थाची भूमिका घेत आलें आहे. कारण त्यांना सवर्ण हिंदूंना दुख-विण्याची इच्छा नाहीं. त्या समाजाचीं मनें दुखवलीं तर आपल्या राज्याला धोका आहे ही गोष्ट ते जाणून आहेत. हरिजनांबाबत ही जी काय सहानु-भूति दाखविण्यांत येत आहे ती खरी नसून तीमध्यें स्वार्थ आहे. उच्च-वर्णीय समाजाला दुखवावयाचें नाहीं असें धोरण जरी सरकारनें ठेवलें तरी त्या समाजांतील जागृति तें थांबवूं शकलेलें नाहीं. साम्राज्यविरोधी राष्ट्रीय भावना व संघटना दिवसेंदिवस बळावत आहे. तिला आळा घालण्यासाठीं त्यांनीं निरनिराळ्या साधनांचा उपयोग करण्यास सुरुवात केली आहे. हरि-जनांच्या प्रश्नाचा देखील त्यासाठींच उपयोग करून घेण्यांत येत आहे, ही गोष्ट सहज सिद्ध करतां येण्यासारखी आहे. नाहींतर हरिजनांचा आजच एवढा कळवळा त्यांना कशाला आला असता ! साम्राज्यशाहीला मित्र समज-णारांनीं या मित्राच्या पोटांतील या स्वार्थी हेतूंकडे नीट लक्ष पुरविलें पाहिजे.

हरिजनांचा प्रश्नच नाहीं असें कोण म्हणूं शकेल ? त्यांच्यावर अनन्वित जुलूम होत आहे. हा प्रश्न केवळ हिंदुधर्मीयांचा आहे असें मानणें देखील चुकीचें होईल. ज्या कोणाला न्यायाची चाड असेल, मनुष्यत्वाची भावना असेल, त्यानें निदान मानव्यासाठीं तरी या अन्यायाचा शेवट करण्यास सिद्ध झालें पाहिजे. पण हें साम्राज्यवादी सरकारकडून होईल अशी अपेक्षा करणें चुकीचें आहे. ज्या दिवशीं साम्राज्यवादी सरकार बाजूला जाऊन जनतेचें

सरकार स्थापन होईल त्या वेळींच हा प्रश्न धसाला लागणार आहे. सन १९३५ च्या कायद्यामुळें जी कांहीं थोडी सत्ता कॉंग्रेसच्या हातीं आली त्या वेळीं हरिजन समाजाला आपल्या दुःखांना जास्त परिणामकारकपणें वाचा फोडतां आली ही गोष्ट आपल्या अनुभवाची आहे. आतां हें खरें कीं, कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ असतांना हरिजनांनीं ओरडाओरड सुरू केली म्हणून त्यांना कॉंग्रेसमधल्या कित्येक मंडळींनीं नांवेंदेखील ठेवलीं. पण तसें करणें योग्य नाहीं. आपल्या गाऱ्हाण्यासाठीं चळवळी करावयाच्या त्या जनतेचें मंत्रिमंडळ असतांना त्यांनीं केल्या त्यांत वावगें काय आहे ? कॉंग्रेस मंत्रिमंडळाकडे शिष्टमंडळें, मोर्चें वगैरे नेल्याबद्दल त्यांना दोष देणें योग्य नाहीं. मी हरिजन असतों तर हेंच केलें असतें. तो आमचा जन्मसिद्ध हक्कच आहे.

पण हक्काबरोबर कर्तव्येंदेखील असतात. आपल्या लढ्याचा सोक्षमोक्ष शक्य तितक्या लवकर करून न्याय मिळवून घेणें हें आपलें ध्येय आहे. हा सोक्षमोक्ष साम्राज्यवादी सरकारच्या अमदानींत होणार नाहीं. त्यासाठीं जनतेचें सरकार अस्तित्वांत असावयास पाहिजे. ही गोष्ट पटली तर साम्राज्य सरकार आपला मित्र आहे ही भावना टाकून द्यावयास हवी आणि राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठीं कंबर कसावयास पाहिजे. आपल्या एकट्याच्या जिवावर ही सत्ता हस्तगत करतां येईल असें एखाद्या जातीला अगर वर्गाला वाटत असेल तर तो भ्रम आहे.

प्रचलित परिस्थितींत साम्राज्यशाहीस परिणामकारक शह द्यावयाचा असल्यास सर्व साम्राज्यविरोधी जमातीचा एक संयुक्त मोर्चा निर्माण करावयास हवा. कॉंग्रेसमध्यें आज घटकेला जास्तींत जास्त साम्राज्यविरोधी शक्ति एकत्रित झालेल्या आहेत. त्यांमध्येंच हरिजनांनीं सामील होऊन सत्ता हस्तगत करण्याच्या कामांत मदत करावयास हवी. हें न करतां नुसती हक्कांची भाषा करणें योग्य होणार नाहीं. सत्ता आल्यावर त्यांना आपला प्रश्न परिणाम-

कारक रीत्या सोडवून घेतां येईल. त्यांच्या या भावी लढ्यामध्यें सर्व कॉंग्रेस-जन त्यांना साहाय्य करतील असें मला वाटत नाहीं. संपूर्ण स्वातंत्र्याची आणि न्यायाची भाषा करणारे कित्येक लोक या अंतिम लढ्याच्या वेळीं दलित वर्गांच्याविरुद्ध शस्त्र उगारण्यास कमी करणार नाहींत. पण सर्वच लोक त्यांना सोडून देतील असें मानणें चुकीचें होईल. कॉंग्रेसमध्यें पुष्कळ लोक असे आहेत कीं, जे त्यांच्या बाजूनें उभे राहतील. महात्मा गांधींच्या राजकीय व आर्थिक धोरणाबद्दल साशंक असलेले लोकदेखील ही गोष्ट कबूल करतील, कीं ते हरिजनांचे कैवारी आहेत आणि सत्ता हस्तगत झाल्यावर अधिकारारूढ पक्षानें जर हरिजनांवर शस्त्र उचललें तर गांधीजी हरिजनांच्या बाजूनें उभे राहतील. गांधीजींच्या नैतिक पाठिंब्यासाठीं आज दोस्त राष्ट्रें-देखील खटपट करीत आहेत. कारण त्यांच्या नैतिक पाठिंब्यानें फार मोठें कार्य होण्यासारखें आहे. गांधीजींचा पाठिंबा हरिजनांना मिळेल, इतकेंच नव्हे, तर सर्व प्रगतिपर विचारसरणीचे प्रामाणिक लोकदेखील गांधीजीं-बरोबर त्यांचा पाठपुरावा करून हरिजनांचा प्रश्न सोडविण्यास मदत करतील. म्हणून आजच्या घटकेस राजकीय सत्ता हस्तगत करण्याच्या कामांत सहकार्य करणें हेंच हरिजनांच्या हिताचें आहे. मी हरिजन असतों तर हेंच केलें असतें. हरिजनांचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें तें महत्त्वाचें व आवश्यक साधन आहे.

## जय कोणाचा ?

५

"अहमद, तूं किती जरी वितंडवाद घातलास तरी त्यानं माझं समाधान नाहीं होणार. हिंदु–मुसलमानांचं एक राष्ट्र निर्माण करण्याच्या तुमच्यां कल्पना फोल आहेत. तें एक काल्पनिक स्वप्न आहे नुसतं." सुलेमानशेट निश्चयात्मक स्वरानें म्हणाले.

"अब्बा, तें केवळ एक स्वप्न नाहीं. त्याला वस्तुस्थितीचा आधार आहे. राशियांत देखील मुसलमान आणि मुसलमानेतर फार मोठ्या प्रमाणांत आहेत व तरीहि सर्व जातींचं आणि धर्मांचं रशिया हें एकच राष्ट्र समजलं जातं. त्याचं ऐक्यहि बेगडी नाहीं. त्याचा एकजिनसीपणा या युद्धांत सिद्ध झाला आहे. चीनमध्यें-देखील मुसलमान करोडोंच्या संख्येनं आहेत; तरीपण त्यांचं एकच राष्ट्र आहे. मग हिंदुस्थानांतच हिंदु-मुसलमानांचं एक राष्ट्र कां होऊं नये ?" तितक्याच आवेशानं अहमदनं आपलें म्हणणें मांडलें.

"याची सांगोपांग चर्चा मला करतां येणार नाहीं कदाचित्. त्यासाठीं लीगच्या पुढाऱ्यांबरोबर तूं चर्चा कर हवी तर. असल्या चर्चा आणि वाद-विवाद माझ्या दृष्टीनं विशेष महत्त्वाच्या नाहींत. मला वस्तुस्थिति समजते." असें म्हणून त्यांनीं विषय आटोपता घेतला आणि कपडे चढवून बाहेर जाण्याच्या तयारीस ते लागले. अहमदचा नाइलाजच होता.

सुलेमानशेट आणि अहमद या पितापुत्रांमध्यें असले संवाद व खटके वारंवार होत. बाप कॉंग्रेसवाला तर मुलगा आर. एस. एस वाला, मुलगा समाजवादी तर बाप हिंदुमहासभावादी असे प्रकार हिंदुसमाजांत अनेक ठिकाणीं पहावयास मिळतात. पण असले विरोध मुस्लिम समाजांत क्वचितच आढळून येत असतील. अहमद व सुलेमानशेट हें असेंच एक उदाहरण होतें.

सुलेमानशेट हे एक मोठे कापड व्यापारी होते. आपल्या तरुणपणीं ते-देखील आपल्याला कॉंग्रेसमन म्हणवून घेण्यांत अभिमान मानीत. कायदे-अझम जीनांच्या तडफदार जीवनाचा तो काळ होता. हिंदु-मुसलमानांचा एक संयुक्त मोर्चा ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभा करण्याचा तो एक महान् प्रयत्न होता. पण हळूंहळूं परिस्थिति बदलत गेली. मुस्लिम राजकारणाला एक अनिष्ट वळण लागलें आणि कॉंग्रेसनें मंत्रिपदाचा स्वीकार केल्यानंतर मुस्लिम लीगच्या जातीयवादी राजकारणाचा कळस झाला. सुलेमानशेठजींच्यावरहि त्याचा परिणाम झाला आणि आतां ते कट्टर 'लीगी' आणि पाकिस्तानचे पुरस्कर्ते बनले होते.

अहमद कॉलेजमध्ये शिकत होता. त्याच्या तरुण रक्ताला ही बुरसटलेली विचारसरणी मान्य नव्हती. नुसत्या एकराष्ट्रीयत्वानें त्याचें समाधन होण्यासारखें नव्हतें. त्याच्या ध्येयवादाच्या मर्यादा आंतरराष्ट्रीयत्वापर्यंत जाऊन भिडल्या होत्या. तो स्वतःला समाजवादी म्हणवून घेई. त्यामुळें पितापुत्रांमध्यें थोडशी विमनस्कता निर्माण होऊं पहात होती. त्यांचे संबंध दुरावतील कीं काय अशी भीतीदेखील अहमदला कधींकधीं वाटत असे. सुलेमानशेठजींचा कडवेपणा

इतक्या थराला गेला होता, कीं शक्यतोंवर सर्व आर्थिक व्यवहारदेखील मुसलमानाबरोबरच करण्याचा त्यांनीं विडा उचलला होता.

अहमदची सर्वांत धाकटी बहीण अजीजा एकदा विषमानें आजारी पडली तर सुलेमानशेठनीं आपल्या नेहमींच्या मुसलमान डॉक्टरचेंच औषध तिला दिलें. दहाबारा दिवस गेले तरी ताप उतरेना. १०४ डिग्रीपर्यंत ताप यावयचा. तशांत उन्हाळ्याचे दिवस. तापानें तें लेकरूं तडफडत होतें. लक्षण कांहीं ठीक दिसेना तव्हां एक दिवस अहमद वडिलांना म्हणाला, "अब्बा, डॉक्टर गुरुस्वामींना आणून त्यांना हिची प्रकृति दाखवावी असं मला वाटतं."

" अरे, डॉक्टर बशीरचं औषध चालू असतांना गुरुस्वामीला आपण आणलं तर त्याला काय वाटेल ? " सुलेमानशेठनीं युक्तिवाद केला. "त्यांत काय वाटायचं आहे? फार तर डॉ. बशीरलाच गुरुस्वामींना सल्ल्यासाठीं आणण्यास सांगावं. "

" आणखी दोन दिवस पाहूं. ताप निघाला तर ठीकच, नाहींतर बोलावूं त्यांना. एवढी गर्दी काय आहे ? "

" पोरीचे प्राण कंठाशीं येण्याची पाळी आली तरी म्हणे गर्दी काय आहे ! तुम्ही डॉ. बशीरना सांगणार नसलां तर मी आज संध्याकाळीं स्वतःच डॉ. गुरुस्वामींना घेऊन येईन. " अहमद अगदीं निकराबर येऊन म्हणाला.

" तुला एकट्यालाच जणुं अजिजाबद्दल काळजी. मला तिच्याबद्दल कांहीं वाटतच नाहीं अशी का तुझी कल्पना आहे? खबरदार, माझ्या परवानगीशिवाय कुणी डॉक्टर वगैरे आणलास तर ! तुझा नाचरेपणा मला पसंत पडणार नाहीं. " सुलेमानशेठ संतापाच्या भरांत बोलून गेले.

वडिलांच्या या बोलण्यानें अहमदाचें मन अत्यंत प्रक्षुब्ध झालें. कांहीं-तरी उत्तर द्यावें असें त्यास वाटत होतें. पण लगेंच दातांनीं खालचा ओठ दाबून त्यानें मन आवरलें आणि चटकन् तो तेथून दूर निघून गेला.

अजीजा मोठी गोड पोरगी होती. सहासात वर्षांचेंच वय असेल तिचें. बाळसेदार पण नाजुक शरीर. सोळासतरा दिवस होऊन गेले तरी तिचा ताप उतरण्याचें लक्षण दिसेना. अखेरीस एक दिवस रात्रीं ती जी बेशुद्ध झाली ती पुन्हां भानावर आली नाहीं. तीन दिवस बेशुद्धावस्थेंत गेले, तेव्हां मात्र वडिलांच्या तोंडचें पाणी पळालें. त्यांच्या वात्सल्यभावनेनें जातीय भावने-विरुद्ध बंड पुकारलें आणि अपत्यप्रेमाचाच शेवटीं विजय झाला. त्यांनीं डॉ. गुरुस्वामींना बोलावण्यास सांगितलें. पण बैल गेला आणि झोंपा केला अशां-तलाच प्रकार होता तो! डॉ. गुरुस्वामी आले. त्यांनीं रोग्याची काळजीपूर्वक तपासणी केली. सर्व शरिरांत विष भिनून गेल्यामुळें ती बेशुद्ध झाली होती. उपाय केले त्यांनीं शक्य ते, पण व्यर्थ! अजीजा आपल्या प्रियजनांना दुःखांत टाकून निघून गेली !

अजीजा मृत्युमुखीं पडल्याला वर्ष सहा महिने होऊन गेले असतील. तिच्या मरणानें सुलेमानशेठजींना चांगलाच धक्का बसला होता. पण त्या-मुळें पितापुत्रांच्यामधील विमनस्कतेचा अंत झाला नव्हता. केवळ आपल्या हट्टानें पोर आपल्या हातची गेली याची जाणीव त्यांना होती. तरीपण आपली चूक कबूल करण्याचें धैर्य त्यांच्या ठिकाणीं नव्हतें. अहमदहि सम-जुतदार मुलगा होता. मुलीच्या मरणानें वडिलांचा स्वभाव अगदीं हळुवार झाला आहे हें त्यानें ओळखलें होतें. म्हणून त्याबाबत त्यांच्याशीं वादवि-वाद करावयाचा नाहीं असेंच त्यानें ठरविलें होतें.

अशा परिस्थितींत एक दिवशीं एका नातेवाईकाच्या लग्नानिमित्त पिता-पुत्रांना परगांवीं जाणें भाग पडलें. लढाईच्या दिवसांत आगगाडीचा प्रवास म्हणजे मोठें दिव्यच असतें. तरीपण दुसऱ्या वर्गाचें तिकीट काढून ते कसे-बसे एका डब्यांत घुसले.

आगगाडीमध्यें आंत प्रवेश होईपर्यंतच काय ती झटापट असते. एकदा आंत पाऊल पडलें म्हणजे क्षणार्धांत सर्वच सहप्रवासी होतात. आपलें सामान-

सुमान व्यवस्थित आलें कीं नाहीं तें तपासून अहमदनें डब्यांत एकदां सभोंवार टाकली. एक हिंदु कुटुंब त्या प्रवासी मंडळींत होतें. एक मध्यम वयाचें जोडपें आणि एक लहान मुलगी इतकीच ती मंडळी होती. मुलीकडे पाहिल्याबरोबर अहमदला एकदम त्याच्या अजीजाची आठवण झाली. त्यानें किंचित् बारकाईनें तिच्याकडे पाहिलें तेव्हां तिच्या व अजीजामधला सारखेपणा त्याला दिसून आला. अजीजासंबंधींच्या सर्व स्मृतींनीं त्याच्या हृदयांत गर्दी केली. किती वेळ तरी तो तिच्याकडे टक लावून पाहात होता. आणि मग एकदम त्याला शंका आली, कीं आपण त्या हिंदु मुलीकडे अशा रीतीनें पाहात राहिल्यामुळें तिच्या आईबापांना राग तर येणार नाहीं ना ? आपली शंका खोटी ठरावी या आशेनें त्यानें त्या हिंदु जोडप्याकडे दृष्टि वळवली—पण त्यांची निराशाच झाली !

त्याची दृष्टि ज्या वेळीं त्या मुलीवर खिळून राहिली होती तेव्हां त्या मंडळींची दृष्टि त्याच्यावर केंद्रित झालेली त्याला दिसून आली. त्यांच्या दृष्टींत एक प्रकारचा रोष, नापसंती स्पष्ट दिसत होती. ते कां रागवले होते ? अहमद का पोरें पळवून नेणारा पठाण होता कीं एखाद्या खानदानी तरुणीवर डोळा ठेवणारा मवाली होता ? त्या गृहस्थाच्या दृष्टीला दृष्टि भिडतांच अहमदला कसेंसेंच वाटलें ! त्या गृहस्थाच्या चेहऱ्यावरून जो भाव व्यक्त होत होता, त्यानें अहमदला फार दुःख झालें. आपली शंका खरी ठरली म्हणून त्याचें मन कष्टी झालें. आपली दृष्टि चटकन् त्यानें वडिलांच्याकडे वळविली आणि तो आश्चर्यचकित झाला. सुलेमानशेठहि त्या मुलीकडे एकाग्रतेनें पाहात होते. त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें मंद स्मित चमकत होतें. कोमल भाव डोळ्यापुढें प्रतिबिंबित झाले होते. जणू वात्सल्यभावनेला भरती आली होती. त्यांची ती समाधि भग्न करावीशी त्याला वाटेना. पण लगेच त्या गृहस्थाची ती राग आणि तिरस्कार यांनीं युक्त दृष्टि त्याला आठवली आणि वडिलांना कांहींतरी प्रश्न करून त्यांचें मन त्यानें दुसरीकडे वळविलें.

थोडा वेळ गेल्यावर कांहींतरी बोलणें सुरू करावें या हेतूनें सुलेमान-

शेठनीं त्या गृहस्थांना विचारले, " आपण कोठून आलां ? कुठपर्यंतचा प्रवास आहे ? "

" आम्हांला पुष्कळ लांब जायचं आहे. मनमाडच्या स्टेशनवर आम्ही उतरून जाऊं; तिथं आम्हांला गाडी बदलावी लागेल. " त्या गृहस्थांनीं एखाद्या यंत्राप्रमाणें उत्तर दिलें.

" ही आपली मुलगी वाटतं ? " सुलेमानशेठजींनीं त्या लहान मुलीकडे पाहून विचारलें.

" हो मुलगीच. " त्या गृहस्थांनीं तुटकपणें उत्तर दिलें. संभाषण वाढूं न देण्याची त्यांची इच्छा त्यांच्या उत्तर देण्याच्या पद्धतीवरून आणि आवाजावरून सहज समजून येण्यासारखी होती.

" नांव काय तुझं, बेटा ? " त्या गृहस्थाच्या तुटकपणाकडे मुद्दाम दुर्लक्ष करून सुलेमानशेठजींनीं सरळ त्या मुलीलाच प्रश्न केला. मुलगी आई–बापांच्या तोंडाकडे पाहूं लागली. या दाढीवाल्या मुसलमानाच्या प्रश्नाला उत्तर देऊं कीं नको याची परवानगी जणूं ती मागत होती. पण तिची अडचण दूर करून ते गृहस्थच म्हणाले, " तिचं नांव सुमन. "

" वा ! फार छान नांव आहे. चेहऱ्याप्रमाणं तिचं मनहि चांगलं असाच ना अर्थ त्या नांवाचा ? "

" अहो, शब्दार्थ पाहून का कोणी नांव ठेवीत असतात ? अनेक नांवांप्रमाणंच तें एक नांव आहे. " किंचित् त्रासिकपणें त्यांनीं उत्तर दिलं. ' पुरे करा हा लोचटपणा ! ' असेंच जणूं त्यांना सुचवायचें होतें. सुलेमानशेठजींचें लक्षांत आली ती गर्भित सूचना, व आणखी प्रश्न विचारण्याचें त्यांनीं थांबविलें.

हा सर्व प्रकार अहमद निश्चलपणें पाहात होता. बापाच्या वागणुकीमागची भाषा त्याला समजत होती. मुलीच्या मृत्यूनें होरपळून निघालेला त्यांचा जीव ओलावा शोधत होता. या गृहस्थाचा तुसडेपणा पाहून मात्र त्याला

मनस्वी दुःख झालें. त्यांच्या वडिलांसारख्या सुसंस्कृत मुसलमानाबरोबर वागतांनादेखील त्यांना सौजन्य दाखवूं नये या गोष्टीचं त्याला नवल वाटलें. खरोखर अब्बा म्हणतात तेंच खरें नाहीं कां? कठोर असेल; पण तें सत्य आहे. कसें व्हायचें हिंदु-मुस्लीम ऐक्य? वडिलांनीं पुन्हां त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करूं नये असें त्याला वाटलें. तरुण रक्तानें उसळी खाल्ली.

एकामागून एग स्टेशनें जात होतीं. आतां थोड्या अवकाशांतच तीं माणसें मनमाडच्या स्टेशनवर उतरून जाणार होतीं. सुलेमानशेठ स्वस्थ बसले होते; पण त्याच्यानें राहवले नाहीं. ते उठले आणि हलकेंच आपली कातडी बॅग काढून त्यांनीं बदामी हलव्याचा एक पुडा काढला. सुमनच्या पुढें तो पुडा करून ते प्रेमळपणानें म्हणाले, “घे बेटा, चांगली आहे ही मिठाई!”

सुमनला मोठा प्रश्न पडला. पुडा घ्यावा कीं घेऊं नये ते तिला समजेना तिनें आपल्या आईकडे पाहिले. पण आईनें अशी कांहीं मुद्रा केली, की विचारूं नका! पण तेवढ्यांत सुलेमानशेठ त्या गृहस्थांना उद्देशून म्हणाले, “कांहीं हरकत नाहीं बरं घ्यायला. मिठाईला कांहीं दोष नाहीं. ती हिंदु-हलवायाकडलीच आहे.”

“हरकत तशी कांहीं नाहीं, पण ती नुकतीच दुखण्यांतून उठली आहे, तेव्हां मिठाई तिला न दिलेलीच बरी.” त्या गृहस्थाचें तें उत्तर ऐकून सुलेमानशेठ क्षणभर त्या मिठाईकडेच शून्य दृष्टीनें पाहात राहिले. मग कांहीं तरी निश्चय केल्यासारखी मुद्रा करून त्यांनीं तो पुडा तसाच पेटींत टाकला. आणि खिडकीबाहेर तोंड काढून ते विषण्ण मनानें पहात राहिले. एवढ्या अवकाशांत गाडी मनमाड स्टेशनवर येऊन उभी राहिली. सुमनच्या वडिलांनीं आपलें सामानसुमान बाजूला काढलें आणि गाडी प्लॅटफॉर्मवर लागतांच हमालाला हाक मारून तीं मंडळी बाहेर पडली. जातांजातां चोरट्या नजरेनें सुमननें सुलेमान शेठजींच्याकडे पाहिलें. त्यांची अखेरची दृष्टादृष्ट

झाली. आणि दोन अश्रु आपल्या वडिलांच्या डोळ्यांतून टपकन खालीं पडतांना अहमदनें पाहिलें.

" अब्बा ! " कांहीं वेळ गेल्यावर अहमदनें हाक मारली.

" काय बेटा ? " त्यांनीं विचारलें. " हिंदुमुसलमान ऐक्याबाबत तुमच्या दृष्टिकोनांत बरंच तथ्य असल्याचं आज मला माहीत झालं. इतके दिवस मला असं वाटलं, कीं तुम्ही दुराभिमानानं आपल्याच पक्षाला चिकटून बसतां. पण आज माझा भ्रम पुष्कळच नष्ट झाला. " अहमद नम्रपणें म्हणाला.

" तें कसं बरं ? आज असं काय विशेष घडलं, कीं तुला आपल्यामधील वाद चुकीचा वाटूं लागला ? "

" हिंदु लोक मुसलमानांना नीच लेखतात हें तुमचं म्हणणं आज माझ्या अनुभवाला आलं. नाहींतर तुमच्या वात्सल्यभावनेचा असा निष्ठुरपणानं अपमान त्यांनीं केला नसता. पण त्यांना आपल्या सुखदुःखाची काय पर्वा ? त्यांच्या दृष्टीनं सब घोडे बारा टक्के! मुसलमान म्हटला कीं तो त्याज्यच. छे, त्यांचा हा फाजील अहंकार नष्ट होईपर्यंत ऐक्य अशक्यच आहे. " अहमद तावातावानें बोलत होता.

" अहमद, मी मघापासून विचार करतों आहें, कीं आमचं कुठंतरी चुकत आहे. तसं नसतं तर परस्परांच्या सात्विक व उदात्त भावनांबाबतदेखील असा अनुदारपणा आम्हीं दाखवला नसता. आज मला या छोकरीबद्दल जो जिव्हाळा आणि मेहनत वाटली, ती कशामुळं ? आम्ही सर्व एकच अल्लाचीं लेकरं आहोंत; पण आम्हांला त्या गोष्टीचा विसर पडला आहे. धर्माला आम्हीं विकृत स्वरूप दिलं आहे. परस्पर वैमनस्याच्या आणि तिरस्कारांच्या भिंती उभ्या करून आम्ही भावाला भावापासून दूर ठेवीत आहों. चालीरिती, पेहराव, भाषा इत्यादि स्थलकालांप्रमाणं उत्पन्न झालेल्या भेदांच्याखालीं सर्व धर्मांचं एकच तत्त्व आहे. त्या तत्त्वाची जेव्हां आमच्या लोकांना जाणीव होईल तेव्हां हीं भांडणं नाहींशीं होतील. म्हणून तूं आपल्या

उच्चतर ध्येयाबद्दल असा निराश होऊं नकोस. तुमच्या सत्वपरीक्षेची हीच वेळ आहे. तुम्हींच हे विचार पसरवले पाहिजेत. तें करण्यास तुम्ही सर्वस्वीं लायक आहां. तुमचं मन निर्मळ आहे. अजीजाच्यामार्फत खुदानं मला हा धडा शिकवला." मीं आतांपर्यंत त्याचा द्वेष केला त्याचाच परिणाम हा.

वडिलांच्या तोंडचे हे शब्द ऐकून अहमद आश्चर्यचकित झाला. त्याचें हृदय भरून आलें.

## आपल्यावरून जग ओळखावं — ६

आपल्याकडे अशी एक म्हण आहे, की "आपल्यावरून जग ओळखावं." लहानपणीं नाम्या कुत्र्याला एकादी छमटी लगाविली आणि तो ओरडत सुटला म्हणजे आईनं रागानं म्हणावं, "तुला कुणीं तसं मारलं म्हणजे कसं वाटेल ?" खरंच आहे ! दुसऱ्याच्या दुःखाची यथार्थ कल्पना यावी असं वाटत असेल तर आपल्यावर तोच प्रसंग आल्यास आपली काय अवस्था होईल याचा विचार नको का करायला ? दुसऱ्यावर टीका करावयास लेखणी सरसावण्याआधीं आपण त्या परिस्थितींत असतों तर काय केलं असतं याचा विचार जर मनुष्यानं केला तर जगांतील किती तरी अन्याय कमी होईल. आपल्यावर एकादा अन्याय झाला आणि त्याचं निराकरण होऊं शकलं नाहीं म्हणजे आपण एखाद्या हुतात्म्याच्या आवेशानं समाजावर टीका करण्यास

प्रवृत्त होतों व क्वचित्प्रसंगीं जगाच्या न्यायीपणाबद्दल निराशहि होतों. पण आपणहि कधीं दुसऱ्यावर अन्याय केला आहे किंवा नाहीं याचा नुसता विचार करण्यासहि थांबत नाहीं. प्रत्येकानं जर न्यायाचा आणि सचोटीचा मार्ग चोखळण्याचं ठरवलं तर आजच्या जगांत तरी अन्यायाला फारशी जागा राहणार नाहीं. कारण अन्यायापासूनच अन्यायाची उत्पत्ति होते आणि अत्याचारापासूनच अत्याचार वाढत असतो.

परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत अशी आदर्श परिस्थिति सापडणं दुरापास्त आहे. सर्वत्र विषमता भरलेली दिसून येते आणि निरनिराळ्या लोकांच्या न्यायान्यायाच्या, बऱ्यावाइटाच्या कल्पनांतहि विलक्षण तफावत आढळते. त्यामुळें न्यायाचा आणि सचोटीचा सरळ राजमार्ग दाखवणंहि अशक्यप्राय होऊन जातं. एखाद्या आचारसूत्राप्रमाणें चालायचं म्हणलं तरी एका विशिष्ट मर्यादेपलीकडे तें निरुपयोगी किंबहुना अनर्थावह आहे असं कळून येतं. न्यायाचा राजमार्ग नाहीं तर वळणावळणांनींच आपल्याला गेलं पाहिजे याची साक्ष पटते. एखाद्या महान् तत्त्वानुसार कठोरपणानं आचरण करणाऱ्या थोर विभूतीच्या जीवनांत कित्येक वेळीं एक प्रकारची विसंगति आपल्याला पाहावयास मिळते, त्याचं कारण तरी दुसरं काय असूं शकेल? आपल्यावरून जग ओळखावं या उत्कृष्ट नियमाचा देखील तारतम्य न ठेवतां सरसकट उपयोग केल्यास एखादें वेळीं कसा गोंधळ होऊं शकतो याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधि एकदा मला मिळाली. तो प्रसंग जसा उद्बोधक तसा मनोरंजकहि होता.

दुपारचे दोन वाजण्याची वेळ होती. मी आपलं नियोजित काम आटोपून जवळच असलेल्या माझ्या कोठडींत पुस्तक वाचीत पडलों होतों. दुसरे कैदी आपलं काम अद्याप करीतच होते. कोणी अधिकारी फिरतीवर आल्यास त्यांनीं मला वर्दी द्यावयाची असा संकेत होता.

“ वकीलसाहब, यह देखो आपको कोई मिलने आया है. आपका मुल्की

है. ( वकीलसाहेब, आपणांस कोणी भेटावयास आला आहे. तुमच्या देशाकडला आहे. ) बखत्यारअल्लीनं एकाएकीं वर्दी दिली.

" मेरा मुल्की ? " ( माझ्या देशाकडला ? ) मीं पडल्यापडल्याच प्रश्न केला.

" जी हाँ ! आपका मुल्की. कोई मराठा है " ( होय साहेब, आपल्या देशाकडला. कोणी महाराष्ट्रीय आहे. )

मी चटकन् उठून बाहेर आलों. माझ्यासमोर आपल्या काळ्या टोपीबरोबर स्वतःच्या रंगानं जणूं स्पर्धा करीत असलेला एक बुटकासा इसम वॉर्डरसमवेत उभा असलेला मीं पाहिला. मीं म्हटलं,

" क्या है भाई ? " ( काय आहे रे बुवा ? )

" दादा, वाइच कागुद लिवायचा व्हता. " त्यानं नम्रपणानं उत्तर दिलं. मला नकळतच एक प्रकारचा आनंद झाला. परमुलुखांत आपली भाषा बोलणारं माणूस भेटलं म्हणजे किती आनंद वाटतो हें अनुभवावांचून समजणं कठीण आहे.

" कुठला राहणारा रे तूं ? " मीं आपलेपणानं त्याची विचारपूस करून त्याला खालीं बसण्यासाठीं खूण केली.

सोलापूरच्या क्रिमिनल सेटलमेंटमध्यें राहात असलेला तो एक मांगगारुडी असून चोरीच्या गुन्ह्यावरून त्याला दोन वर्षांची शिक्षा झाल्याचं त्यानं मला सांगितलं.

" पत्र कुणाला लिहायचं सांग पाहूं ? " मीं विचारलं.

" शेटलमेंटमंदीच लिवायचं माझ्या बायकोला. अन् जरा..." असं म्हणून तो जरा थांबला.

" जरा काय ? " मीं उत्सुकतेनें विचारलं.

" हें बगा दादा, मला येऊनशानी आतां चांगलं सा मयनं झालं; पन तिची काईंबी बातमी कळली न्हाई. माझा जीव आपला वढ घेतो तिच्या-

कडे. तिला त्याचं काई न्हाइ म्हना ! अन् काल रातीं पोरावरनं लय वंगाळ सपान पाह्यलं म्यां. त्याच्यापासून काळजी लागलीय् बगा. " हें सर्व सांगत असतांना त्याचा गळा दाटून आलेला आणि डोळे पाण्यानं भरून आलेले मीं पाहिले. मला त्याची दया आली.

" चांगलं लिहितों बरं. तूं कांहीं काळजी करूं नको. " असं म्हणून मीं त्याला धीर दिला आणि पत्र लिहिण्यासाठीं साहित्याची जुळवाजुळव केली.

नांव विचारतां आपलं नांव " भाग्या मळ्या " असल्याचं त्यानं सांगितलं. मांग-गारुडी होता हें लक्षांत घेतां त्यामध्यें अनपेक्षित असं कांहींच नव्हतं. त्याच्या नांवावरून त्याच्या बायकोचं नांव काय असूं शकेल याबद्दल क्षणभर मीं तर्क केला आणि ज्या वेळीं त्याच्या तोंडून तें मला कळलं तेव्हां मी अगदीं थक्कच झालों. तिचें नांव " हिरकणी " असं होतं. कित्येक वेळीं काल्पनिक गोष्टींपेक्षां प्रत्यक्ष परिस्थिति जास्त चमत्कृतिपूर्ण आणि विचित्र असतें असें म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. " भाग्या मळ्याची " अर्धांगी एक हिरकणी असेल अशी कल्पना चुकूनसुद्धां सुचली मला नव्हती. मी जें लिहीत आहें त्यांत यत्किंचितही अतिशयोक्ति नाहीं, ती एक सत्यकथा आहे.

त्याची सर्व हकीकत ऐकून व केविलवाणी मनःस्थिति अजमावून मीं त्याच्या बायकोच्या नांवानं एक पत्र लिहिलं. " आपल्यावरून जग ओळखावं " या म्हणीप्रमाणं आपणच आपल्या प्रियेचं मन आळवण्याचा प्रयत्न करीत आहों अशी कल्पना केली. दुसऱ्याचं दुःख त्याच्या परिस्थितींत जाऊन त्याच्याशीं समरस झाल्यावांचून कसं समजणार ?.क्षणभर एका विरही मनुष्याची भूमिका मीं स्वीकारली आणि अशी कल्पना केली, कीं आपली अर्धांगी आपल्यावर रुष्ट आहे, तुरुंगांत येऊन सहा महिने झाले तरी तिनं एक बोटभर चिठ्ठीदेखील पाठवली नाहीं अगर मुलांची खुशालीहि कळवली नाहीं, त्यामुळं आपल्या छकुल्याची आपणास सारखी आठवण होत आहे

आणि आपण आपल्या प्रियेच्या दर्शनासाठीं अत्यंत आतुर झालों आहों. अशा भूमिकेवरून मीं तें पत्र लिहिलं आणि त्याला वाचूनहि दाखविलं. त्यालाहि तें पसंत पडलं असं त्या क्षणीं मला वाटलं, पण आजच्या घटकेला मात्र माझी अशी खात्री आहे, कीं त्यामधील बराचसा भाग आणि त्यामागची भावना त्याला मुळींच समजली नव्हती. तें सर्व पत्र इथें देण्याची आवश्यकता नाहीं. ज्यांनीं आयुष्यामध्यें कधीं काळीं कोणावर प्रेम केलं असेल आणि ज्यांना प्रियाराधनेकरितां एखादं पत्र लिहावं लागलं असेल त्यांना त्याची कल्पना करतां येईल. माझ्या पत्रांतील शेवटचा भाग असा होता—

"...कांहीं झालं तरी तूं माझी बायको आहेस. मला तुझी आठवण झाल्याशिवाय कशी राहील ? आपण आपल्या छकुल्यांसह एकत्र राहात होतों त्याची मला पुनःपुनः आठवण होते आणि तसे दिवस पुन्हां येतील का, असा विचार येऊन मन खिन्न होतं. तशांतच काल पहाटे आपला हरि आणि इंद्रायणी यांच्यासंबंधीं जें वाईट स्वप्न मीं पाहिलं त्यामुळं माझा जीव अगदीं कासावीस झाला आहे. म्हणून आतांपर्यंत माझ्याकडून ज्या चुका झाल्या असतील त्या विसरून आणि सर्व राग सोडून उलट टपालीं मुलांची खुशाली कळवावी. कळावें.

तुझा

भाग्या मळ्या"

पत्र लिहून कित्येक दिवस लोटले; मला त्याची आठवणहि राहिली नाहीं. सुमारें एक महिन्यानंतर पुन्हा एकदां जेव्हां भाग्या मळ्या आमच्या वॉर्डांत येऊन ठेपला तेव्हां मला सर्व प्रसंगाची आठवण झाली. त्यानं अत्यंत अदबीनं रामराम केला आणि एक पत्र माझ्या हातांत देत तो म्हणाला—

"आज ह्यो कागद आलाय्."

आपल्या पत्राचा काय परिणाम झाला हें जाणण्याची मलादेखील उत्सु-

कता असल्यामुळं मीं चटकन् तें पत्र घेतलं आणि वाचायला सुरवात केली. पाहिल्या चार ओळी वाचूनच मी अगदीं गार पडलों ! थोडा वेळ विश्रांति घेतल्याशिवाय माझ्याच्यानं तें पुढं वाचवलं नाहीं. पत्र जसंच्या तसंच दिल्यास वाचक मजवर अश्लीलतेचा आरोप करतील; पण तो धोका पतकरूनहि मी त्यांतला बराचसा भाग जसाच्या तसा देण्याचं धाडस करीत आहें—

" तुझं ता. XX चं पत्र पावलं. एवढी मुलांची माया व्हती तर चोरी करून तुरुंगांत रे कशाला गेलास मेल्या ? अन् XX तूं कोण रे मला बायको म्हननार ? बोलूनचालून मी तुझी ठेवलेली ! तुला काय हक बायको म्हनायचा ? तुझी ती मुंबयची पेसलवाली हाए XX ।तिला वाटलं तर म्हन बायको. ह्न्या अन् इंद्रानी मजेमंदी हाएत. तुझा ह्न्या तिला लय मारतो; मग मीब्री त्याचं चांगलं सालडं काढतें. मी आतां घोंड्याच्या गटारावर कामाला हाए. एक सरी केली म्यां आपल्याला. आमी खाऊनपिऊन टेचमंदि हाओं. अन् सुटल्यावर तूं काइ इकडे येऊं नको. आपलं शेटलमेंट बदलून घे. इकडं आलास तर तुझा मुडदाच पडनार बग.

हिरकणी

पत्र वाचून मला फार आश्चर्य वाटलं ! भाग्या मळ्याची कींव आली ! लिहिणारानं तरी असं पत्र कसं लिहिलं असा विचार आला; पण लगेच एक कल्पना सुचली.

" तुझ्या बायकोला लिहितांवाचतां येतं का रे ? " मीं त्याला विचारलं.

" येतं कीं दादा. तीच तर पत्र लिवते. चार यत्ता झाल्यात तिच्या. " त्यानं किंचित् अभिमानानं सांगितलं. त्याचं उत्तर ऐकून माझ्या प्रश्नाचा उलगडा झाला. तिच्या सांगण्यावरूनच पण एकाद्या वयस्थानं पत्र लिहिलं असतं तर इतका शिवराळपणा खचित केला नसता. पण तिची तीच लिहिणारी असल्यामुळं तिनं कोणताच विधिनिषेध पाळला नव्हता अगर आडपडदाहि ठेवला नव्हता. जें मनांत येईल तें निःसंकोचपणानं लिहून टाकलं

होतं. तिच्या सरळ स्वभावाबद्दल आणि मनाच्या मोकळेपणाबद्दल तशा परिस्थितींतहि मला मोठं कौतुक वाटलं. त्याचप्रमाणं आपल्या बायकोला लिहितांवाचतां येतं याबद्दल सकारण अभिमान बाळगणाऱ्या निरक्षर भाग्या मळ्याबद्दलहि मला आदर वाटला. शिक्षणामधें आपली बायको आपल्या-पेक्षां पुढें आहे याबद्दल पांढरपेशा वर्गातील किती नवऱ्यांना मनापासून आनंद होईल ? असो.

पत्र वाचून मी तर थंडच पडलों होतों ! आतां तें भाग्याला कसं वाचून दाखवावं हा प्रश्न होता ! पत्रांतील मजकूर ऐकून त्या बिचाऱ्याची काय स्थिति होईल याची मला कल्पना करवेना ! यापेक्षां तिनं पत्रच पाठवलं नसतं तरी बरं झालं असतं असं मला वाटलं. पण आतां त्याला काय इलाज होता ? त्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्याला खोटाच मजकूर वाचून दाखविला तर काय हरकत आहे ? असाहि एक विचार आला. पण तसं आपण केलं आणि त्यानं तें पत्र दुसऱ्याकडून वाचून घेतलं तर मीं ती कल्पना सोडून दिली आणि प्राप्त कर्तव्य म्हणून कठोर अंतःकरणानं पत्र वाचण्यास सुरवात केली.

पत्र वाचून पुरं होईपर्यंत मीं वर पाहिलें नाहीं. त्याच्या तोंडाकडे पाहाण्याची माझी छातीच झाली नाहीं ! संकटांत पडलेल्या मनुष्याचा एकच एक आधार असावा आणि तोच तुटल्याचं सांगण्याचं काम आपल्या नशिबीं यावं तसा प्रकार होता ! इथं तर परिस्थिति त्याहूनहि वाईट होती. एक वेळ आपल्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यूची बातमी आपण धैर्यानं ऐकून घेऊं; पण ऐन वेळीं त्या व्यक्तीनं आपल्याला झिडकारलं तर तें दुःख सहन करणं फार कठीण आहे. पत्र वाचून झाल्यावर हलकेंच मीं त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. त्याच्या डोळ्यांवाटें अश्रु वाहात असतील किंवा त्याचा चेहरा संतापानं लाल झाला असेल अशी माझी कल्पना होती. पण काय चमत्कार पाहा, भाग्याला यांपैकीं कांहींच झालं नव्हतं. उलट त्याच्या तोंडावरून

त्याला थोडंफार समाधान झालं असावं असंच दिसलं. त्याच्या चेहऱ्यावर हास्याची एक अंधुक छटा मीं पाहिली. मीं आश्चर्यानं अगदीं थक्कच झालों. मीं त्याला म्हटलं,

" भाग्या, अशी काय रे तुझी बायको ? तिनं तर तुला सोडचिठ्ठी दिलेली दिसते ! "

" बायकोचं काय वकीलसाहेब ? एक सोडून छप्पन बायका मी करीन " त्यानं तडकाफडकीं उत्तर दिलं. आणखी गप्पा मारायला वेळ नसल्यामुळं तो तसाच निघून गेला. पत्रहि माझ्या हातांत तसंच राहून गेलं.

या एकंदर घटनेबद्दल मला मोठा आचंबा वाटला. आपल्या मनावरून त्याच्या मनोव्यापारांची कल्पना करण्यांत आपली फसगत झाली ही गोष्ट मला कळून चुकली. मला त्याच्या मनःस्थितीची कल्पनाच करतां येईना.

बायकोनं टाकून लिहिलं, सोडून दिलं, इतकंच काय—पण तिनें मारण्याची देखील धमकी दिली, तरी त्याला कांहींच कसं वाटलं नाहीं. उलट तो दुसऱ्या बायका करण्याची भाषा बोलूं लागला ! मृत पत्नीच्या शवाला अग्नि देऊन परत येतानांच दुसऱ्या लग्नाचं सूतोवाच करणाऱ्या नवऱ्यांच्या गोष्टी मीं ऐकल्या होत्या; पण माझा त्यांच्यावर विश्वास बसत नसे. आजच्या प्रकारानं मात्र माझ्या पतिपत्नींच्या प्रेमासंबंधींच्या कल्पनांना चांगलाच धक्का बसला. खरोखर, एकनिष्ठ प्रेमाला जगांत कांहींच किंमत नाहीं का ? एकनिष्ठपणा हा सद्‌गुण समजून त्याची थोरवी गाण्यांत आपली चूक तर होत नाहींना ? एकान्तांत जन्मभर झुरत राहाणाऱ्या एखाद्या विरही मनुष्यापेक्षां भाग्या मळयाच जास्त सुखी आणि शहाणा नव्हे का ? आपण ज्या नैतिक मूल्याचे गोडवे गातों तीं मूल्यं तरी काय आहेत ? सद्‌गुण अशी वस्तु तरी जगांत आहे का ? कीं सर्वच लोक केवळ वैयक्तिक स्वार्थामागं लागलेले आहेत ? असे अनेक प्रश्न एकामागून एक मनांत येऊन मन अगदीं अस्वस्थ आणि उदास झालं. मनाला थोडा विरंगुळा पडावा म्हणून

मी उठलों आणि एका कैदी मित्राकडे गेलो. त्याला पत्रासंबंधींची इत्थंभूत हकीगत सांगितली व पत्रहि त्याला वाचावयास दिलं. पत्र वाचून तो पोट धरून हसूं लागला. मला त्याचं आश्चर्य वाटलं, किंचित् रागहि आला आणि मी त्याला म्हणालों,

" हसतोस काय ? इतका आनंद होण्यासारखी का गोष्ट आहे ही ? "

" हसूं नको तर काय रडूं ! मला तुझीच मोठी गंमत वाटते ! हे पुस्तकी विद्येचे आणि कृत्रिम जीवनाचे परिणाम आहेत. जनतेशीं समरस होण्याच्या भरांत आपण सुशिक्षित मंडळी कित्येक वेळीं अत्यंत भावुक आणि आतिरेकी बनतों. खऱ्या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करतों आणि आपल्या हृदयांत ज्या भावना उठतात त्यांचा आरोप इतरांच्यावर करून अशी फसगत करून घेतों. असं झालं म्हणजे निराश होऊन जगांत कांहीं राम नाहीं असं प्रतिपादण्यास सुरवात करतों. सर्वांनाच एका मापानं मापणं बरोबर होणार नाहीं. मानवी जीवन विविध आहे. मनुष्याच्या जीवनावर एकाच भावनेचं अधिराज्य चालत नसतं. " त्यानं एक छोटंसं व्याख्यानच दिलं.

" असं आहे तर सांग पाहूं भाग्या मळ्याच्या जीवनांत कोणत्या भावनेचं प्रभुत्व आहे तें ? " मीं त्याला अडविण्याच्या हेतूनं विचारलं.

" हें पाहा, तें मला एकदम सांगतां येणार नाहीं. आपल्याला तें शोधून काढावं लागेल. " त्यानं अत्यंत धीमेपणानं जबाब दिला.

मला त्याच्या बोलण्यांत बराच सत्यांश असल्यासारखं वाटलं. मी आपलं डोकं खाजवून पाहूं लागलों बराच वेळपर्यंत. मला तें कोडं कसं सोडवावं याची कांहींच युक्ति सुचली नाहीं. पण कांहीं वेळानं माझ्या डोक्यांत सहज कल्पना आली आणि भाग्या मळ्याला विचारून ती पडताळून पहाण्यासाठीं मी अधीर झालों. माझ्या अपेक्षेप्रमाणं पत्र परत नेण्यासाठीं तो दुसऱ्याच दिवशीं माझ्याकडे आला. जरा वेळ अवांतर गप्पा मारल्यावर मीं हलकेंच विषयाला चालना दिली.

" काय रे भाग्या, हिरकणीचं तुझ्यावर प्रेम नाहीं, ती तुझी पर्वा करीत नाहीं याची तुला कल्पना होती तर तें पत्र कशाला लिहवलंस माझ्याकडून " मी विचारलं.

" प्रेम अन् बीम मला काई कळत न्हाई. अन् तिला माझी पर्वा नाहीं तर मला तरी तिची पर्वा कुठं आहे ! " तो म्हणाला.

" होय, तें तर तुझ्या बोलण्यावरून दिसलंच ! पण मग पत्र तरी कशाला पाठवलंस ? " मीं पुन्हां त्याला तोच प्रश्न केला.

" बायकोचं काइ न्हाई; पन पोरासाठीं जीव तुटतो ना दादा ! " तो सद्‌गादित अंतःकरणानं म्हणाला. त्याच्या आवाजांत पुन्हां एक वेळ भावनेचा ओलावा दिसून आला. माझी कल्पना बरोबर असल्याची साक्ष पटली. पोरांच्या प्रेमापायीं त्यानं मला पत्र लिहायला सांगितलं होतं. बरेच दिवस खुशाली न कळल्यामुळं आणि वाईट स्वप्न पडल्यामुळं त्याला त्यांची काळजी लागली होती. पत्रांत त्याला जरी शिव्यांचा आहेर होता, तरी पोरांची खुशालीहि होती आणि त्यामुळंच पत्र ऐकून त्याच्या चित्ताला थोडंफार समाधान झालं होतं.

माझ्या मित्रानं सांगितलेली गोष्ट खरी होती. स्त्री-प्रेमाला त्याच्या जीवनांत विशेष महत्त्व नव्हतं; तिच्या प्रेमळ सहवासाची त्याला पर्वा नव्हती. वात्सल्याची भावनाच जास्त प्रभावशाली होती. त्या भावनेवरच त्याच्या जीवनाचीं चक्रं फिरत होतीं. त्यांवरच त्याचं सुखदुःख पुष्कळ अंशानं अवलंबून होतं. अशा परिस्थितींत आपल्यावरून दुसऱ्याच्या मनाची कल्पना करणं बरोबर होईल का ?

# बंदी जीवनांतील एक आठवण ७

मनुष्याचं मन हें एक कोडं आहे. त्याची गुंतागुंत सोडवणं फार अवघड काम आहे. मानसशास्त्राला तरी कधीं काळीं त्याचा पूर्ण उलगडा होईल कीं नाहीं कोण जाणे! मनाचे कित्येक व्यापार तर आपल्याला नकळत असेच चाललेले असतात. एकादे वेळीं एक प्रकारच्या गूढ उदासीनतेनं तें पूर्णपणें आच्छादून जातं.

तुरुंगांतील त्या दिवसाची मला चांगली आठवण आहे. कां कुणाला ठाऊक, पण मला त्या दिवशीं फार उत्साह वाटत होता. एक प्रकारच्या मधुर भावनेनं मन कसं भारल्यासारखं झालं होतं. संध्याकाळची वेळ होती ती. मी आपल्या कोठडींत पथारी पसरून वाचीत पडलों होतों. हळूहळू सूर्यप्रकाश नाहींसा झाला. मीं पुस्तक बंद केलं आणि त्या छोट्या कोठडींत

येरझारा घालूं लागलों. आज मनाला एवढा उल्हास वाटण्याचं काय कारण? मी विचार करूं लागलों; आणि विचार करतां करतां किती वेळ झाला याचं देखील मला भान राहिलं नाहीं. शेजारच्या माझ्या सिंधी मित्रानं मला पुकारलं तेव्हां मी आपल्या तंद्रींतून जागा झालों.

' मास्टरसाहेब, क्या पढ रहे हो ? अरे भाई, ज्यादह पढना ठीक नाहीं. दिमागमें कीडे पड जायेंगे. ' असें म्हणून तो खूप मोठ्यानें हंसला. माझ्या वाचनाच्या आसक्तीबद्दल तो नेहमीं अशा प्रकारची कांहींतरी चेष्टा करीत असे. त्याच्या विनोदी स्वभावाची मला मोठी गंमत वाटे.

' कौन ? करीमबक्ष, आगया क्या ? ' मीं विचारलं.

' आगया क्या ! मुझे आये तो एक जमाना हो गया. न मालूम आप किस धुन में रहते हैं ! अजितसिंग का क्या हाल है ? ' ( आलास का काय विचारतां ? मला येऊन एक युग झालं ! तुम्हीं कोणत्या विचारांत मग्न असतां कांहीं कळत नाहीं ! अजितसिंगाची काय बातमी आहे ? )

माझ्या एका बाजूला करीमबक्ष आणि दुसऱ्या बाजूला अजितसिंग असं आमचं त्रिकूट असे. तुरुंगामध्यें ज्या हजार भानगडी कराव्या लागतात, त्या करून आम्ही तिघांनीं एका रांगेच्या आणि सलग अशा खोल्यांत आमचं बस्तान बसवलं होतं. करीमबक्ष तुरुंगाच्या बाहेर कामाला जात असे. रेल्वेच्या वॅगनींतला माल उतरविण्या–चढविण्याचं फार मेहनतीचं काम त्याला करावं लागे. आणि परत यायलादेखील त्याला खूप उशीर होत असे. आल्यावर त्यानं आमची विचारपूस करावी आणि मग तिघांनीं मिळून आपापल्या खोलीच्या दरवाजाशीं बसून थोडा वेळ गप्पागोष्टी आणि थट्टा-मस्करी करावी असा आमचा कार्यक्रम असे.

अजितसिंग हा एक टेररिस्ट पक्षाचा पंजाबी तरुण होता. अगदीं भर जवानीमध्यें म्हणजे वयाच्या एकविसाव्या वर्षीं त्याला शिक्षा झाली आणि तीसुद्धां जन्मठेपेची ! मोठ्या उमद्या स्वभावाचा होता तो. गाण्याचा त्याला

विशेष शोक असे. मलादेखील गाणं ऐकण्याची फार आवड आहे. तुरुंगामध्यें त्याची फार जरूरी वाटते. कैद्याचं मन कोमल भावनांचं भुकेलं असतं आणि अशा वेळीं कोणीं एकादं गोड गाणें ऐकवलं तर फार बरं वाटतं. परिस्थितीचा विसर पडण्याला गाण्यासारखं दुसरं साधन नाहीं. संध्याकाळीं सर्व कैदी आपापल्या खोल्यांत बंद होऊन सर्वत्र सामसूम झालं म्हणजे कोणीतरी गाणं म्हणावं असं मला नेहमीं वाटे. तरीपण मी अजितला गाण्याचा सहसा आग्रह करीत नसे. त्याचा स्वभाव प्रेमळ तसाच फार हळवा होता. त्यानं गाणं म्हणायला लागावं आणि पहारेवाल्यानं येऊन त्याला चार शब्द ऐकवावे हें माझ्या स्वभावाला आवडत नसे. पण त्या दिवशीं माझ्या मनला थोडासा उन्मादच झाला होता, असं म्हणायला हरकत नाहीं. चांदणं फार सुरेख पडलं होतं. आमच्या सुदैवानं चंद्रकिरण थेट गजांतून येऊन आमच्या खोल्यांतून प्रवेश करीत असत. प्रकाशाची किंमत काय आहे, तें अंधारांत जीवन कंठावं लागल्याशिवाय समजणार नाहीं— आणि त्यांतहि शीतल चंद्रप्रकाशाचं काय वर्णन करावं ? पौर्णिमेचं चांदणं म्हणजे आम्हांला एक मोठी दौलत वाटायची. उन्हाळ्याचे दिवस होते. चंद्रप्रकाशाबरोबर मंद मंद वाराहि वहात होता. वृत्ति उन्मादित झाली आणि मीं म्हटलं,

‘ कहिये अजितसिंग, मिजाज तो अच्छा है ? ’

‘ जी हां. क्यूं न होगा. थंडी हवा चल रही है और तिपसर भी यह चांदनी. गोया दूध बरस रहा है.’ (होय, ठीक आहे. कां नाहीं असणार ? गार वारा सुटला आहे आणि त्यांतच हें चांदणं जणुं कांहीं दुधाचा वर्षाव करीत आहे. ) त्यानं उत्तर दिलं.

‘ अच्छा तो कुछ गानावाना सुनायेंगे ? ’ ( बरं मग गाणंबिणं ऐकवणार का ? )

‘ गा ’ म्हटलं म्हणजे अजितसिंग कधीं ‘ नाहीं ’ म्हणायचा नाहीं हें मला ठाऊक होतं. काकोरी खटल्यांत फांशीची शिक्षा झालेला प्रसिद्ध क्रान्ति-

कारक रामप्रसाद बिसमिल याची एक गजल म्हणण्यास त्यानं सुरवात केली. ही गजल फांशी जाण्याच्या आदल्या रात्रीं लिहिलेली आहे असें म्हणतात. त्याचा आवाज फार गोड होता असं नाहीं; पण तो गाणं इतकं पद्धतशीर आणि तन्मय होऊन म्हणत असे, कीं सर्वांना तें सारखं सारखं ऐकावंस वाटे. गातां गातां तो खूप रंगांत आला. स्वतःला विसरून गेला होता अगदीं. मीदेखील हळूहळू गाण्यांतील भावनेशीं एकरूप होऊन टाळी वाजवून ठेका धरण्यास आरंभ केला होता.

" काश, अपनी जिन्दगी में हम यह मंजल देखते. ' ( आम्ही आपल्या आयुष्यांत आमचं ध्येय गांठलेलं पाहिलं असतं तर किती बरं झालं असतं ? ' काश ' याचं बरोबर भाषांतर इंग्रजींतल ' Would that ' या शब्दांनीं करतां येईल. ) ही ओळ तो आळवीत होता. पण ओळ पुरी होण्यापूर्वीच एका कर्कश व कठोर आवाजानं रंगाचा बेरंग केला ! रात्रीच्या शांत वातावरणांत एकदम वीज कडाडल्यासारखं झालं !

' कौन चीखता है ? गाते हो, तालिया बजाते हो, क्या जेल है की धरमशाल ? ' पहारेवाल्याचा आवाज होता तो ! त्यानं वीणेच्या तारा तडातड तोडून टाकल्या ! मधुर आलापांनीं रचीत आणलेल्या सुंदर कलाकृतीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या ! माझ्या मनाला चरका बसला ! कधीं नव्हतं तें आज गाणं म्हणायला सांगितलं आणि त्याचं हें असं झालं ! बरं, एवढ्यावरच संपलं असतं तरी हरकत नव्हती, पण करीमबक्षानं आणखी शहाणपणा केला.

'लछमनसिंग, क्या वकीलसाहबको भी तुम टोकते हो ? (काय, वकीलसाहेबांनासुद्धां दटावतोस ? ' ) त्यानं शिष्टपणानं विचारलं.

' भाइ, यहां वकीलसाब वगैरे हम कुछ जानते नहि. इधर तो या अमीर हो या गरीब सब कैदी है; एकसरीके है.' (वकीलसाहेब वगैरे मी ओळखत नाहीं. इथं श्रीमंत असो किंवा गरीब असो, सर्व कैदी आहेत. सर्व सारखे आहेत. ) असं म्हणून आपला दंडा आपटीत चालता झाला. त्यानं

दंडा दगडावर आपटला खरा; पण तो आमच्या हृदयावर लागला हें त्या बिचाऱ्याला कसं कळावं? आमचं हृदय जर त्या दगडाप्रमाणं कठीण असतं तर किती बरं झालं असतं? किंबहुना तें तसं व्हावं अशीच तुरुंगांतील अधिकाऱ्यांची अपेक्षा असते. एका जेलरनं मला तसं बोलूनहि दाखविलं होतं. आणि त्या वेळीं तर मी 'ब' वर्गाचा कैदी होतों. असो. झालेल्या प्रकारानंतर कांहींतरी बोललं पाहिजे म्हणून मी अजितसिंगाशीं वरकरणीं थोडसं बोललों. पण बोलण्यामध्यें आमच्यापैकीं कोणाचंच लक्ष नव्हतं. मी त्याला 'गुड नाईट' करून आपल्या बिछान्यावर येऊन पडलों.

चंद्र वर निघून गेल्यामुळें खोलीमध्यें आतां अंधार झाला होता. चंद्र-प्रकाशाबरोबरच सायंकाळचा उल्हासहि पार मावळून गेला! वादळापूर्वीची शांतताच ठरली ती. अखेरीस पडल्या पडल्या तुरुंगांतील जीवनाचा मी विचार करूं लागलों. खरंच, तो शिपाई म्हणाला त्यांत काय खोटं होतं? हा तुरुंग आहे; इथं माणसामाणसामध्यें भेदभाव नाहीं; सर्व कैदी आहेत; आणि सर्वांचे हक्कहि सारखेच. माझ्या बुद्धीला या सर्व गोष्टी पटल्या होत्या. आणि म्हणूनच 'अ,' 'ब,' 'क' असे कैद्यांचे तीन वर्ग असूनहि 'क' वर्गांत रहाणं मला एका परीनं पसंत पडे. पण बुद्धीला एकादी गोष्ट पटली तरी मनाला ती पटेल असं थोडंच आहे? प्रत्यक्ष प्रसंग आला म्हणजे भावनांचा जोर होऊन मन त्याविरुद्ध बंड करतें. बुद्धीचं समाधान झाल्यावर मनाचं समाधान करणं अत्यंत अवघड काम आहे. आणि त्यांत यश येण्यासाठीं अविरत प्रयत्न करावा लागतो. वरकरणीं आम्ही इतर कैद्यां-बरोबर समानतेच्या नात्यानं वागत असतों, पण मनाच्या एका कोंपऱ्यांत आमचा अहंकार दडून बसलेला असतो. आपल्या दर्ज्याकडे, शिक्षणाकडे आणि गुन्ह्याकडे पाहून आपल्याशीं इतरांच्यापेक्षां जरा निराळ्या तऱ्हेनं वागावं असं आंतल्या आंत वाटत असतं. आमच्याशीं अधिकाऱ्यांचें जें वर्तन असतं त्यांत तसा थोडाफार फरक असतोहि. आणि त्यामुळंच लछमनसिंगासारख्यानं

कायद्याचं खरं स्वरूप उघड करून दाखवलं म्हणजे अंतस्थ दडून बसलेला अहंकार हळूच आपलं डोकं बाहेर काढून आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देतो. या अहंकाराला लगाम लावण्यांत आपल्याला जें कमीअधिक यश येईल, त्या प्रमाणांत आपलं तुरुंगांतील जीवन कमीअधिक सुखाचं अथवा कष्टाचं होईल. त्याला पूर्णपणें दडपून टाकून सर्वांशीं समरस होण्याची कला ज्याला साधली तो पारंगत झाला असं म्हणायला हरकत नाहीं.

या दृष्टीनं अजितसिंगाबद्दल मला फार वाईट वाटे. त्याला त्याचं सर्व आयुष्य त्या चार भिंतींच्या आंत काढायचं होतं. साहजिकच त्याला असं वाटे, कीं आपलं शिक्षण, कर्तबगारी, त्याग वगैरे गुणांकडे पाहून इतर कैद्यांनीं आपल्याला मान द्यावा आणि आपल्यावर प्रेमहि करावं. कित्येक वेळीं तर आपलीं नैतिक मूल्यं इतरांच्याहून वेगळीं आणि उच्च आहेत याची जाणीवदेखील तो इतरांना करून देई. त्या मूल्यांचा लोकांनीं अंगिकार करावा या सद्धेतूनंच तो असं करी; पण त्याचा परिणाम मात्र विपरीत होई. लोक त्याला मान देत, त्याला भिऊन वागत, पण त्यांचं त्यांच्यावर असावं तसं प्रेम नसे. आणि कांहीं प्रसंगानं ही गोष्ट त्याच्या नजरेस आली म्हणजे त्याचं मन उदास होई. आपलीं मूल्यं कायम ठेवूनहि सर्वसामान्य कैद्यांशीं समरस होण्याची कला त्याला साधली नव्हती. बोलतां बोलतां मी एकदां सहज म्हटलं कीं, 'आपण ज्या उच्चतर नैतिक मूल्यांची बढाई मारतों त्यांपैकीं कित्येक मूल्यं हीं केवळ वरच्या वर्गालाच शक्य असतात. त्यांची ती एक प्रकारची चैन आहे.' यां-वर आमचा किती वेळ तरी वादविवाद झाला. नीति म्हणजे काय ? त्रिकाला-बाधित, स्वयंभू अशीं कांहीं नैतिक मूल्यं आहेत किंवा काय ? वगैरे अनेक प्रश्नांची चर्चा झाली. वादविवादांतून निर्णयनिष्पत्ति होणं बहुधा अशक्यच असतं; तरीपण एका मुद्द्यावर त्याचं व माझं एकमत झालं. सत्य, ज्ञान, सौंदर्य, प्रेम, कृतज्ञता इत्यादि गोष्टी नित्य आहेत असं धरलं, तरी सुखवस्तु

लोकांनीं त्यांचा अर्थ सांगावा आणि गरिबांनीं तो मान्य करावा ही नैतिक मक्तेदारी जोंपर्यंत चालू राहील, तोंपर्यंत समाजजीवनांत खऱ्या नीतीचा विकास होणं अशक्य आहे. असो.

तुरुंगांत उच्चनीच भाव नाहींत, सर्व माणसं सारखीं आहेत, याची जाणीव लछमनसिंगानं आम्हांला करून दिली. असं म्हणतात, कीं मृत्यूच्या दरबारांत रावापासून रंकापर्यंत सर्वांना एकाच मापानं, मोजलं जातं ! 'मृत्यु न म्हणे हा भूपति, मृत्यू न म्हणे हा चक्रवर्ति,' 'Death is a mighty leveller !' मृत्यु सर्वांना सम पातळींत आणून सोडतो. मृत्यूच्या खालोखाल सर्वांकडे समदृष्टीनं पहाण्याचं कार्य कुठं पूर्ण होतं असेल तर तें तुरुंगामध्यें. मृत्यु आणि तुरुंग यांत एक प्रकारचं विलक्षण साम्य आहे. मनुष्याला सर्वांत जास्त कशाची भीति वाटत असेल तर ती मृत्यूची. मृत्यु प्रत्यक्ष पुढं येऊन उभा राहिला म्हणजे जीवनावर आपली किती आसक्ति आहे हें कळून येतं. यमराजाच्या हातांत केवढी सत्ता आहे ? इष्टमित्रांचे पाश तडातड तोडून एका क्षणांत तो मनुष्याला संसारावेगळा करून टाकतो ! तुरुंगांतील अधिकारी यांपेक्षां दुसरं काय करतात ? कित्येक कैदी त्यांना 'यमदूत' या नावानं संबोधतात त्याचं कारण याशिवाय दुसरं काय असूं शकेल ? ज्यांना ठराविक मुदतीच्या शिक्षा झाल्या आहेत अशांची गोष्ट क्षणभर बाजूला ठेवली तर जन्मठेपीची शिक्षा झालेल्या कैद्यांची पुन्हा एक वेळ बाह्य जगांत अवतार करण्याची आशा ही आशा नसून केवळ स्वप्न असतं. जगाच्या दृष्टीनं त्यांचा मृत्यूच झालेला असतो. मात्र बाह्य जगाकडे पहाण्याकरितां तुरुंगाच्या तटांत एक खिडकी ठेवलेली असते आणि ती मधून उघडण्यांत येतें. त्यामुळं कित्येक वेळीं सुखापेक्षां दुःखच अधिक झाल्यास त्यांत आश्चर्य करण्यासारखं कांही नाहीं. ज्या कोणाला मृत्यूच्यापुढं देखील निर्भयपणं उभं रहाण्याची महत्त्वाकांक्षा असेल, त्यानं तुरुंगाचा अनुभव एक वेळ अवश्य घ्यावा. विचाराची मजबूत भूमिका आणि उत्कट ध्येयनिष्ठा असेल तर ही गोष्ट मुळींच अशक्य नाहीं.

ह्या सर्व कल्पना विषण्ण मनामध्यें अगदीं झपाट्यानें येऊन गेल्या; पण लागलीच असा विचार आला, कीं तुरुंगांत हे अनुभव मिळतात हें खरं असलं तरी ज्यांची इच्छा नाहीं त्यांना मृत्यु येण्यापूर्वींच त्याच्या विक्राळ स्वरूपाची चुणुक दाखविण्याचा हा खटाटोप सरकारनं कशाकरितां आरंभला आहे. समाजाला तुरुंगाची काय आवश्यकता ? इतक्या लोकांना तिथं डांबून ठेवण्याचं प्रयोजन काय ? असं म्हणतात, कीं हे लोक गुन्हेगार आहेत; समाजामध्यें रहाण्यास नालायक आहेत; समाजबंधनं न पाळणारे म्हणून समाज-धारणेस विघातक आहेत; आणि म्हणूनच त्यांना समाजांत वावरूं देणं अनिष्ट आहे. हे सर्व लोक खरोखरच गुन्हेगार आहेत किंवा काय, हा देखील एक प्रश्नच आहे. पण तो प्रश्न क्षणभर बाजूस ठेवला आणि असं गृहीत धरलं, कीं या सर्व कैद्यांनीं समाजाचा अक्षम्य अपराध केला आहे, तरी तुरुंगांत त्यांना ज्या प्रकारानं वागवण्यांत येतं तसं वागवण्यानं समाजाचं कोणतं कल्याण होतं ? त्यांना शिक्षा करण्याचा उद्देश काय ? कोणी म्हणतात, कीं अपराधा-चं शासन म्हणून त्यांना शिक्षा करणं अवश्य आहे. कोणाच्या मतें इतर लोकांना वचक बसून त्यांनीं अपराध करूं नये म्हणून गुन्हेगारांस उदाहरणा-दाखल कडक शिक्षा देणें जरूर आहे; तर कांहीं लोक गुन्हेगारांस सुधारण्या-च्या उद्देशानं शिक्षा करावी असं म्हणणारे आहेत. वास्तविक पहातां शिक्षा देण्यामध्यें नेहमीं एकच हेतु असतो असं नाहीं. कोणत्याहि दंडविधानांत या सर्व हेतूंचा कमीअधिक प्रमाणांत समावेश असतोच. कोणत्या बाजूवर विशेष भर द्यावयाचा एवढ्यापुरताच काय तो फरक पडतो. तुरुंगामध्यें मीं जो अनुभव घेतला, त्यावरून माझी अशी खात्री झाली आहे, कीं शिक्षा देणाऱ्याचा हेतु कांहींहि असला तरी तुरुंगाच्या अधिकाऱ्यांच्या मनांत सूडाची भावनाच सर्वांत जास्त बलवत्तर असते. कैद्यानं समाजाचा अक्षम्य अपराध केला आहे आणि त्याला सतावणं हें आपलं कर्तव्यच आहे असं त्यांना वाटत असतं. कैदी म्हटला म्हणजे तो कैदी. त्याच्या जीवनांत थोडासा

आराम अनायासें होत असला तरी तो होतां कामां नये. त्या बाबतींत माझा स्वतःचा एक अनुभव सांगावासा वाटतो.

मी व माझे सहकारी कैदी जें काम करीत असूं त्या कामाकरितां रद्दीची (कागदाची) जरुरी असे. साहजिकच आम्ही त्या रद्दीचा आमच्या भाकरी वगैरे ठेवण्याकरितां उपयोग करीत असूं. एके दिवशीं आम्ही आमच्यापुढं कागद पसरून त्यावर भाकरी ठेवून दुपारचं जेवण करीत होतों. गप्पागोष्टी व थट्टाविनोद चालला होता. आम्ही आनंदांत होतों. हा प्रकार दुरून येणाऱ्या जमादारानं पाहिला. त्याच्याच्यानं आमचं क्षणिक सुखदेखील पहावलं नाहीं. तो थेट आम्ही बसलों होतों तिथं आला आणि त्यानं आमची हजेरी घेण्यास सुरवात केली! "तुम लोग कायदेकी तो कोंई परवा भी नहि करते! तुमोरेसे अच्छा सुलूक करने लगा तो तुम सर पर बैठ गये. कागज बिछाया है; उपर रोटी रख्खी हैं, आरामसे बैठे हैं. गोया घरमें रोटी खाने बैठे हैं!" (तुम्ही मंडळी कायद्याची कांहीं परवांच करीत नाहीं. तुमच्याशीं चांगलं वागूं लागलों तर तुम्ही डोक्यावर बसला. कागद पसरला आहे, वर भाकरी ठेवल्या आहेत आणि मोरे मजेमधें जेवण चाललं आहे. जसं कांहीं घरींच जेवायला बसले आहेत!) बाब अगदीं क्षुल्लक आहे पण तुरुंगाच्या अधिकाऱ्यांची वृत्ति त्यामधें चांगली प्रतिबिंबित झालेली आहे. कैद्यानं सुखानं रहावं म्हणजे काय? त्याला देतां येईल तितका त्रासच दिला पाहिजे. तुरुंगाच्या व्यवस्थेंत कांहीं महत्त्वाचा फरक करून तुरुंग कैद्यांना सुधारण्याच्या दृष्टीनं चालवायचे असल्यास जुन्या वातावरणांत वाढलेल्या सर्व अंमलदारांना प्रथम रजा द्यावी लागेल. कारण यापुढं त्यांच्या मनोवृत्तींत फरक घडवून आणणं जवळ जवळ अशक्यच आहे.

कैद्यांनीं गुन्हे केले असले तरी ते कोणत्या परिस्थितींत केले आहेत इकडे लक्ष पुरवायला नको काय? एक वेळ मनुष्यानं समाजाचं बंधन तोडलं तर तो कायमचा निरुपयोगी ठरतो काय? सर्वच कैदी पूर्णपणें सुधारूं शकतील

असं कोणीच म्हणणार नाहीं. तरीपण शेंकडा ऐंशी लोक सुधारण्यासारखे असतात असं मला वाटतं. प्रचलित पद्धतीमुळं मात्र तो सुधारण्याऐवजीं त्याच्या मनुष्यत्वालाच अजिबांत फांटा मिळतो. कैदी झाला तरी तो मनुष्यच आहे. त्याच्या हृदयांत इतरांप्रमाणें प्रेम, वात्सल्य, अन्यायाची चीड यांसारख्या भावना उठत नसतील असं कोण म्हणेल ? पण आजच्या तुरुंगांत त्या भावनांना वाव नाहीं. त्यांचा विकास तर नाहींच, पण त्यांना दडपून टाकण्याकडेच अधिकाऱ्यांचा कल दिसून येतो. जिथं अन्यायानंच कांहीं कामं करून घेण्यांत येतात, तिथं अन्यायाची चीड हा सद्गुण समजून कसं चालेल ? भिल्ल किंवा कातवडी म्हटला म्हणजे त्यानं भंग्याचं काम केलंच पाहिजे असा जिथं कायदा, आणि त्यानं तें नाकारलं तर त्याच्या पाठींत लाथ मारून तें करून घेणं हा जिथं उपाय, तिथं न्यायान्यायाच्या नाजुक भावनांना उराशीं बाळगून कसं भागणार ? प्रथम प्रथम कैद्याच्या देखत जेव्हां असले प्रकार घडतात तेव्हां त्याचं रक्त उसळूं लागतं. जुने अनुभवी कैदी त्याला आंवरण्याचा प्रयत्न करतात; पण कित्येक वेळीं रहावत नाहीं. जुलमाचा प्रतिकार करण्याचा तो प्रयत्न करतो आणि त्यांत एक वेळ थप्पड बसली म्हणजे स्वतःच्या अगतिकत्वाची त्याला जाणीव होते. हलकें हलकें त्याचं मन निढावतं, अन्याय हा शब्दच तो विसरून जातो; आणि असं झालं म्हणजे तो कैदी 'सुधारला' या सदरांत जमा होतो. तुरुंगामध्यें कैदी सुधारणं याचा अर्थ मनुष्यत्वालाच पारखा करून टाकणं असा आहे. असं असलं तरी निसर्गतः उत्पन्न होणाऱ्या भावना जतन करून त्यांना व्यक्त स्वरूप देण्यासाठीं कैद्याची धडपड चाललेली मात्र आपल्याला अनेक वेळीं पहावयास मिळते.

एकदां एका जन्मठेपीच्या कैद्यानं एक मांजर पाळलं होतं. त्याला तो तो हॉस्पिटलमधून दूध आणून घालीत असे. अर्थातच तिथं सर्व मोजलेलं आणि जितक्यास तितकं असायचं. चोरी करून किंवा दुसऱ्या कांहीं खट-

पटी करून त्याला तें आणावं लागे. पण हें किती दिवस चालणार? एक दिवस त्याचं कारस्थान उघडकीस आलं आणि त्याच्या आईमाईचा उद्धार झाला. शिव्यांच्या भडीमाराचं त्याला विशेष वाटलं नाहीं, पण आतां आपल्या मांजराचं कसं होईल' याबद्दल मात्र त्याच्या मनाला हळहळ वाटली!

यावरून बंदी जीवन म्हणजे नेहमींच काळ्या ढगांनीं व्यापेलेलं असतं असा कोणी ग्रह करून घेतल्यास तो चुकीचा होईल. उदासीन मनःस्थितींत प्रतिबिंबित झालेली त्याची ही एक बाजू आहे इतकंच. तुरुंग म्हटला तरी तिथं मनुष्यंच रहातात. त्यांच्या मनाची रचना इतरांच्यापेक्षां सर्वस्वीं निराळी असते असं म्हणायला कांहींच जागा नाहीं. कित्येक लोकांची तशी कल्पना असते ही गोष्ट मात्र तितकीच खरी आहे. एका कैद्यानं याबद्दल आम्हांला एक मजेदार अनुभव सांगितला. तो म्हणाला—"एकदां आमची एका तुरुंगांतून दुसऱ्या तुरुंगांत बदली झाली. सिंध प्रांतांतल्या एका गांवांतून आम्ही चाललों होतों. 'कैदी आले, कैदी आले!' म्हणून रस्त्याच्या कडेला कांहीं लोक जमा झाले. आम्ही चणे फांकीत, पायबेड्यांचा खळखळ आवाज करीत मारे मस्तपणानं चाललों होतों. आम्ही जवळ आल्याबरोबर जमावापैकीं एक बाई एकदम म्हणाली, 'यह काहेके कैदी? यह तो आदमी की तरह चने खा रहे है' (हे कसले कैदी! हे तर माणसासारखे फुटाणे खात आहेत.) तिला वाटलं होतं, कीं कैदी म्हणजे वाघ, सिंह, अस्वल यांसारखा सामान्य माणसांहून निराळा प्राणी असेल! निराशा झाली बिचारीची!"

असो. त्याची गोष्ट ऐकून मला मोठी गंमत वाटली. कैद्यांबद्दल अज्ञ लोकांच्या कशा खुळचट कल्पना असूं शकतात याचा तो एक मासलाच होता. सांगायचा मुद्दा असा, कीं कैदी हा एक मनुष्यच आहे असं धरल्यावर त्याचं मन नेहमींच उदासीन राहील हें संभवत नाहीं. येईल त्या परिस्थितींत आपला जम बसवून घेणं हा त्याचा स्वभावधर्म आहे. त्यामुळं आपल्या अंधारमय जीवनांत देखील तो आनंद निर्माण करावयास चुकत

नाहीं. आणि म्हणूनच मेघाच्छादित तुरुंगीय वातावरणांत प्रकाशकिरण डोकावल्यावांचून रहात नाहींत. तसं नसतं तर सर्व कैद्यांनीं आत्महत्त्याच करून घेतली असती. अधिकाऱ्यांना अर्थात् असंच वाटत असतं, कीं कैदी आत्महत्या करण्याच्या सुसंधीचा वाटच पहात असतो. बंद करण्यापूर्वी त्याची कसून झडती घेण्यांत हा देखील एक महत्त्वाचा उद्देश असल्याचं सांगण्यांत येतं. वास्तविक ते आपली फसवणूक करून घेत असतात. कैदी आत्महत्त्या करीत नाहींत याचं कारण त्यांच्याजवळ साधनं नसतात हें नव्हे. त्यांना वाटलं तर एक सोडून हजार साधनं त्यांच्याजवळ उपलब्ध असतात आणि ज्याला आत्महत्त्या करायचीच असते तो करतोहि.

पण सर्वसाधारणपणं आत्महत्या न करण्याचं खरं कारण म्हणजे संसारांतून त्यांचा जीव उडालेला नसतो; आशेचे किरण अजून शिल्लक असतात; जगावंसं वाटत असतं. बंदीजीवन कष्टमय आहे हें तर खरंच, पण त्यांतहि तो अनेक सुखसाधनं निर्माण करीत असतो. आणि तसं पाहिलं तर तुरुंगांत पडलेल्या बऱ्याचशा कैद्यांच्या दृष्टीनं बाह्य जगांत तरी असं काय सुखाचं ताट वाढून ठेवलेलं असतं? आजच्या परिस्थितींत बाह्य जीवन हें देखील तुरुंगाप्रमाणं झालेलं आहे. म्हणून माणसं कांहीं जीव द्यायला निघालीं नाहींत! कित्येकांना तर बाहेरच्यापेक्षां आंतच एक प्रकारची शाश्वति वाटते. तुरुंगांतील जीवन हें बाह्य जीवनाचा एक भाग आहे; आणि म्हणूनच तुरुंगसुधारणा हा प्रश्न फार बिकट झालेला आहे. असं सांगण्यांत येतं कीं तुरुंगामधील थोड्याशा सुखसोयी वाढविल्या तर पुष्कळ लोक भराभर तुरुंगांत येऊं लागतील. पण असं ह्मणणं म्हणजेच आजची समाजव्यवस्था नित्कृष्ट आणि कुचकामाची झाली आहे असं कबूल करणं आहे. याचा अर्थ इतकाच, कीं आज तुरुंगांत जी काय अर्धीकच्ची भाकरी मिळते, तेवढ्याची देखील समाजाला हमी घेतां येत नाहीं. त्याहून जास्त चांगल्या रहाणीची गोष्ट तर सोडूनच द्या. सारांश एकंदर समाजजीवनाशीं बंदी जीवनाचा

प्रश्न निगडित आहे आणि म्हणून बारीक सारीक सुधारणांचा प्रश्न सोडला तर आजच्या समाजाची आमूलाग्र पुनर्घटना केल्याशिवाय आपल्याला हवी तशी तुरुंग व्यवस्था अमलांत आणतां येणार नाहीं. तसं करण्याचा प्रयत्न करणाराला मात्र आज न उद्यां तुरुंगांत जावं लागेल हें निश्चित. स्वातंत्र्या-करितां झगडणाराला आहे नाहीं तें स्वातंत्र्य गमावून बसावं लागावं हा एक विलक्षण विरोधाभासच आहे.

## मालकांची मर्जी

## ८

अगदीं तिन्हीसांजची वेळ होती. कोल्हापुराहून आलेली मोटार जवळ जवळ साठ मैल चालून आलेली होती. आतां एक तासाच्या आंत आपण रत्नागिरीस पोंचूं अशी उतारूंस उमेद वाटत होती. पण मध्येंच अगदीं निर्जन स्थळीं ड्रायव्हरनें मोटार एकदम थांबविली. मोटार थांबतांच रानकिड्यांचा किर्रर असा कर्कश आवाज सुरू झाला. कातळावर वारा सूंसूं चालला होता. पावसाळ्याचे दिवस होते. आजूबाजूच्या शेतांत गवत कंबर-कंबर वाढलेलें दिसत होतें. वाऱ्याबरोबर येणारा रानझाडांचा मधुर वास चित्तवृत्ति उन्मादित करून सोडीत होता.

ड्रायव्हरनें आपल्या कपाळावरचा घाम पुसला व खिशांतून एक ' पिवळा हत्ती ' काढून सोसाट्यांच्या वाऱ्यांत मोठ्या शिताफीनें शिलगावला. एक-दोन झुरके ओढून तो शेतांमध्यें दूरवर पाहूं लागला; एकदोन वेळां त्यानें

हॉर्न दिला; तो कोणाची तरी वाट पाहात असावा असें दिसलें. थोड्याच वेळांत दोन अस्पष्ट आकृति जवळ येतांना दिसल्या. जवळ येतांच त्यानें प्रश्न केला,

'आज लई वेळ केलात ?'

'होय बाबा झाला खरा वकत. काल रातीं गाय इयाली, म्हटलं थोडी चार कापून न्यावी तिला.' असें म्हणून एका पोक्तशा शेतकऱ्याच्या बाईनें गवताचा एक लहानसा पेंढ मोटरच्या मागल्या फलाटावर उभा केला आणि ती म्हणाली—

'धकल्या, आज सकाळीं आला नाहींस रे ? तुझ्याकरितां खर्वस आणला होता.'

'त्याचं काय मोठं ! खर्वस उद्यां नाहीं कां मिळणार ?'

'तसं नव्हं रे. पण माणसाचा हिरमोड नाहीं का होत ? सरूला म्हटलं कीं भाकरीसंगं खाऊन टाक; पन ती कुठली खायला ? तिनं ती पुरचुंडी अजून तशीच ठेवली आहे.'

सरू ही तिची चौदापंधरा वर्षांची मुलगी होती. तिनें चटकन ती पुरचुंडी त्याच्या स्वाधीन केली. मायलेकी गाडींत बसल्या. गाडी सुरू झाली. उतारूंचा जीव खालीं पडला.

'अवंदा पीकपाणी बरं दिसतंय.' तो म्हणाला.

'हाय, पर पोरांच्या पोटांत जाईल तेव्हां खरं ! बामणाची कांहींतरी समजूत करायला हवी ना ?' तिनें प्रश्न केला.

'हांय, तें पण खरंच !' त्यानें एक सुस्कारा टाकला.

'धकल्या, चळवळ पुन्हां सुरू होणार म्हणून ऐकलं, खरं काय रे ? अवंदा पन तुम्ही दोघे जानार काय ? अरे, त्या म्हातारीकडे पण कांहीं बघा.' ती म्हणाली.

'आतांच, काय त्याचं ? बघतां येईल म्होरं!' असें म्हणून त्यानें पुन्हां एक वेळ मोटार थांबवली व मायलेकींस वाटेस लावलें.

धकट्याचा हा नित्याचा क्रम असे. त्याच्या घरीं तो, त्याचा मोठा भाऊ सखाराम व म्हातारी आई इतकीं माणसें होतीं. सखाराम बामणाची जमीन खंडानं करून तो प्रपंच चालवीत होता. धकट्याचं मराठी सहा इयत्तांचं शिक्षण होऊन तो मोटार ड्रायव्हरचें काम शिकला होता. त्या स्त्रिया त्याच्या गांवच्या होत्या. त्याचें गांव मोटारच्या रस्त्यावर होतें. दररोज सायंकाळीं त्यांना मोटारींत घालून गांवच्या वेशीवर पोंचविणें हा त्याचा नियमच झाल्यासारखा होता व त्यांत त्याला विशेष आनंदहि वाटे. कारण लहाणपणीं एकमेकांस योग्य अशी मुलामुलींची जोडी दिसली कीं, आपल्या मनानं त्यांचं लग्न लावून त्यांना चिडवावं असा जो प्रकार खेडेगांवांत आढळतो, त्याप्रमाणेंच धकट्याचें व सरूचें लग्न त्यांच्या घरच्या मंडळींनीं कधींच जमवून टाकलें होतें. लोकांच्या चिडवण्यामुळें त्याला राग येत नसून आंतल्या आंत गुदगुल्याच होत असाव्यात हें त्यांच्या वागणुकीवरून कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें होतें.

० ० ०

त्या गांवच्या महादेवाच्या देवळांत खेंच गर्दी झाली होती. रात्रीं रत्नागिरीच्या एका कॉंग्रेसभक्ताचें व्याख्यान व्हावयाचें होतें. आपल्या घोंगड्या खांद्यावर टाकून चुडी पाजळीत आणि दगडांवर कांठ्या वाजवून वाटेंतील कांड्याकिरड्यांस दूर होण्याचा इशारा देत एकामागून एक गांवकरी मंडळी जमा झाली. भाषणास सुरवात झाली. वक्त्यानें आपल्या आवेशपूर्ण भाषणाच्या शेवटीं 'तुमचा गांव मागं राहणार कीं कॉंग्रेसच्या हाकेला ओ देणार ?' असा प्रश्न केला आणि आपलें भाषण संपविलें.

थोडा वेळ सर्वत्र शांतता होती. प्रश्नाचें उत्तर कोणीच देईना. इतक्यांत एका कोपऱ्यांत कोणीतरी उभें राहिलेलें दिसलें. धकट्या व्यासपीठाजवळ

आला. लोक उत्कंठेनें त्याच्याकडे पाहात राहिले. जरा अडखळतच पण निश्चयी स्वरांत तो म्हणाला. ' ह्यांनीं सांगितलं तें अगदीं खरं आहे. ज्या सरकारनं आपणाला अन्नास मोताद करून सोडलं, तें गेलंच पाहिजे. कॉंग्रेसच्या हुकुमांप्रमाणं मी कायदेभंग करण्यास तयार आहें. मला हुकूम करा. '

लोकांनीं टाळयांचा कडकडाट केला. गांवकऱ्यांना आनंद वाटला. त्यांची लाज राखली गेली. पण त्या आनंदांतच दुःखाची बोचणी होती. कारण सर्वांचे डोळे व्याख्यानाच्या परिणामाकडे लागून राहिले होते.

परिणाम ठरलेला होता. रीतसर खटला होऊन त्याला एक वर्षाची शिक्षा झाली. लवकरच त्याच्या भावानेंहि तोच मार्ग स्वीकारला आणि तुरुंगाची वाट धरली. सर्वांना वाईट वाटलें; पण त्यांतल्या त्यांत त्याच्या म्हाताऱ्या आईला काय वाटलें असेल ? सरूला व तिच्या आईला काय वाटलें असेल ?

० ० ०

' काय बजाबा ? मुलीचं लग्न करायचा विचार आहे की नाहीं यंदा ? ' शिवरामपंतांनीं पान चघळीत चघळीत विचारलें.

खंड घालण्यासाठीं बजाबा आपल्या बामणाकडे आला होता. धान्याचीं ओझीं घेऊन त्याची मुलगी सरू व तिची आईदेखील आली होती त्याच्या बरोबर. शिवरामपंतांचा गडी धोंड्या धान्य मोजीत होता. जरा दूर सरू व तिची आई उभ्या होत्या. शिवरामपंत सरूकडे टक लावून पाहत होते; पण मध्येंच त्यांची व तिची दृष्टादृष्ट होतांच त्यांनीं तोंड वळवलें व वरील प्रश्न केला.

' विचार कां नाहीं ? पण अवकाश आहे जरा. ' बजाबांनीं उत्तर दिलें. त्याचें लक्ष मात्र धोंड्याच्या मापाकडे होतें.

' अरे, अवकाश कसला कर्माचा ! तरणीताठी पोर, लवकर उरकून घेतलेलं बरं. नाहींतर–' त्यांनीं वाक्य अपुरेंच सोडून दिलें आणि सरूकडे एक वेळ निरखून पाहिलें.

' माझ्या पोरीची नाहीं मला काळजी. मला तिची खात्री आहे. ' बजाबानें मोठ्या अभिमानानें उत्तर दिलें.

' आजकाल नेम नाहीं हो ! ' असें म्हणून शिवरामपंत मिस्किलपणानें हंसले. बजाबाचें तिकडे लक्ष नव्हतें. सरूच्या कपाळाला मात्र आंठ्या पडल्या. इतक्यांत माप संपलें आणि बजाबांनीं आपल्या अन्नदात्याची रजा घेतली.

शिवरामपंत जाणाऱ्या सरूकडे—विशेषतः तिच्या नितंब भागावर टक लावून पहात होते ! ती अदृश्य झाली, तरी बराच वेळपर्यंत त्यांनीं आपली विषयासक्त दृष्टि वळविली नाहीं. धोंड्या पाटसकर धान्याचीं पोतीं भरीत होता. अंगांत एक फाटकीशी कोपरी व ढुंगणाला एक मोठी लंगोटी या—शिवाय त्याच्या अंगावर दुसरें कांहीं नव्हतें. तो शिवरामपंतांचा गडी होता. त्याच्या घरच्या प्रत्येक पिढींतील एकएक जवान कर्जफेडीसाठीं शिवरामपंतांच्या घरीं गडी म्हणून राबावा असा आतांपर्यंतचा क्रम होता. शिवरामपंतांना त्यांच्या मास्तरांनीं इतरांपेक्षां अगदीं निराळ्या प्रकारचें अंकगणित शिकविलें होतें कीं काय अशीच पुष्कळांना शंका होती. कारण एकामागून एक जवान गुलामाप्रमाणें राबला तरी कर्जफेड म्हणून कशी ती होईना !

एकाएकीं शिवरामपंतांची नजर पोतीं भरीत असलेल्या धोंड्यावर पडली आणि त्यांचा चेहरा उल्हसित झाल्यासारखा दिसला.

' काय धोंड्या, तुझा भाऊ तुझ्या लग्नाची खटपट नाय करीत अवंदा ?' त्यांनीं विचारलें.

' न करण्यास काय झालां ? पर पैसं हवंत ना ! ' तो म्हणाला.

' अरे, त्याच्या लग्नाला कोणीं दिलेत पैसे ? ' त्यांनीं शिष्टपणानें विचारलें.

' तुमीच, तर दुसरा कोण देणार ? ' धोंड्या निर्व्याज मनानें म्हणाला.

' मग तुझ्या लग्नाला नाहीं का देणार ! सांग त्याला मुलगी बघायला. नाहींतर राहूं दे. मीच बोलेन भेटला म्हणजे ' ते पोक्तपणें म्हणाले.

शिवरामपंत गांवचे सुखवस्तु जमीनदार होते. त्यांचें वय सुमारें पस्तीस

वर्षांचें असेल. रंग किंचित् तांबूस सांवळा, तोंडावर देवीचे वण आणि नाक किंचित् बसकें. डोळे नेहमीं धुंद आणि बुबळें सदासर्वकाळ पाणी आल्या-सारखीं, त्यामुळें प्रथम पाहाणाराला किंचित् भयच वाटे.

कोंबडा आरवून थोडा वेळ झाला होता. सरूचे वडील बजाबा, धक-ल्याची भेट घेण्याकरितां त्याच्या आईला घेऊन तुरुंगावर जाणार होते. सरूची आई चुलीजवळ भाकरी करीत होती. सरूची साखरझोंप अजून संपली नव्हती.

' मग त्या पाटसकराला काय सांगायचं ? कांहीं विचार केलास का ?' तोंडधुणें आटोपून आंत येतांयेतां बजाबांनीं विचारलें. शिवरामपंतांनीं धोंड्या-च्या भावाची गांठ घेऊन सरूला मागणी घालण्याला त्याला तयार केलें व त्याप्रमाणें त्यानें बजाबांना विचारलेंहि होतें. त्यालाच उद्देशून बजाबाचा प्रश्न होता.

' काय सांगायचं म्हणजे ? मीं आपला विचार तुम्हांला अगोदरच सांगितलाय ? '

' अग, पण सर्व गोष्टींकडे ध्यान पुरवायला हवं. पोरीला घर पाहायचं तें जरा बऱ्यांपैकीं नको का असायला ? निदान खाऊनपिऊन सुखी तरी पाह्यजे मुलगा. '

' होय तर. धोंड्याला मुलगी दिली म्हणजे ती गाद्यागिरद्यावर लोळणार आहे आणि धकट्याला दिली म्हणजे भिकेला लागणार आहे जशी कांहीं ! त्यांच्या घरीं काय तोटा आहे का खायलाप्यायला ? आपल्याहूनदेखील सरसच येईल जरा. ' सरूच्या आईनें जरा ठसक्यांत उत्तर दिलें.

' अग, तसं नव्हे ! पण या शिक्षेमुळें त्याचं लायसन जाणार म्हणून म्हणत होता बामण. ' बजाबा गंभीरपणें म्हणाले.

' पुरे झाला तुमचा बामण ! त्याची दृष्टि कांहीं ठीक नाहीं. लायसन गेलं तर काय बांगड्या भरल्यात का त्यानं ? लाथ मारील तिथं पाणी काढील

असा आहे पोरं. गेला बाजार भावाला मदत तर करील त्याच्या कामधंद्यांत ?' तिनें बजाबाला निरुत्तर केलें.

'पहा बुवा ! मी तुझ्या मनाविरुद्ध थोडाच जाणार ? पण काळजी वाटते आपली. दिवस मोठे कठीण आहेत !' असें म्हणून बजाबांनीं कोपरी चढवली, घोंगडी खांद्यावर टाकली आणि भाकरीची पोटली घेऊन ते घराबाहेर पडले. सरू आपल्या अंथरुणावर या कुशीची त्या कुशीवर झाली आणि पुन्हां एकदां तिनें पांघरूण ओढून घेतलें. तिच्या आईचें लक्ष तिच्या या हालचालीकडे गेलें व ती म्हणाली,

'सरू, उठायचं नाहीं का तुला अजून ? उजाडलं बघ किती तें !'

× × ×

'ऊठ. घटकाभर स्वस्थ बैस तिकडे.' जात्याच्या खुंट्यावरून सरूचा हात सोडवीत धकट्याची आई म्हणाली. 'आमच्या घरीं आलं म्हणजे काम करायचा मक्ता घेतला आहेस का काय ?'

'आमच्यासारख्या तरण्याताठ्या मुलींनीं उनाडावं आणि तुम्हीं दळणकांडण करावं हें गोड नाहीं वाटत.' सरू म्हणाली. धकट्या तुरुंगांत गेल्या दिवसापासून दररोज एकदां तरी त्याच्या घरीं येऊन त्याच्या आईशीं थोडा वेळ गप्पागोष्टी केल्याशिवाय चैनच पडेनासं झालं होतं तिला.

'अग, खेळणंउनाडणं हा तुम्हां पोरांचा धर्मच आहे. तुम्हांला निष्काळजीपणानं हूडपणा करतांना पाह्यलं म्हणजे आम्हांला आनंद वाटतो. शिवाय माझ्या एकटीच्या पोटाला पीठ तें किती लागणार ? माझे रामलक्ष्मण घरीं आले म्हणजे मग बोलावीन तुला मदतीला.' म्हातारी सद्गदित अंतःकरणानें म्हणाली. धकट्या हा तिचा धाकटा मुलगा, म्हणून त्याला धकट्या असें ती म्हणे; पण त्याचें खरें नांव लक्ष्मण असें होतें.

म्हातारीच्या शेवटच्या वाक्यानें सरूच्या विचारांना एकदम कलाटणी मिळाली. तिनें तुरुंगाच्या हकीकती ऐकल्या होत्या. 'तुरुंगांत त्यांना सुद्धां

दळणाचं काम करावं लागत असेल, मग मीं जरा दळलं तर काय झालं? गरिबाच्या घरीं भाकरीला पीठ कमी झालं म्हणून त्यांनीं दळणाचं काम आनंदानं पत्करलं त्यांत मीं नको का हातभार लावायला?' तिच्या मनांत विचार आला.

एका सेकंदांत तिचें मन तुरुंगाची सफर करून पुन्हां पहिल्या जागीं आलें. विषय बदलण्याचा हेतूनें ती म्हणाली,

'खरंच, विसरलेंच कीं मी अगदीं! बाबांनीं विचारलं आहे, कीं तुमची गाय आतां आटली असेल, तेव्हां चहापाण्याला थोडंफार आमच्या घरचं दूध घ्यायला तुमची कांहीं हरकत नाहीं ना?'

म्हातारीच्या डोळयांत पाणी आलें. ती म्हणाली, 'तुम्हीं सर्व माणसं माझ्या-करितां किती त्रास घेतां? माझ्या पोटच्या पोरांनीं वाहिली नसती अशी काळजी वाहतां. बैल, नांगर, सारं जप्त झालं तरी दर वर्षांपेक्षां कमी नाहीं पण जास्तच धान्य आणून घरांत भरलंत, हे उपकार मला कसे फेडतां येतील?

'त्यांत उपकार कसले? ते काय स्वतःच्या फायद्याकरितां घरदार सोडून गेलेत? आमच्या सर्वांच्या फायद्याकरितांच ना त्यांनीं हा मार्ग धरला? मग सर्वांनीं त्यांचीं कामं नकोत का करायला?' सरूनें विचारलें.

'तुमचा सर्वांचा आमच्यावरला हा लोभ पाहिला म्हणजे मला धकट्याच्या बोलण्याची आठवण येते—'आई, देवाच्या दयेनें आपल्याला कांहीं कमी पडायचं नाहीं!' असें म्हणून म्हातारीनें डोळ्याला पदर लावला. क्षणभरानें ती पुन्हां म्हणाली, 'सरू, हें वरीस कसं संपणार बरं? तूं येऊन घटकाभर बोलत बसलीस, म्हणजे मला कितीतरी बरं वाटतं. दोन मुलं तुरुंगांत गेलीं म्हणून देवानं जणुं हें तिसरं पाठवून दिलं असं वाटतं.'

'खरंच, बाबा म्हणत होते, कीं तुरुंगांतून पत्र आलंय म्हणून. खुशाल आहेत ना!' सरूनें विचारलें.

‘ होय. तें समोरच्या कोनाड्यांत आहे. पत्र वाचतां आलं तर पहा म्हणजे सर्व कांहीं हकीकत समजेल. ’

सरूचें वाचनानें ज्ञान तें कितीसें असणार ? गांवच्या मास्तरांच्या आग्रहा-वरून आणि धकट्याच्या आग्रहामुळें खेडेगांवच्या शाळेंत तिनें वर्ष दीड वर्ष काढलें होतें. लहानपणीं त्यामुळें र, ट, फ करतां येत होतें. पण खरें पाहिलें तर पत्र वाचण्यापेक्षां तें त्याच्या हातचें आहे म्हणूनच तिला तें हवें होतें.

‘ मीं घरीं जाऊन सावकाशीनं वाचीन. एकदम नाहीं वाचतां येणार मला. नाहींतर वाचून घेईन कोणाकडून तरी. नेऊं का हें पत्र मीं ? ’ सरूनें आर्जवीपणानें विचारलें.

पत्र धकट्यानें आपल्या आईला लिहिलेलें होतें. त्याचा सारांश असा—

‘ तुला पत्र लिहायला बसलं म्हणजे मन भांबावून जातं. त्या दिवशीं तूं मला भेटायला आलीस तेव्हां मला तुझ्याशीं धड बोलतां आलं नाहीं. माझं मन तुला कसं समजावून द्यावं हेंच मला समजत नाहीं. गांवांतल्या आमच्या बरोबरच्या पोरांचीं लग्नकार्यं झालीं म्हणजे आमची आठवण होऊन तुला दुःख होतंसं दिसतं. कारण मीं तुला गांवांतील नवल विशेष विचारलं, तर तूं विषण्ण मनानं म्हणालीस, ‘लग्नकार्यं सर्व कांहीं ठीक चाललं आहे.’ त्यांतल्या त्यांत बजाबाचं आपल्या बोलण्याकडे लक्ष नाहींसं पाहून म्हणालीस कीं, ‘सरूचं देखील कुठंतरी जमविण्याचा विचार आहे त्यांचा.’ आणि तुला वाईट वाटलेलं दिसलं. आई, तुला दुःख झालेलं पाहलं म्हणजे मलादेखील अगदीं चैन पडत नाहीं. मीं तुला उपदेश करणं योग्य नाहीं; पण एवढंच सांगतों कीं; तूं धीर सोडूं नको. आपल्या नशिबानं चांगलं व्हायचं असलं, तर कोणाच्या देवाला तें चुकवतां येणार नाहीं. ’

× × ×

कालाचा प्रवाह कोणासाठीं थांबत नसतो. दिवसांमागून दिवस गेले आणि त्यांच्या शिक्षाहि संपल्या. ते दोघेहि सुटून परत आले.

संध्याकाळची वेळ होती. सूर्यास्त नुकताच झाला होता. सुगंधयुक्त शीतल वारा मंद गतीनें वहात होता. सरू पारिजातकाच्या झाडावर ओळंबून त्याच्या कळ्या तोडण्यांत अगदीं गर्क झाली होती. पायांच्या चवड्यांवर उभें राहून एका हातानें एक फांदी ओढून दुसऱ्या हातानें कळ्या तोडण्याचें काम चालूं होतें. दोन्ही हात गुंतल्यामुळें वाऱ्यानें उडालेला पदर तसाच फडफडत होता. तिचा तो केशकलाप, पदर उडाल्यामुळें दिसणारा गोंडस गळा आणि तारुण्याच्या भरांत घवघवलेलें शरीरसौष्ठव दृष्टि स्तिमित कर-णारें होतें.

'मी देऊं का कळ्या काढून?' आकस्मिकपणें मागून आवाज आला. आवाज तिच्या ओळखीचा असावासें दिसलें; कारण मागें न पाहातांच ती म्हणाली,

'कांहीं नको एवढी तसदी घ्यायला! तुम्ही काय, आज काढून द्याल अन् उद्यां एखादं व्याख्यान देऊन पुन्हां निघून जाल.'

'कोण निघून जाणार? तूं कीं मी, हाच प्रश्न आहे.' किंचित उदास मनानें तो म्हणाला.

कळ्या तोडण्याचें कार्य एकदम बंद पडलें. वाकवून धरलेली फांदी धप्-कन् वर गेली. 'म्हणजे काय? मला नाहीं तुमच्या बोलण्याचा अर्थ सम-जला! मी कुठं जाणार?' तिनें मागें वळून प्रश्न केला.

'ऐकलं, कीं तुझं लग्न ठरूं पहातंय म्हणून. लग्न झाल्यावर तूं आपल्या घरीं जाणार हें निश्चितच. म्हणून म्हटलं इतकंच.'

'कुणीं सांगितलं? बाबांनीं का?' तिचा चेहरा कावराबावरा झाला.

'छे छे, तसं कांहीं नाहीं. आपली गांवांत बातमी आहे, कीं तुझं लग्न त्या चौंध्याशीं ठरलंय म्हणून.'

‘ एवढंच ना ? अन् तुम्हीं त्यांच्यावर विश्वास ठेवलात ? ’ तिनें जरा खोचून विचारलें.

‘ कां बरं ठेवूं नये ? माझं लायसन्स गेलं, मी बेकार होऊन घरीं बसलों तेव्हां आतां आमची काय किंमत राह्यली जगांत ! ’

‘ आपली किंमत आपणच कमी ठरविली म्हणजे लोक त्याच्याहून कमी करण्याचा प्रयत्न करतात. अन् लोकांशीं काय करायचं आपल्याला ! तुम्ही यायच्या आधींच आईनं मला विचारलं होतं आणि तिचं मत माझ्या-सारखंच पडलं ! ’ तिनें त्याला धीर देण्याच्या उद्देशानें म्हटलें.

‘ तुमचं ठरलं तरीपण मला नको का विचार करायला ? ’ किंचित् निराशेनें तो म्हणाला.

‘ तुम्हीच हताश झाल्यावर आम्हीं काय करावं ? उगीच कांहींतरी घेऊन बसायचं डोक्यांत ! तुमची किंमत जग करणार नसून मी करणार आहें. आहे त्यांतच मीं बघा कसा संसार करतें ! ’ आपल्या बोलण्याचा त्याच्या उदास मनावर इष्ट तो परिणाम होईल म्हणून मोठ्या उमेदीनें तिनें त्यांच्याकडे पाहिलें. पण तिची निराशा झाली ! तो विषण्ण मनानें आकाशांत नुकत्याच डोकावूं पाहाणाऱ्या एका नक्षत्राकडे टक लावून पाहात होता. व्हावा तसा परिणाम झाला नाहीं असें पाहून ती म्हणाली, ‘ काय आहे आकाशांत एवढं टक लावून न्याहाळण्यासारखं ? कां फुलंबिलं आहेत त्या सोनचाफ्यावर...? अगबाई ! खरंच कीं, फूल आहे त्या चाफ्यावर ? तें पाहा त्या पानांआड बसून कसं हंसत आहे तुमच्याकडे बघून ? मघा कळ्या काढून देणार होता ना ? आतां तेवढं फूल काढून द्या बरं ! ’

या वेळीं मात्र तिच्या प्रयत्नाला यश आलें. त्याची कळी उमललेली दिसली. त्याच्या चेहऱ्यावर पुन्हां एक वेळ मधुर हास्य चमकूं लागलें. तो झाडाकडे वळला. क्षणार्धांत झाडावर चढून त्यानें फूल काढून आणलें आणि तिच्या अंबाड्यांत खोवलें. तिनं लाजून दूर होण्याचा प्रयत्न केला; पण...

'तें फूल काढत असतांना काय वाटलं सांगूं कां ?' तो म्हणाला. 'असंच एक फूल माझ्यापासून दुरावूं पाहात होतं. पण आतां तें माझ्या हातीं आलं आहे.' असें म्हणून त्यानें हळूंच तिच्या गालावर एक टिचकी मारली आणि......

× × ×

'काय बजाबा, अखेरीस मीं म्हटलं तसं झालं ना ? गेलं ना जावयाचं लायसन्स ? तरी मीं बजावलं होतं अगोदर !' शिवरामपंत हंसतहंसत म्हणाले. त्यांच्या हंसण्यांत आसुरी आनंद होता. सरूचें लग्न धोंड्याबरोबर करून देण्याचें नाकारून पूर्वी ठरल्याप्रमाणें धकटधाशीं करून देणाऱ्या बजाबानें सापाच्या शेपटीवर पाय दिला होता. लालसापूर्तीच्या आशेनें शिवरामपंतांनीं रचलेलें कपटनाटक त्यानें उधळून लावलें होतें. मग त्याच्या दुःखांत डागण्या देण्यामध्यें त्यांना आनंद कां होऊं नये ?

'पण आतां काय इलाज त्याला ?' बजाबांनीं असहाय्यपणें एक सुस्कारा टाकला.

'अरे, इलाज आहे, पण करील त्याला ! म्हणतात ना, कीं नशीब देतं आणि कर्म नेतं. तुमचा जांवई आहे अजून आपल्याच गुमींत. त्याला वाटतयं कीं मी तुरुंगांत गेलों तेव्हां मोठा पुढारी झालों ! पण एका दिवसांत धुंदी उतरवीन म्हणावं डोळ्यांवरची ! मग समजतील पुढारीपणाचीं सुखं !' शिवरामपंत त्वेषानें म्हणाले.

'कसला आलाय् पुढरीन् बिढारी. अजाणता पोर आहे. तुम्हीं मार्गाला लावला पाह्यजे.' बजाबा काकुळतीनें म्हणाला.

'पोर तर ! चुरुचुरु बोलायला अन् माझा अपमान करायला नाहीं पोर ? चांगलं सांगितलं, कीं सध्यां नोकरी नाहीं तुला तर बायकोला पाठव दळणा-कांडणाला आमच्याकडे, म्हणजे तितकीच भावाला मदत होईल. तर म्हणतो काय, कीं ती नाहीं येणार कामाला ! बादशहाची राणीच कीं नाहीं कामाला

न पाठवायला ! पाहा म्हणावं, आतां राणी कशी काम शोधीत गांवोगांव हिंडते ती ! ' अगोदरच भीति उत्पन्न करणारा त्यांचा चेहरा जास्त भयानक दिसूं लागला. शेवटचें वाक्य उच्चारतांउच्चारतां त्यांनीं पानसुपारीचा डबा अगदीं दांत चावून बंद केला. त्यांचा कांहींतरी निश्चय झालेला दिसला.

' दादा, असं कसं बरं म्हणून चालेल ! सरू झाली तरी तुमच्या लेकी-सारखीच नव्हे का ? तिनं तर कांहीं अपराध केला नाहीं ना ? ' बजाबा अगदीं गयावया करून म्हणाले. पण शिवरामपंत तिच्याकडे आपली मुलगी म्हणून बघायला तयार नव्हते. बजाबांना काय माहीत तिनें त्यांचा केवढा मोठा अपराध केला होता तो ? तिनें इतकें सुंदर काय म्हणून दिसावें ?

× × ×

' हें बघ सखाराम, मीं एकदां सांगितलं तेंच पुनःपुन्हां सांगण्यांत काय तात्पर्य आहे ? तुम्ही आमची जमीन सोडून द्या कसे !' शिवरामपंत आढ्य-तेनें म्हणाले. त्यांनीं आपला दुष्ट हेतु पुरा करायचें ठरवलें होतें.

' पण दादा, आमची काय कसूर आहे ? खंड वेळच्या वेळीं मी देतों. एखादे वेळीं पिकलं नाहीं तरी तुमचा खंड मी चुकता करतों कांहीतरी करून. तुमचं कसं बुडवूं बरं ? तुमचे आमच्यावर आज फार वर्षांचे उप-कार आहेत. ' धकट्याचा भाऊ सखाराम अत्यंत नम्रपणें म्हणाला. त्याच्या आजोबांच्या वेळेपासून ते जी जमीन खंडानें करीत आले होते, ती सोडून देण्यास मालकानें फर्मावलें होतें.

' तर ! उपकार आहेत म्हणूनच उपकारांची फेड केली तुझ्या भावानं माझा अपमान करून ? हें पाहा सखाराम, तुझा भाऊ आहे फार शहाणा आणि त्यांत तूं त्याला डोक्यावर चढवून ठेवला आहेस. ' शिवरामपंत म्हणाले.

'असं कसं बरं म्हणतां दादा ! तुम्हाला त्यानं उत्तरं केलीं त्याबद्दल मीं त्याचे कान उपटले नसतील असं कां तुम्हांला वाटतं ?' सखारामानें विचारलें.

'छे रे बाबा ! असे कान उपटून डोळे उघडणार नाहींत. त्यांवरली धुंदी उतरायला त्यांतून खूप पाणी वाह्यलं पाह्यजे. तेव्हां म्हणतों कीं आमची जमीन सोडा कशी !' मालकी हक्काच्या मदानं त्यांनीं सांगितलें.

'जमीन सोडून जाऊं कुठं मी ? तुम्ही जमिनीचे मालक. तुम्हींच तारणार आणि तुम्हीच मारणार ! म्हणून म्हणतों, अपराध पोटांत घाला. आतां खंडाच्या बाबतींत आपलं कांहीं म्हणणं असलं तर सांगा. मण सव्वा मण अधिक देऊं तुम्ही सांगाल तर !' सखाराम व्याकूळ होऊन म्हणाला.

' नको रे बाबा. आतां तूं पांच मण जरी जास्त घातलेस तरी नको. मला आपली माझी जमीन पाह्यजे आहे. जमीन सोडून तुम्हीं कुठं जावं हें मी कशाला सांगूं ? तुम्हांला वाटेल तिथं जा. मुंबईला जा नाहींतर मसणांत जा. मला त्याच्याशीं कर्तव्य नाहीं आणि जास्त बोलायला वेळ नाहीं.' असें म्हणून शिवरामपंत तावातावानें आंत निघून गेले. गरीब बिचारा सखाराम उठला आणि जड अंतःकरणानें एकएक पाऊल टाकीत घराकडे वळला. —पण आतां घर कुठें ?

खंडकरी कुळाला कसलें आलें आहे घर नी दार नी अधिकार ? त्याचें जीवन मालकाच्या मर्जीवर अवलंबून. रात्रीं थकल्याभागल्यावर डोकें टेकायला देखील हक्काची जमीन नाहीं त्याला. थाटलेलें घर मोडायचें म्हटलें तर मालक मोडूं शकतो. पेटलेल्या चुलींत पाणी ओतायचें तरी ओतूं शकतो. आज भाकर मिळाली, तर उद्यां मिळेल कीं नाहीं याची त्याला खात्री नसते !

खेळांतील सोंगट्यांचा पट आपण जितक्या बेपर्वाईनें उडवतों, तितक्याच बेपर्वाईनें सरूचा—नवीनच मांडलेल्या संसाराचा पट उधळण्यांत आला. ते नोकरीच्या शोधार्थ मुंबईस आले आणि तिथें त्यांचें काय झालें ?— काय व्हायचें आहे ? त्या अफाट जनसागरांत जें असंख्य बेकारांचें होतें तेंच— अगदीं तसेंच ! !

## क्रान्तिकारकाचा संसार

## १

" दिवाळीसाठीं बाळाला एक सुंदरसा सूट शिवायचा बरं का या वर्षी."

" एवढ्याशा मुलाला कसला सूट अन् बूट ! दिवाळीच्या नांवावर पैशाची उधळपट्टी आहे ही नुसती."

" प्रत्येक बाबतींत तुमचा आपला उपयुक्ततावाद. तुम्हांला हौस-मौज कशी ती मुळींसुद्धां नाहीं. नाहींतर कुसुमचे बापूसाहेब पाहा बरं. रवींद्रासाठीं किती छानछान वस्तु घेऊन येतात नेहमीं. मी म्हणतें, नेहमींचं राहिलं; पण दिवाळीच्या निमित्तानं तरी मुलाचं थोडं कौतुक करा कीं."

" अग, त्यांचं काय घेऊन बसलीस ? महिन्याकाठीं तीनशें रुपये पगार येतो आहे त्यांना. खिसा गरम असल्यावर लेकराबाळांचं कोड न पुरवायला काय झालं ?"

" होय, तेंहि खरंच. तुमच्यासारख्या देशभक्तांच्या आयुष्यांत (?) पगाराचा असा दिवस कधीं उगवायचा आहे? अन् पगार नाहीं म्हणून जन्मांत कधीं हौस पुरी व्हायला नको ." माझ्या पत्नीनें टोमणा मारला आणि खुबीदारपणानें बाजू माझ्या अंगावर उलटविली.

ती सहज बोलून गेली; पण तिच्या त्या उद्गारांनीं माझ्या विचारांना किंचित्सा धक्का दिला. त्या शब्दांमध्यें अतृप्त आकांक्षांची छटा स्पष्ट दिसून येत होती. तिच्या म्हणण्यांतील यथार्थता मला एकदम पटली. खरोखरच, माझ्यासारख्या संपूर्णतया सार्वजनिक जीवनाचा छंद करणाऱ्या भणंगाच्या आयुष्यक्रमांत असल्या आनंदाचा दिवस उगवणें अशक्यच नाहींतर काय? आज पगार झाला आहे, तेव्हां एखादा चांगलासा सिनेमा पाहूं, एखादी आवडीची वस्तु आणूं अगर थोडीशी चैन करूं हें समाधान मिळण्याचा संभव नाहींच म्हटला तरी चालेल.

सार्वजनिक प्रपंचाबद्दल आसक्ति बाळगल्यामुळें आपल्या खाजगी प्रपंचाची आबाळ होत आहे आणि त्यामुळें आपल्या बायकोला बारीकसारीक प्रापंचिक सुखांना आंचवावें लागत आहे या जाणिवेनें माझें मन जरासें अस्वस्थ झालें. पण लगेच विचार आला, कीं या सुखांकडे आपण स्वखुषीनेंच नाहीं का पाठ फिरवलेली? मग तिला त्याबद्दल एवढी खंत कां वाटावी? तिचा हा असंतोष वरवरचा होता ही गोष्ट मला ठाऊक होती. म्हणून तिची समजूत करण्याच्या उद्देशानें मीं म्हटलें,

" अग, माझा पगार झाला नाहीं तरी तुझा नाहीं का होत? कुणाचा तरी एकाचा झाला म्हणजे झालं. इतरांच्या बाबतींत पुरुष बायकांचे लाड करीत असले पगाराच्या दिवशीं, तर आपला प्रकार त्याच्या अगदीं उलट ! सर्वांच्यासारखं आपण वागलों तर मग आपण क्रान्तिकारक कसले?"

" माझा नुसता पगार होऊन काय उपयोग? तुम्हांला केव्हां वेळ असतो चला म्हटलं तर?" तिनें माझें म्हणणें खोडून काढलें.

" तुम्ही लोकांनीं आपलं जीवन एखाद्या निर्जीव यंत्राप्रमाणं बनवलं आहे. अमुक एके दिवशीं अमुक गोष्टी करायच्या; सगळं घड्याळाच्या काट्या-प्रमाणं चालायचं. हौस-मौज करण्याचंदेखील वेळापत्रक ठरलेलं. त्यांत तुम्हांला आनंद कसा होतो बुवा? ती का एक बाजारी वस्तु आहे कीं पैसा टाकावा अन् घ्यावी विकत? पगाराचा दिवस आमच्या आयुष्यांत येत नसला तरी त्यांत आनंदच नाहीं असं कां तुला वाटतं? एखादं काम यशस्वी रीतीनं पार पाडलं कीं मला किती उत्साह वाटतो त्या दिवशीं! अन् मग अशा वेळीं विचार येतो, कीं आज जावं सिनेमाला घेऊन आपल्या प्रियेला."

" तें काय विचारावं! असा कपिलाषष्ठीचा योग अजून तरी माझ्या आठवणींत नाहीं! एक काम झालं कीं दुसरं. इतर माणसं पैशाच्या बाबतींत हावरेपणा करतात तर तुम्ही यशाच्या! सिनेमा तर दूरच राहिला; पण नुसतं फिरायला जायचं म्हटलं बरोबर तर वेळ नसतो तुम्हाला. या खेपेला मात्र मी कांहीं ऐकायची नाहीं बरं कां! मागल्या वर्षी तर दिवाळीला तुरुं-गांतच होतात; पण या वर्षी दिवाळीच्या सुट्टींत आपण माईच्याकडे जायचं विश्रांति घेण्यासाठीं." तिनें आपली मागणी मांडली.

" तो प्रोग्रॅम आपण मे महिन्याकरितां राखून ठेवूं. या सुटींत आमचं एक अभ्यास मंडळ आहे आणि त्याची सर्व व्यवस्था मला करायची आहे. तेव्हां..."

" तुमचीं सदान् कदा अभ्यास मंडळं अन् चर्चा मंडळं! दिवाळी नाहीं कीं दसरा नाहीं! आयुष्याचा अगदीं सहारा केला आहे!" ती अगदीं चिडून म्हणाली.

प्रापंचिक जीवनासंबंधींचा माझ्या पत्नीचा हा अभिप्राय अगदीं मासले-वाईक ( typioal ) होता. मला वाटतें, प्रत्येक सार्वजनिक कार्यकर्त्याला अशा प्रकारच्या भडिमारांतून जावें लागत असेल. पण या गोष्टी सांगायच्या कुणाला? आपल्यांत अशी एक म्हण आहे कीं, " नवऱ्यानं मारलं आणि

पावसानं झोडलं तर फिर्याद कुणाकडे करावयाची ?" परिस्थितीतील फरकानुसार मला त्यांत सुधारणा करावीशी वाटतें—"पावसानं झोडलं आणि बायकोनं छेडलं..." असें म्हटल्यास तें आमच्या अनुभवांशीं जास्त जुळण्यासारखं आहे.

बाकी ती तरी काय करणार बिचारी ? वैतागूं नये तिनें तर काय करावें? चळवळ्या तरुणावर प्रेम करण्यांत एक अजब रोमान्स आहे या कल्पनेमुळें तिनें आपलें प्रेम माझ्यावर बसूं दिलें आणि शेवटीं तिच्या मनाप्रमाणें आमचा विवाह झाला. त्या दिवशीं तिला किती आनंद झाला होता ! आमच्या वृत्ति त्या वेळीं इतक्या उच्छृंखल झाल्या होत्या, कीं येणाऱ्याजाणाऱ्यांनीं क्वचित् आमची टिंगल केली तरी आम्हांला त्यांत गंमत वाटे. अशाच एका प्रसंगाची मला चांगली आठवण आहे.

आम्ही फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीकडे फिरावयास जात होतों. संध्याकाळचा सात साडेसातचा सुमार असेल. अंधार पडूं लागला होता. आमच्या मागून विद्यार्थ्यांचें एक टोळकें हंसताखिदळत येत होतें.

"गंगेंत घोडे न्हाले बुवा एकदाचे." त्यांच्यापैकीं एकजण ओरडला.

"अखेरीस विकेट पडली म्हणायची !" दुसऱ्यानें त्याला दुजोरा दिला.

आदल्याच दिवशीं नोंदणीपद्धतीनें आमचा विवाह झाला होता. पुष्कळ दिवसपर्यंत आमचें प्रेम ही जगजाहीर गोष्ट होऊन बसली होती. कांहीं लोकांच्या कुचेष्टेचा देखील तो एक विषय झाला असल्यास त्यांत आश्चर्य मानण्यासारखें अगर राग येण्यासारखें कांहीं नव्हतें. आमचें परस्परांवर प्रेम असूनहि आम्ही लग्न कां करीत नाहीं याबद्दल लोकांना कुतूहल वाटे.

माझें जीवन म्हणजे एका धंदेवाईक चळवळ्याचें. ना नोकरी ना चाकरी ना घर ना दार. मला प्रपंच थाटणें कसें शक्य होतें ? भलत्याच वेळीं लग्न केल्यानें माझ्या चळवळ्या वृत्तीची कुचंबणा होऊन परिणामीं मला दुःख झालें असतें यासाठींच मी लग्न करण्याच्या विरुद्ध होतों. "आज ना उद्यां

तुमची विकेट पडणार" असें माझी स्नेहीमंडळी म्हणत, तेव्हां मी त्यांना विनोदानें म्हणे, " माझी विकेट पडणं कठीण आहे. मी अकराव्या गड्या-प्रमाणं नुसताच बॅट फिरवीत परत येणार" अन् रुबाब तर असा, कीं मला स्टँड मिळाला असता तर सेंचरी दिली असती ठेवून. माझी विकेट पडल्याचें त्या मुलानें जाहीर केल्याचें ऐकून मला खूप मजा वाटली.

माझ्या प्रेयसीनें लौकिकी पद्धतीनुसार दुसऱ्या कोणा अनुरूप तरुणाशीं लग्न करावें असा सल्ला मी तिला नेहमीं देत असे. मीं आव तर मोठा आणला होता. पण यदाकदाचित् तसें घडलें असतें तर मला खात्रीनें हळ-हळ वाटली असती. आणि मग खरोखरच अकराव्या गड्याची भूमिका मला शेवटपर्यंत करावी लागली असती. माझा सल्ला तिला कधींच आवडला नाहीं. पहिलें प्रेम हेंच खरें प्रेम अशी तिची कल्पना होती. तिची एकनिष्ठा आणि चिकाटी वाखाणण्यासारखी होती. त्यामुळें आणि स्त्रीजातीबद्दल वाट-णाऱ्या नैसर्गिक सहानुभूतीमुळें आमच्या परिचयाची बहुतेक सर्व मंडळी नेहमीं तिचीच बाजू घेत आणि आम्हां उभयतांच्या हिताच्या दृष्टीनें मला विवाहबद्ध होण्याचा आग्रह करीत. 'नको नको' म्हणत असतांनादेखील मी तिच्याकडे जास्त जास्त आकर्षिला जात होतों. आणि सरतेशेवटीं त्या मुलानें म्हटल्याप्रमाणें गंगेत घोडे न्हाले एकदांचे. त्यानें कदाचित् कुचेष्टेनें तें वाक्य उच्चारलें असल्याचा संभव आहे; तरीपण त्यामुळें आम्हांला देखील मौज वाटली आणि अगदीं मनापासून हंसूं आलें. विनोदाचा तो एक उत्कृष्ट नमुना होता.

राजकारणांत पडलेल्या मनुष्यानें लग्न करावें किंवा नाहीं हा प्रश्न अनेक वेळीं लोकांनीं मला विचारला आहे. कारण आमच्यासारख्यांच्या प्रपंचाबाबत लोकांना खूप कुतूहल असतें. हे लोक नोकरी धंदा करीत नाहींत मग यांचें चालतें कसें ? हा प्रश्न त्यांना नेहमीं सतावीत असतो. हा प्रश्न माझ्या बाय-कोला देखील कित्येक मंडळींनीं विचारलेला आहे, आणि माझ्याइतकी

ती निर्ढावली नसल्यामुळें अशा प्रश्नांचीं उत्तरें देतांना तिला मोठें अवघड वाटतें. आमचे स्नेहीसोबती व आमच्या कामाबद्दल सहानुभूति बाळगणारे लोक आम्हांला अडीअडचणीला मदत करतात ही गोष्ट सांगतांना तिला जड जातें. कारण त्यामुळें आमचें जीवन हें दुसऱ्यांच्या दयेवर अगर दातृत्वावर अवलंबून आहे अशी लोकांची कल्पना होईल म्हणून तिला भय वाटतें. कदाचित् शरमहि वाटत असेल थोडीशी. अगदीं सुरवातीला मलादेखील तसें होत असे. वास्तविक पाहातां दुसऱ्यांच्या सहानुभूतीवर आणि मदतीवर आपलें जीवन अवलंबून आहे या गोष्टीची जाणीव होणें यांत शरमेची गोष्ट कोठें आहे ? या समाजांत अगदीं पूर्णपणें स्वतंत्र असा कोण आहे ? सर्वांनाच एकमेकांच्या सहानुभूतीवर आणि सहकार्यावर अवलंबून राहावें लागतें. त्याशिवाय एक पाऊलहि आपल्याला उचलतां येणार नाहीं. वास्तविक शरम वाटायला पाहिजे त्या लोकांना ती मुळींच वाटत नाहीं; आणि लोकहि त्यांना बहुमानानें वागवतात. दुसऱ्याच्या श्रमांवर चैन करणाऱ्या ऐतखाऊ लोकांना आपल्या जिण्याची शरम वाटली पाहिजे; आम्हांला नाहीं. कारण आम्ही श्रम केल्याशिवाय भाकरी खात नाहीं. एकंदर समाजाच्या दृष्टीनें आम्ही जें काम करतों तें उपयुक्त आणि आवश्यक आहे अशी आमची खात्री आहे आणि इतरांचीहि असल्यामुळेंच ते आम्हांला मदत करतात. पण लोकांमध्यें ही भावना अद्यापपर्यंत तितकीशी जागृत झालेली नाहीं ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. आणि त्यामुळेंच सार्वजनिक कार्य आणि वैवाहिक जीवन या दोन्ही गोष्टी निर्धन मनुष्याला झेंपणार नाहींत असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे.

एके दिवशीं सकाळीं स्नान वगैरे आटपून मी एक लेख लिहिण्याच्या तयारींत होतों. कागदावर पुरी एक ओळदेखील मीं लिहिली नसेल, इतक्यांत दरवाजावर कोणींतरी टिकटिक केलें. मला राग आला. वैतागून मी खुर्चीवरून उठलों आणि दरवाजा उघडला. माझ्याशीं थोडासा परिचय

असलेला सुमारें पंचवीसतीस वयाचा एक शेतकरी कार्यकर्ता माझ्यापुढें उभा होता.

" या ऽऽऽ " म्हणून मीं त्याचें स्वागत केलें. वास्तविक 'आपण आतां जा' असें सांगायचेंच माझ्या मनांत होतें. पण तसें सांगण्याचें मला धैर्य झालें नाहीं. 'मी आतां कामांत आहें; पुन्हां केव्हांतरी वेळ ठरवून या' असें सांगणें अगदीं वरच्या दर्जाच्या पुढाऱ्यांनाच शक्य असतें. माझ्या-सारख्याला दिवसाच्या चोवीस तासांत केव्हांहि कोणी आला तरी त्याची विचारपूस करावी लागते. नाहींतर 'पुढारीपणाचा गर्व झालाय्' हा शिक्का ठरलेलाच !

ते गृहस्थ आंत आले. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर त्यांनीं स्पष्ट शब्दांत प्रश्न केला:

" कां हो, तुम्ही हल्लीं राजकीय बाबतींत विचार करतां का ? "

त्यांचा तो प्रश्न ऐकून मी चकितच झालों ! रात्रंदिवस राजकीय विष-यांचा काथ्याकूट करीत बसणारा मी – राजकारणाचा विचार करतों कीं नाहीं अशी शंका या गृहस्थाला कां आली तें मला उमगेना !

" कां बरं ? मला तुमच्या प्रश्नाचा अर्थ नाहीं समजला ! " मीं म्हटलें.

" तसं कांहीं नाहीं. जरा ' विचारविनियम ' ( विनिमय ) करायचा होता म्हणून विचारलं. " त्या गृहस्थांनीं उत्तर दिलें.

" तें खरं; पण मी राजकारणाचा विचार करतों कीं नाहीं असं कां विचारलंत तुम्हीं तें नाहीं माझ्या लक्षांत आलं ! " मीं जास्त फोड करून विचारलें.

" तुमचं लग्न झाल्याचं कळलं; तेव्हां म्हटलं आतां पूर्वीसारखं लक्ष घालीत नसाल त्या गोष्टींत. "

त्या गृहस्थाचें तें बोलणें ऐकून मी थक्कच झालों ! किंचित् रागहि आला. तरीपण त्याच्या सरळ स्वभावाचें आणि स्पष्टवक्तेपणाचें कौतुक वाटलें मला.

' छे छे, लग्नाचा आणि माझ्या चळवळीचा तसा कांहीं संबंध नाहीं. लग्न केलं म्हणजे आपले सर्व धंदे सोडून देतं कीं काय कुणी ! राजकारण करणाऱ्यानं लग्नच करू नये असं तर म्हणणं नाहींना तुमचं ? '' मीं थोडेसें कठोरपणानें विचारलें.

" माझ्या बोलण्याचा राग आला वाटतं तुम्हांला ? तुम्हाला लागावं म्हणून मीं विचारलं नाहीं. कित्येक दिवसांत वर्तमानपत्रांत नांव वाचलं नाहीं तुमचं म्हणून वाटलं मला तसं. '' तो ओशाळून म्हणाला.

त्याची ती ओशाळलेली वृत्ति पाहून मला वाटलें, आपण उगाच इतके तडकलों. मीं माझ्या बोलण्याचा सूर बदलला आणि त्याच्याशीं चार गोड गप्पा मारून त्याला वाटेला लावलें. तो गेला; पण त्यानें माझ्या विचारांना चांगलीच चालना दिली.

माझें नांव वर्तमानपत्रांत छापून येत नाहीं म्हणून मीं सामाजिक कार्य करायचेंच सोडून दिलें असावें असें त्याला वाटलें. प्रसिद्धीविषयीं अगदीं उदासीन राहाणें कित्येक वेळीं कसें धोक्याचें ठरतें तें प्रथमच माझ्या ध्यानांत आलें. आपल्या समाजांत सार्वजनिक जीवन (Public life) किती खालच्या पातळीवर आहे आणि सार्वजनिक कार्यकर्त्यांबद्दल तरी लोकांच्या किती विलक्षण कल्पना असतात याची मला थोडीशी कल्पना आली.

सामाजिक कार्य करणाऱ्या मनुष्यानें लग्न केलें म्हणजे त्याला तें काम सोडून द्यावें लागतें अशी यांची कल्पना असते. पण कोणी लग्न न करतां राहिला तर तेंहि त्यांना रुचत नाहीं. लगेच नाना प्रकारच्या शंकाकुशंका घ्यायला लागतात. लग्न केलें तरच समाजांत मनुष्याला कांहीं स्थान आहे अशी त्यांची भावना असते. माझा विवाह झाल्यावर कांहीं दिवसांनीं एका प्रतिष्ठित कॉंग्रेस कार्यकर्त्याची आणि माझी मुलाखत झाली. ती या दृष्टीनें मोठी मनोरंजक वाटली मला.

" या भाई ! तुमच्याबद्दल एक महत्त्वाची गोष्ट समजली इथं आल्यावर"

माझें स्वागत करीत ते म्हणाले. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य होतें. त्यांची वृत्ति प्रसन्न दिसली. माझ्यासंबंधीं जी गोष्ट यांना समजली आहे ती वाईट खास नाहीं हें मीं ताडलें. तरीपण हंसतहंसत मीं विचारलें.

"कां बुवा ! आज या गरीब भाईच्याबद्दल कोणता प्रवाद ऐकला तुम्हीं ? आमचं कुठं तरी चुकावं आणि भाईची नालस्ती करतां यावी याची वाटच पाहात असतात लोक."

"छे हो, तसं नाहीं. आज जी गोष्ट मला कळली त्यामुळं माझा तुमच्याबद्दलचा आदर वाढला आहे. कमी नाहीं झाला." ते म्हणाले.

"अशी काय गोष्ट समजली माझ्याबद्दल तुम्हांला ?" मी कुतूहलानें विचारलें.

"अहो, मीं असं ऐकलं, कीं तुमचं लग्न झालं असून एक मुलगाहि आहे तुम्हाला. फार आनंद झाला बुवा."

"म्हणजे काय ? माझं लग्न झालं एवढ्यानं तुमचा माझ्यासंबंधींचा आदर कसा काय वाढला ?"

"तुम्ही कांहीं म्हणा, पण आम्हांला तसं वाटतं खरं. लग्न न करितां तुम्ही राहिलांत म्हणजे साहजिकच समाज तुमच्याशीं बिचकून वागणार. आणि तशांतच नव्या नीतीचे तुम्ही उपासक खरोखर, प्रचलित नीतिनियमांविरुद्ध केस पिंजारून तुम्ही भाईलोक बोलूं लागलांत म्हणजे भीति वाटते आम्हांला तुमची ! अहो, नवी नीति येईल तेव्हां येवो, पण तूर्त तरी आम्हांला आहेत तेच विधिनिषेध पाळायला हवेत. आतां तुमचंच पाहा ना ! कायद्यानुसार तुम्ही विवाहित झालांत. आम्हांला खात्री आली."

त्यांचा हा मनमोकळेपणा मला फार आवडला. समाजांत आम्हां अविवाहित भाईबद्दल किती गैरसमज आहे याची जाणीव झाली. मीं लग्न केलें ही एकंदरींत चांगली गोष्ट केली म्हणायची, असा विचारहि माझ्या मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं.

" शिवाय आतां तुम्ही दुसऱ्यासंबंधीं पुष्कळ सहानुभूतीनं विचार करूं शकाल. " ते पुढें म्हणाले. " मनुष्याच्या मागें प्रपंच असला म्हणजे मन मानेल तसं त्याला बोलतांहि येत नाहीं आणि वागतांहि येत नाहीं. त्यामुळं कार्याला जी एक आपोआप मर्यादा पडते ती तुम्हांला कळून येईल. तुम्हांला वाटतं, आम्ही मवाळ आहों. सुधारणावादी आहों, अहो आम्हांला काय क्रांति नको कां आहे ? पण येते आहे कुठं ती ? परिस्थितीपुढें मान वाकवावी लागते माणसाला. " त्यांनीं आपली कैफियत दिली.

लग्नामुळें माझ्या सार्वजनिक जीवनाला मर्यादा पडली किंवा नाहीं हें आजच मला सांगतां येणार नाहीं. लग्न केल्यामुळं सामान्य कार्यकर्त्याला त्याच्या जीवनांत जास्त विवंचना निर्माण होते ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. सांपत्तिक अडचणींना कंटाळून कार्य सोडून देण्याची देखील प्रवृत्ति बळा॰ वण्याचा संभव आहे. इतकेंच काय, प्रापंचिक सुखांतहि मनुष्य पूर्णपणें रंगून जाण्याचा संभव आहे. या दोन्ही आपत्तींना पुरून उरणारा मनुष्यच सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही प्रपंचांची जबाबदारी यशस्वी रीतीनें पार पाडूं शकेल. अर्थात् ही गोष्ट असाध्य आहे असें मला वाटत नाहीं. सार्वजनिक कार्यकर्त्यानें वैवाहिक जीवनाची जबाबदारी पत्करतांच कामा नये असा सिद्धान्तच कोणी मांडूं पाहात असेल तर तो चूक आहे. जगद्विख्यात क्रांतिकारकांनीं विवाह केले होतेच कीं नाहीं ? लेनिन, ट्रॉटस्की, मार्क्स, लोकमान्य टिळक अशीं अनेक उदाहरणें दाखवतां येतील. आतां ही गोष्ट खरी, कीं माझ्यासारखे जे निर्धन आणि बुद्धिसामर्थ्याच्या दृष्टीनेंहि दुसऱ्या श्रेणीचे लोक आहेत, त्यांना ह्या दोन्ही अडचणींना तोंड देण्यास लागणारें सामर्थ्य आपल्या अंगीं उत्पन्न करण्यास कांहीं काल थांबावें लागेल. पुरेशी निग्रही वृत्ति आणि ध्येयनिष्ठा निर्माण होण्याआधींच वैवाहिक जीवनाची जबाबदारी अंगावर घेतल्यास त्यांत अपयश येण्याचा जास्त संभव आहे. लग्न लांबणीवर टाकण्यांतहि अडचणी आहेतच. जेव्हां भूक पुष्कळ लागते

आणि खूप खावेसें वाटतें तेव्हां तें मिळत नाहीं. तें मिळविण्यासाठीं टांग्याला जुंपलेल्या घोड्याप्रमाणें परिश्रम करून तें हस्तगत झालें म्हणजे खाण्यावरची वासना उडालेली असते. तारुण्याच्या ऐन भरांत प्रेम करण्याची वासना उत्कट असते. त्या वेळीं तें मिळत नाहीं आणि तारुण्याचा भर ओसरूं लागल्यावर कर्तव्याच्या ओझ्यानें वाकलेलें प्रेम घेऊन प्रपंच करण्यांत स्वच्छंदी प्रेमाची खुमारी नाहीं. पण ही स्थिति नुसत्या सार्वजनिक कार्यकर्त्यांचीच आहे असें नाहीं. सामान्यतः बऱ्याच लोकांना थोड्याफार प्रमाणांत हाच अनुभव येतो. कारण समाजाची घडीच अगदीं विसकटून गेलेली आहे. ती विस्कटलेली घडी नीट बसावी म्हणून प्रामुख्यानें त्याच कार्यास वाहून घेणाऱ्या माणसांना आपल्या खासगी प्रपंचाची घडी विस्कळींत ठेवूनच काम केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

## भवितव्यतेचा सूड

## १०

" क्यूं आज वर्दी नहीं आ गयी अबतक ? " ( आज काम आलं नाहीं अजून ) मीं विचारलं. सकाळीं कांजी पिऊन झाली म्हणजे लगेच कैद्यांना काम मिळत असतें.

" जी नहीं, आज तो आधी वर्दी होगी. ( आज निम्में कामच करावें लागणार ) भाजी कमेटी आनेवाली है " अमीरखाननें जबाब दिला.

दर तीन महिन्यांनीं जिल्ह्यांतील अधिकारी तुरुंगाची पहाणी करण्यास येत असतात. कैद्याला जर कांहीं तक्रार करावयाची असेल तर तो ती या कमिटीकडे करूं शकतो. पण पुस्तकांत नियम असला म्हणजे त्याचा फायदा मिळतोच असें नाहीं. कमिटी गेल्यावर तक्रार करणाराचें कसें कांडांत निघतें, तें ठाऊक असल्यावर तक्रार करण्यास कोणता कैदी हिंमत करूं शकेल ?

फारच झालें तर एकादी भाजी वाईट असते म्हणून सांगणार, पण त्याची तजवीज अधिकारी अगोदरच करून ठेवतात. कमिटी येणार त्या दिवशीं भाजी मुद्दामच चांगली करण्यांत येते. दररोजचें आंबोण असतें म्हणून या कमिटीचें नांव जेलमध्यें भाजी कमिटी असें पडलेलें असतें.

"अस्सं, आज भाजी कमिटी येणार म्हणावयाची. कोण कोण येतील आपल्या बाजूला ?"

"बहुतकरून सेशन जज्ज आणि सुपरिंटेंडेंट येतील इकडे या वेळेस" दुसऱ्या एका कैद्यानें उत्तर दिलें.

"सध्यां कोण आहे रे सेशनजज्ज इथें ?" वसंत खारकरची त्या जागीं नेमणूक झाल्याचें मीं वर्तमानपत्रांत वाचलें होतें. तरीहि मुद्दामच मीं प्रश्न केला.

"खारकर म्हणून कोणी नवीनच आला आहे" असें अमीरखाननें मला सांगितलें.

"ओ हो ! वसंत खारकर इथें आहे का सध्यां ?" माझी आणि त्याची चांगलीच दोस्ती आहे असं दाखविण्याच्या हेतूनें मीं उगीचच्च प्रश्न केला.

"तुमची ओळख आहे वाटतं त्यांची ! मग जरूर तोच आपल्या बाजूला येईल. दादा, आमच्या खटल्याबाबत सांगा कीं त्याला कांहीं. नऊ दहा महिने झाले आम्ही कच्च्या कैदेंतच आहों. अजून खटला सेशनकमिटहि नाहीं झाला." एका अंडर ट्रायल कैद्यानें विनवणी केली.

माझी आणि सेशन जज्जाची ओळख आहे एवढ्यावरच त्याला आशा वाटूं लागली आणि मीहि त्याचा भ्रम दूर करण्याऐवजीं म्हणालों,

"येऊं दे तर खरा इकडे त्याला. मग कांहीं जमलं तर पाहूं." जणूं कांहीं याबाबत सेशन जज्ज माझ्या सल्ल्यानेंच चालणार होता. पण मनुष्य-

स्वभाव आहे. कसेंहि करून आजूबाजूच्या लोकांत थोडा भाव खायचा तो प्रयत्न करीत असतो.

" मास्तरसाहेब, क्या वह आपका गांववाला आहे ? " अमीरखाननें विचारलें.

"अरे, गांववाला काय, मित्रच आहे तो माझा. आम्ही कॉलेजमध्यें एकाच वर्गांत होतों. "

" वाहवा, मग तर छानच झालं म्हणायचं. जणूं देवानंच आमच्यासाठीं पाठवलं तुम्हाला या वार्डांत " त्या अंडरट्रायल कैद्याची आशा जास्तच बळावली.

आमचें हें बोलणें चाललें असतांनाच शिट्टी वाजली. कामिटीचे बडे साहेब आल्याचा तो इशारा होता. सर्व कैदी आपापल्या खोल्यांपुढें उभे राहिले. मीं मात्र खोलीपुढच्या व्हरांड्यांत बिस्तऱ्याला टेकून वर्तमानपत्र वाचण्यांत तल्लीन आहें असा देखावा केला. मी पहिल्या वर्गाचा स्थानबद्ध होतों. मला काय पर्वा या टिनपॉट भाजी कमिटीची ! बादशहाच्या सरकार-विरुद्धच आम्हीं जिथें बंड पुकारलं तिथं या जिल्हाधिकाऱ्यांची काय किंमत ! तरी पण वर्तमानपत्राच्या आडून चोरट्या नजरेनें मी त्यांच्या हालचाली निरखीत होतों.

सेशन जज्ज आणि जेलचा सर्वाधिकारी आमच्या वार्डांत आले. वार्डा-मध्यें खोल्यांची एकच एक सलग रांग होती. एका टोकाला माझी खोली होती आणि मधल्या कित्येक खोल्या रिकाम्या सोडून दुसऱ्या टोकाला इतर कैदी होते. सेशन जज्जनें प्रथम आपला मोर्चा त्या खोल्यांकडे वळविला. तिकडची पाहाणी संपवून मग तो आपल्या बाजूला येईल अशी माझी कल्पना होती. पण—

त्या कैद्यांची पाहणी करून तो जो परत फिरला तों थेट वार्डाबाहेरच पडला. माझ्या खोलीकडे आलाच नाहीं. दूर अंतरावर गेल्यावर एकदां त्यानें

[library stamp]

माझ्याकडे पाहिल्यासारखा मला भास झाला. त्या वेळीं मुख्याधिकारी माझ्या बद्दल कांहीं सांगत असावा असें दिसलें.

या एकंदर प्रकारानें मीं तर अगदीं थिजूनच गेलों. सेशन जज्ज आपला मित्र आहे म्हणून मीं त्या कैद्यांच्यापुढें बढाई मारली होती. पण त्यानें तर माझ्याकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं. माझी ते काय किंमत करतील ? त्यांनीं विचारलें म्हणजे मी त्यांना काय सांगणार आतां ? माझें मन अस्वस्थ झालें. माझा मित्र खारकर तो हा नव्हे असें सांगून वेळ मारून न्यावी असा पहिला विचार आला. एवढ्याशा गोष्टींत खोटं बोलायचं ! माझ्या मनोदेवतेनं मला हटकलें. माझी मलाच लाज वाटली.

मनुष्यस्वभाव मोठा विचित्र आहे. नाहींतर सरकारविरुद्ध बंड करून उठणारांना या सरकारी अधिकाऱ्यांची मातब्बरी कां वाटावी ? इतकेंच काय पण अशा आणीबाणीचे वेळीं हे लोक सरकारची हमाली करून देशाच्या गुलामीच्या शृंखला अधिक घट्ट करतात म्हणून त्यांची निर्भर्त्सनाच करतों ना मी ! मग त्यानें माझी विचारपूस करावी अशी अपेक्षा मीं कां बाळगावी ? पण आम्ही कितीहि जरी क्रांतीच्या घोषणा केल्या तरी आमच्या मनोवृत्तींत अद्याप फरक झालेला नाहीं याची जाणीव मला झाली. जें सरकारी यंत्र मोडण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोंत, त्या यंत्रांतच अधिकाराच्या जागीं असलेल्या लोकांनीं आमची दखलगिरी घ्यावी असें आम्हांस वाटत असतें ! तो कसा लांचखाऊ आहे हें ठाऊक असूनहि जेलर इतरांच्यापेक्षां आपल्याशीं अधिक वेळ बोलत राहिला, सुपरिंटेंडेंटनीं थोडी चौकशी केली म्हणजे जरा बरें वाटतें. कारण त्यामुळें आजूबाजूंच्या कैद्यांत आमची प्रतिष्ठा वाढते. जणूं कांहीं सरकारी अधिकाऱ्यांच्या सर्टिफिकेटाशिवाय आमची योग्यताच सिद्ध होत नाहीं. ज्या सरकारी हुद्द्यांना मीं टाकाऊ समजतों त्यांच्याच मदतीनें मीं आपली प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न करावा ना !

माझे हे विचार चालू असतांनाच सर्व मंडळी पुन्हां माझ्याभोंवतीं गोळा झाली.

" मास्तर, शेसन तर तुमच्याकडं आला बी नाय ! " एका कातवड्यानें भाबडेपणानें विचारलें.

" नाहीं आला बुवा. कोणाला माहित कां नाहीं आला तो ? " मीं अगदीं थंड चित्तानें जबाब दिला.

" पण कॉलेजांत असतांना तुमची आणि त्याची मैत्री होती असें तुम्ही म्हणालां ना मघा ? " त्या अंडरट्रायलवाल्यानें विचारलें. माझ्या खालोखाल त्याला वाईट वाटलें होतें त्याच्या न येण्यानें.

" अरे बाबा, दोस्त असला तर त्या वेळचा, आतां काय त्याचें, खरें कीं नाहीं दादा ? " आतांपर्यंत गप्प असलेला एक कैदी म्हणाला.

" खरं आहे तुझं म्हणणं ! शाळा-कॉलेजांतील मैत्री जन्मभर कायम टिकविणारे असे किती मित्र असतील ? त्यांतहि मनुष्य अधिकाराच्या जागीं असला म्हणजे त्याला जुन्या मित्रांचा विसर पडतो हें साहजिकच नव्हे कां ? " मी किंचित् विषण्ण मनानें ह्मणालों.

" मला तर वाटतं कीं, त्याला भीति वाटत असावी तुमच्याशीं ओळख दाखविण्याची. अहो, कांहीं झालं तरी तुम्ही बंडखोर लोक. तुमच्याशीं सख्य ठेवून का त्याला बढती मिळणार ? "

" या कारणास्तव माझ्याशीं बोलण्याचं तो टाळीत असेल तर मौजच आहे म्हणावयाची. " मी हंसत हंसत म्हणालों. या युक्तिवादानें मला किंचित् आनंदहि झाला.

" कां बरं ? त्यांत मौज वाटण्यासारखं काय आहे ? "

" तूं म्हणतोस तें बरोबर आहे. साधारणपणें अशा परिस्थितींत कोणीहि मनुष्य दचकेल. पण वसंत खारकरवर अशी पाळी यावी याचं मला आश्चर्य

वाटत नाहीं. पण हंसूं देखील येतं, कारण त्याच्या पाठीमागें एक इतिहास आहे. तुम्हां मंडळींना त्यांत तितकीशी गोडी वाटणार नाहीं. ”

“ आम्हांला कां नाहीं वाटणार गोडी ? सांगा तर खरं ! आमच्या-सारख्यांना या गोष्टी कोण सांगायला बसलंय् ?” त्यांपैकीं एकजण म्हणाला व इतरांनीं माना डोलावल्या.

मनांतली खळबळ कोणाजवळ तरी काढून टाकावी असें मलाहि वाटत होतेंच. तेव्हां विशेष आढेवेढे न घेतां त्यांना आमच्या गत जीवनांतील आजच्या प्रसंगानें ताज्या आठवणी निवेदन करण्यास मीं सुरुवात केली. तो चित्रपट माझ्या मनःचक्षूंपुढून पटापट सरकूं लागला.

“ वसंत खारकर आणि मी कॉलेजांत शिकत होतों. इतकेंच काय पण आम्ही वर्गबंधु होतों. त्या वेळच्या आणि आजच्या परिस्थितींत जमीन अस्मानाचा फरक आहे. त्यावेळीं आम्हीं आमच्या भावी जीवनांतील अद्-भुतरम्य चित्रें रंगवीत असूं.माझे वडील हुजूर डेप्युटी कलेक्टर होते. त्यांना स्वतःला कलेक्टर होण्याची मुळींच शक्यता नव्हती आणि म्हणूनच कीं काय, मी विलायतेंत जाऊन आय. सी. एस. होऊन यावं असं त्यांना वाटे. आय. सी. एस. होऊन सरकारदरबारीं मान्यमान्यता मिळवावी यांतच त्यांना माझ्या जीवनाचें साफल्य दिसत होतें. मीहि लहानपणापासून त्याच वातावरणांत वाढलेला होतों. त्यामुळें हळूहळू त्यांची इच्छा ती माझीहि महत्त्वाकांक्षा बनली. कित्येक वेळां मी जणूं आत्तांच आय. सी. एस. झालों आहे अशा भ्रमांत भावी जीवनाचीं सुखस्वप्नें अनुभवीत असें. अनेक सुंदर सुंदर मुली मला सांगून येत आहेत. त्यांपैकीं एका लावण्यलतिकेबरोबर मीं विवाह केला आहे, असें एक चित्र डोळ्यांपुढें उभें राही तर लगेच दुसरी शेखमहंमदी सुचे. पैसा व सौंदर्य यांना तुच्छ लेखून जिनें माझें हृदय हिरावून नेलें आहे अशा माझ्या प्रेयसीबरोबर संसार थाटला आहे अशी मी कल्पना करी. कलेक्टरीचा इतमाम, नोकरचाकर, धनदौलत आणि त्याबरो

वर प्रीतीची फुलबाग ! माझें हृदय नुसत्या कल्पनेनेंच उत्फुल्ल होई. पण कुटुंबियांच्या सहवासाप्रमाणें मित्रांचाहि सहवास घडत असे. तेहि भावी जीवनाचे आदर्श पुढें ठेवीत. त्यांचा परिणाम माझ्या जीवनावर झाल्यावांचून कसा राहील ? त्यांच्या देशसेवेव्रताव्रतच्या रोमांचकारी गोष्टी मी ऐकत असे. वसंत खारकर हा त्या ध्येयवादी मंडळींचा स्फूर्तिदेव होता. त्याच्याच प्रेरणेनें त्यांनीं एक राष्ट्रोन्नतिसंघ स्थापन केला होता. त्याच्याकडून अलोट त्यागानें संपन्न अशा भव्य आणि दिव्य जीवनांचीं वर्णनें ऐकलीं म्हणजे माझें मनहि मंत्रमुग्ध होई. मीहि मनांतल्या मनांत एका आय. सी. एस. देशभक्ताचें जीवन कल्पनेच्या कुंचल्यानें रंगवून पाहीं आणि त्याचाहि मला मोह वाटे. मग सुभाषबाबूंच्यासारखी मीहि आय. सी. एस. वर लाथ मारून राजकारणांत उडी घेतली आहे, माझ्या त्यागानें आणि धडाडीनें मीं जनतेचें अपार प्रेम संपादन केलें आहे आणि भावनांनीं उचंबळणाऱ्या जनमनाच्या उंच लाटेवर मी आरूढ झालों आहें असा मला भास होई.

त्या मंडळींच्या मनांत मला आपल्या संघांत सामील करून घ्यायचें होतें आणि त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्नहि चालू होते. वसंत खारकरनें प्रथम माझ्याशीं स्नेहसंबंध जोडले आणि मग एके दिवशीं मला संघाच्या गुप्त बैठकीस बोलावण्यांत आलें. त्यांचे विचार, स्वातंत्र्यसंपादनाच्या योजना आणि अंतिम त्यागाच्या प्रतिज्ञा वगैरे ऐकून मी तर गुदमरूनच गेलों. सरकारी नोकरी वगैरे न करतां आपलें सर्वस्व स्वातंत्र्यार्थ होमण्याची शपथ घेण्याचें धैर्य माझ्या अंगीं नव्हतें. तरी पण मीं एकदम नकार दिला नाहीं. आय. सी. एस. सारखी परीक्षा पास होऊन मग देशसेवेचें व्रत घेणें ध्येयसिद्धीच्या दृष्टीनें कसें उपयुक्त आहे तें पटवून देण्याचा मीं प्रयत्न केला. माझा युक्तिवाद निष्फळ होता. माझे विचार त्यांपैकीं कोणालाच पटले नाहींत. कित्येकांनीं उपहाससूचक हास्य केलें तर कांहींनीं सडेतोडपणें आपला विरोध दर्शविला. खारकरचा सात्विक संताप तर पराकोटीला गेला. ‘ तूं आय.

सी. एस. होऊन एखाद्या जिल्ह्याचा कलेक्टर झालास तर तुला गोळी घालून ठार करणं आमचें कर्तव्य ठरेल.' तो त्वेषानें म्हणाला. त्याचा आवेश इतका चढला कीं, हें वाक्य उच्चारीत असतांना जणूं त्या क्षणींच तो माझ्यावर रिव्हॉल्व्हर झाडीत आहे असा त्यानें अभिनय केला. मलाहि कोणीं तरी पिस्तूल रोखून उभा आहे असा भास झाला आणि माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला.

"कालाचा ओघ नेहमींसारखा अविरतपणें चालला होता. आमचें कॉलेज शिक्षण संपवून आम्ही बी. ए. झालों. पण मध्यंतरीच्या काळांत कितीतरी परिवर्तनें घडलीं होतीं. परीक्षेचा अभ्यास करण्यासाठीं म्हणून राष्ट्रोन्नति-संघाचें काम बेमुदत तहकूब करण्यांत आलें, तें पुनः कधीं सुरू झालेंच नाहीं. देशोद्धाराच्या हेतूनें प्रेरित होऊन सुरू केलेल्या अशा किती संस्था जन्माला येऊन अस्ताला गेल्या असतील कोण जाणे! आम्ही मात्र अजून गुलाम ते गुलामच आहों.

"या अवधींत माझ्यावरहि जो एक प्रसंग ओढवला त्यामुळें माझ्या जीवनाला आकस्मिक रीत्या एक नवीनच वळण मिळालें. मी ज्यूनिअरमध्यें असतांना माझे वडील एकाएकीं विषमज्वरानें वारले आणि विलायतेला जाण्याचे माझे मनोरथ पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें जमीनदोस्त झाले. मला बी. ए. च्या परीक्षेंत चांगलें यश मिळालें होतें. पण विलायतेला जाण्याची कल्पना आतां सोडून देणें भाग होतें. बाह्य परिस्थितीप्रमाणेंच माझ्या मानसिक जीवनामध्येंहि परिवर्तन घडलें होतें. वडिलांच्या मृत्यूनंतर मी एका थोर विभूतीच्या निकट सहवासांत आलों आणि मला एका निराळ्याच आदर्श जीवनाचें दर्शन झालें. सन १९३० सालीं महात्मा गांधींनीं कॉंग्रेसच्या वतीनें देशांतील तरुण पिढीला हांक मारली त्यावेळीं मला स्वस्थ बसणें अशक्य झालें. किंबहुना त्यामुळें मला आनंदच झाला. पुरुषार्थाच्या मार्गाचें अंधुक दर्शन झालें. माझ्याबरोबर राष्ट्रोन्नतिसंघांतील दुसरेहि कांहीं सभासद होते. त्या मार्गावर एकएक पाऊल टाकीत आज मी येथवर येऊन पोंचलों आहें.

ऑगस्ट आंदोलनांत ज्या घटना घडल्या त्याचा परिणाम म्हणून माझ्यावर गुप्त कट आणि खून केल्याच्या आरोपावरून खटला चालू आहे.

" राष्ट्रोन्नति-संघाचें कार्य तहकूब झाल्यावर ज्या घडामोडी झाल्या त्यामुळें वसंत खारकरच्या आयुष्यांतही मोठी क्रान्ति झाली. जात्याच बुद्धिमान व परिश्रमी असल्यामुळें त्यानें बी. ए. च्या परीक्षेंत अपूर्व यश संपादन केलें. मुंबई विश्वविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांत तो पहिला आला. अनेक पारितोषिकें आणि शिष्यवृत्त्या त्यानें मिळविल्या. एका बडया कॉंट्रॅक्टरच्या सुस्वरूप मुलीबरोबर त्याचें लग्न झालें. सासऱ्याच्या आणि प्रिन्सिपॉलच्या आग्रहावरून तो विलायतेस गेला, आणि आय. सी. एस. होऊन आला. याच जिल्ह्याचा सेशन जज्ज म्हणून त्याची नेमणूक व्हावी आणि माझा खटलाहि येथेंच चालावा हा एक विलक्षण योगायोग नाहीं का ? माझी केस जर सेशन कमिट झाली तर फांशी देण्याचें कटु कर्तव्यहि त्याला करावें लागेल.

मी हें बोलून गेलों खरा, पण वाक्य पुरें होतांच वीज चमकावी त्याप्रमाणें मला त्याच्या अर्थाचें आकलन झालें, आणि माझ्या अंतःकरणांतून व शरिरांतून एक प्रकारचें कांपरें वाहत गेल्यासारखें झालें. लगेच माझ्या मनांत दुसरा विचार आला, ज्या दुष्ट आणि करुण परिस्थितीची मला चांगली कल्पना आली नव्हती त्याची जाणीव असल्यामुळेंच तर त्यानें माझ्याकडे येण्याचें टाळलें नसेल ना ? अरेरे, मीं उगीच दोष दिला त्याला.

" कांहीं का असेना तो आपल्या वचनाला जागला म्हणायचा. त्या वेळीं देशद्रोही म्हणून प्राणदंडाची शिक्षा देण्याचा त्याचा मानस होता. आतां देशावर प्रेम केल्याचा गुन्हा केला म्हणून देईल. कारण कोणतेंहि असलें तरी परिणाम एकच ना ! " माझें निवेदन संपतांच श्रोत्यांपैकीं एक उपरोधिकपणें म्हणाला. त्यावर दुसरे कैदी मोठ्यानें हंसले तेव्हां मी माझ्या तंद्रींतून जागा झालों.

" खरं आहे तुझं म्हणणं. दैवाच्या मनांत आमच्यावर सूडच उगवावयाचा असला तर तसंहि होईल. " मी सुन्न मनानें म्हणालों.

# केवळ क्रान्तीसाठीं

# ११

" आहे ऽ ऽ ऽ बुवा ! आज काल क्रान्तिकार्याचा जोर दिसतोय अगदीं " चहाचा कप खालीं ठेवीत एक तरुण म्हणाला.

संध्याकाळीं साडेसात आठच्या सुमाराला एक उमदा कॉलेज तरुण आणि एक फटाकडी कॉलेज तरुणी लकी रेस्टॉरंटमध्यें प्रवेश करीत होती. त्यांना उद्देशूनच आणि ऐकूं जाईल अशा हेतूनेंच वरील वाक्य उच्चारलेलें होतें.

ते उद्‌गार कानांवर पडतांच ज्या दिशेनें आवाज आला, त्या बाजूला दोघांचीहि नजर आपोआप गेली. गुलहौशी आणि रंगेल तरुणांचें तें एक टोळकें होतें. एका टेबलाभोवतीं बसून चहा ढोसण्याचा आणि धूम्रपानाचा कार्यक्रम चालू होता.

मंडळी परिचयाची आहेत असें पाहून त्या तरुणीबरोबर आलेल्या तरुणानें

चटकन आपलें तोंड वळविलें आणि आपल्या मैत्रिणीला घेऊन भरभर जिन्याच्या पायऱ्या चढण्यास सुरवात केली.

पण तेहि पुणेरी तरुणच होते. सहजासहजीं थोडेच जाऊं देणार ? त्याला ऐकूं जाईल इतक्या मोठ्या आवाज़ांत एकजण म्हणाला, " पण काय रे आज जवाहरलाल नेहरूंचं जाहीर व्याख्यान आहे ना ? मग 'मंडळी' इकडे कशी काय ? "

" अरे बाबा, जवाहर आणि माणिक यांच्यांत टाय पडला तेव्हां आम्हीं माणिकच पसंत केलं. " पहिल्या तरुणानें उत्तर दिलें. त्याचीं तीं मुक्ताफळें ऐकून टेबलाभोंवतीं हास्याची खसखस पिकली.

चटोरे पोरांचा तो विनोद ऐकून सुरेश विरमल्यासारखा झाला. पण माणिकची चर्या मात्र प्रफुल्लित झाली. तिच्या गालाला एक लहानशी खळी पडली. सुरेशनें तिच्याकडे पाहिलें तेव्हां त्याला ती अधिकच आकर्षक दिसली.

" ऐकलंत ना त्यांचं बोलणं ? तुमच्या कानापर्यंत जावं म्हणून होतं तें." दुसऱ्या मजल्यावरच्या स्पेशल रूममधे बसल्यावर तिनें खवचटपणानें विचारलें.

" चहाटळांच्या नादीं काय लागायचंय. ती एक टवाळ टोळी आहे. मी त्यांना चांगला ओळखतों. " उसनें आवसान आणून सुरेश म्हणाला. पण त्याच्या चेहऱ्यावरून तो चांगलाच नर्व्हस झालेला दिसत होता.

" मला तर यांचा प्रश्न अगदीं सयुक्तिक वाटतो. तुम्ही एक क्रांतिकारक कार्यकर्ते नेहरूंच्या व्याख्यानाला जायच्या ऐवजीं आज एका फॅशनेबल मुलीबरोबर लकींत आलांत हें आश्चर्यच नाहीं का ? " तिनें त्याला अधिकच डिवचलें. स्वतःच्या मोहिनीबद्दल मनांतल्या मनांत तिला अभिमानहि वाटत होता.

" पुरे झाली तुझी थट्टा. तूं काय घेणार तें सांग पाहूं आधीं. " किंचित् चिडक्या वृत्तीनें त्यानें विचारलें.

" पण इतकें चिडायला काय झालं त्याच्यांत ? पराक्रमी तरुणाला एकाद्या सुंदर मुलीबद्दल आकर्षण वाटावं हें स्वाभाविकच नाहीं का ? तोहि पुरुषार्थाचाच एक भाग आहे. पुष्कळसा बर्फ घालून आपण व्हिस्कीच घेऊं म्हणजे तुमचा नर्व्हसनेस जरा कमी होईल, कीं त्याहून उत्तेजक हवंय कांहीं ?" तिनें हंसत हंसत विचारलें.

" माणिक, तूं देखील यांच्याप्रमाणे बाष्कळ थट्टा करावीस याचं मला आश्चर्य वाटतं. " पोऱ्याला व्हिस्कीची ऑर्डर देऊन तो म्हणाला.

" अतीच बाई हळवेपणा तुमचा. मला नाहीं इतका सॉफ्टनेस आवडतं. दोन द्यायची आणि घ्यायची तयारी ठेवली पाहिजे माणसानं या दिवसांत. "

" त्या फुटकळ लोकांच्या नादाला लागून आपलीच शोभा करून घ्यायची माझी इच्छा नाहीं " तो किंचित् निश्चित स्वरानें म्हणाला.

" पण खरंच, सांग ना आज तुम्ही नेहरूंच्या व्याख्यानाला जायचं सोडून माझ्याबरोबर फिरायला यायचं कसं कबूल केलंत ? " तिरक्या नजरेनें सुरेशकडे पहात माणिकनें मिस्किलपणें विचारलें.

" तें तुला चांगलं ठाऊक आहे, पण बायकांना पुरुषांच्या तोंडून वदवून घेण्याची हौस असते. "

इतक्यांत व्हिस्कीचे ग्लास पोऱ्यानें टेबलावर आणून ठेवले. ते पाहून माणिक म्हणाली. " आज तुम्ही स्मोक मागविला नाहीं ? "

" मीं ठरवलं आहे कीं आतां सोडून द्यायची सिगारेट. "

" तें काय म्हणून ? कोणाच्यासाठीं हा नियम ? तें कांहीं नाहीं, आज तरी ओढाच माझ्या देखत. मला तुम्ही ओढता त्या सिगारेटचा वास फार आवडतो. मीच मागवून देतें तुम्हाला " असें म्हणून खरोखरच तिनें घंटा वाजविली. आणि पोऱ्याला डी लक्स टेनारचा एक डबा आणायला सांगितलें.

डबा आल्यावर सुरेशनें चटकन तो फोडला. आणि त्यांतली एक सिगारेट आपल्या दोन ओठांमध्यें अलगद ठेवून ती शिलगावण्यासाठीं काडी ओढली.

ती कांडी सिगारेटशीं जाण्याआधींच माणिकनें फुंकर मारून ती विझवली.

' स्टुपिड ' तो ओरडला. तोंडांत सिगारेट असल्यामुळें त्या ओरडण्यांत एक प्रकारचा लाडिक तोतरेपणा होता.

माणिकनें बुलबुल पक्षाच्या आवाजांत एक गोड हास्य केलें.

अशा प्रकारच्या गोड गप्पा आणि लाडिकपणा किती वेळ तरी चालल्या होत्या. तीं दोघं लकींतून बाहेर पडलीं तेव्हां चांगले साडे आठ नऊ वाजायला आले होते. इतका उशीर झाला असला तरी त्यांचीं पावलं अगदीं सावकाश पडत होतीं. एकमेकांपासून दूर होण्याचा क्षण जितका दूर लोटतां येईल तितका लोटण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मध्येंच जाणून-बुजून माणिकनें आपल्याला धक्का दिल्यासारखा त्याला भास झाला. पण लगेच त्याला वाटलें कीं आपलें इतकें भाग्य कुठलें ? थोडा वेळ गेल्यावर समोरून एक सायकल जोरानें आली. आपण जणूं काय सायकलखालीं सांपडणार होतों अशा आविर्भावानें माणिक एकदम दूर झाली आणि तिनें सुरेशचा हात गच्च धरला.

शेवटीं फर्ग्युसन कॉलेजच्या आवारापाशीं आल्यावर एका झाडाच्या अंधारांत थांबल्यासारखं करून सुरेश म्हणाला, " बरं मी येऊं आतां ?" त्यानें आपला हात पुढें केला. माणिकनें तो चटकन् पकडला आणि भावनावेशानें घट्ट दाबला.

हातांत हात तसाच ठेवून ती म्हणाली. "आतां पुन्हां केव्हां भेटणार ?"

" आतां असं हॉटेलांत नको. तूंच ये कीं माझ्या खोलीवर चहाला " माणिकनं त्या आमंत्रणाचा स्वीकार केला आणि त्याचा हात अधिक घट्ट दाबला. त्यानं एकदम खालीं लवून तिच्या हाताचं चुंबन घेतलं.

" बरेच आहांत कीं " आपला हात सोडवून घेत लटक्या रागानं ती म्हणाली.

तीं दोघंही निरोप घेऊन निरनिराळ्या दिशेनें चालूं लागलीं. खोलीवर

परत येत असतांना सुरेशचं हृदय आनंदानं नाचत होतं. माणिकच्या हातावर केलेल्या ओष्ठस्पर्शानं त्याचं शरीर सुखानं भारावून गेलं होतं. त्या घटनेच्या स्मृतीनें पुन्हां पुन्हां त्याच्या अंगावर रोमांच उभे रहात. एक प्रकारची गोड निशा तो अनुभवीत होता.

पांच सहा दिवसानंतरची गोष्ट. सुरेश त्याच्या गटाची एक सभा संपवून खोलीवर परत येत होता. आज सकाळीं तो जो घराबाहेर पडला तो बाहेरच होता. सभेंत एका अतिशय महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा होऊन कॉंग्रेसची चळवळ सुरू होण्याच्या आधींच गटाच्या महत्त्वाच्या सभासदांनीं अज्ञातवासी व्हावं असं ठरविण्यांत आलं. पण परत येत असतांना सुरेशच्या डोक्यांत याहून अगदीं निराळे विचार चालले होते. सभेंतली चर्चा तो विसरून गेला होता. उद्यां सकाळीं आठ वाजतां माणिक त्याच्या खोलीवर चहाला येणार होती त्यां संबंधींच त्याचे विचार चालू होते. चहासाठीं काय काय तयारी करावी, तिच्याशी कोणत्या गोष्टी बोलाव्या. इत्यादी योजना करण्यांतच त्याचं मन दंग होतं.

तो केव्हां खोलीवर येऊन पोंचला ते त्याचं त्याला तरी समजलं कां नाहीं कोण जाणें ! त्या गोड तंद्रींतच त्यानें कुलूप काढून खोलीचं दार उघडलं. दारांतच पोष्टमननें टाकलेलें पत्र पडलेलें त्यानें पाहिलें. कपडे वगैरे काढून त्यानें तें पत्र उघडलें. पत्र त्याच्या वडिलांचें होतें.

" चिरंजीव सुरेश यास अनेकोत्तम आशिर्वाद. वि.

एका महत्त्वाच्या प्रश्नाबाबत तुला लिहावयाचें बरेच दिवस मनांत आहे. तुझी परीक्षा पास होऊन तूं मोकळा झालास म्हणजे मगच लिहावें असा विचार करून आतांपर्यंत लिहिलें नाहीं. आतां तूं परीक्षेंतून मोकळा झाला आहेस. तेव्हां मी जें लिहिणार आहे त्याचा शांत मनानें आणि व्यवहारी बुद्धीनें विचार करून मला उत्तर पाठव. अर्थात कोणतीही गोष्ट तुझ्या मर्जीविरुद्ध करण्याची माझी इच्छा नाहीं हें तूं जाणतोसच.

माझे स्नेही श्री. भास्करराव ढवळे यांचा आणि आपल्या घराण्याचा ऋणानुबंध आहे हें तुला ठाऊक आहेच. त्यांची सुमन आणि तूं तर परवां-परवापर्यंत एकत्र खेळलां आहांत. तुमच्या लहानपणीं आम्ही चेष्टेनें म्हणत असूं कीं हा जोडा मोठा चांगला शोभेल. तुम्हांला समजूं लागल्यावर आम्ही मुद्दामच या गोष्टी बोलत नसूं. असं जरी आहे तरी तुम्हाला परस्पराबद्दल जिव्हाळा वाटत असावा अशी माझी समजूत आहे. सुमनच्याबद्दल माझी खात्रीच आहे. हें पत्र मी तिच्याच अप्रत्यक्ष सूचनेवरून लिहीत आहे असं म्हणेनास. ती आतां मोठी झाली आहे आणि भास्कररावांच्या मनांत या वर्षी तिचं लग्न उरकून घ्यावं असं आहे. सांपत्तिक स्थिती आपल्यापेक्षां बरीच निकृष्ट असल्यामुळें त्यांनीं मला कधींच विचारलें नाहीं. दुसरेंच एक स्थळ त्यांनीं पाहिलें असून तेथें जवळजवळ ठरत आल्याप्रमाणेंच आहे. आतां शेवटचीं बोलणीं करावयाचीं आहेत. तरी तुझें मत काय आहे तें उलट टपालीं कळव. सुमन माझी सून व्हावी अशी माझी अतिशय इच्छा आहे. तरीही तुझ्या मर्जीवर सर्व अवलंबून आहे. कळावें.

तुझे

बाबा.

वडिलांचें पत्र वाचून सुरेश सर्दच झाला. माणिकच्या प्रेमानं त्याचं मन आकाशांत भराऱ्या मारीत होतें. अलिकडे त्याच्या रोमरोमांत माणिक भरून राहिली होती. तिचें चालणें, बोलणें, हंसणें, तिचें रूप, तिचा चावनट लाडिकपणा आणि स्पर्श, या सर्व गोष्टी त्याच्या चिंतनाचे विषय होते. त्याचं मन प्रीतीच्या भावनेनें भरून राहिलें होतें. पण या दुधाच्या घागरींत वडिलांनीं चांगलें मूठभर मीठ टाकलें.

त्यानें पत्र रागारागानें टेबलावर भिरकावून दिलें. त्याला वडिलांचा मनस्वी संताप आला. पण करतो काय ? अगदीं चिंतामग्न स्थितींत त्यानें आराम खुर्चीवर अंग टाकलें.

काय करणार? त्याच्या मनांत भयंकर रस्सीखेंच सुरू झाली. सुमन-बद्दल त्याला पूर्वी जिव्हाळा वाटत होता ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. पण कॉलेजांत माणिकची आणि त्याची ओळख झाल्यावर सुमनचें सौन्दर्य त्याला आळणी वाटूं लागलें. त्यांत चमक नव्हती. त्याच्या अगदीं उलट माणिकचं होतें. ती कशी विद्युल्लतेसारखी चमचम करी. सुमनमध्यें एक प्रकारचा नसता गंभीरपणा होता. त्यापेक्षां माणिकची खेळकर वृत्ति त्याला अधिक पसंत पडे. सुरेशची चेष्टा करून मग ती हंसे तेव्हां तिच्या हंसण्याचा खिल-खिलाट बुलबुल पक्षाच्या आवाजाची स्पर्धा करीत असल्याचा भास होई. तें कसेंही असलें तरी सुमन आतां त्याच्या मनांतून उतरली होती.

बराच वेळ विचार करून आणि मनांतल्या मनांत चडफडून त्यानें निद्रा-देवीची उपासना करण्यास सुरवात केली. पण ती अशी सहसा प्रसन्न होण्यासारखी नव्हती. अंथरुणावर पडल्या पडल्या पुन्हां त्याचें विचारचक्र फिरूं लागलें. सुमनला नाहीं म्हणणेंहि जरा अवघड होतें. पत्र आल्यापासून तिच्याबरोबर घालविलेल्या दिवसांची आठवण पुन्हां ताजी झाली होती. तरी पण अखेरीस त्यानें तो निर्णय घेतला. पण वडिलांना काय वाटेल? त्यांच्या इच्छेविरुद्ध जाण्याची त्याला भीति वाटत होती. त्यांनीं जरा सौम्य शब्दांत लिहिलं असलें तरी ती एक विशिष्ट प्रकारची आज्ञाच होती. काय करावें हें त्याला सुचत नव्हतें.

तासामागून तास चालले होते. शेजारच्या घड्याळांत एकाचा टोला पडल्याचेंहि त्यानें ऐकलें. आणखी थोड्या वेळानें त्याला एक युक्ती सुचली. एकदम तो उठून बसला. त्यानें बटन दाबून दिवा लावला आणि एक सिगारेट शिलगावून वडिलांना पत्र लिहिण्यास सुरवात केली.

पत्रलेखन संपवून तो अंथरुणावर पडला तेव्हां दोनाचे ठोके पडल्याचे त्यानें ऐकलें. पण आतां त्याचें विशेष महत्त्व नव्हतें. प्रश्न सुटल्यामुळें मना-वरचं दडपण एकदम कमी झालेलें होतें. मध्यरात्रीं सुटलेल्या वाऱ्याच्या

झुळकीनें देखील आपलं काम केलं आणि लौकरच त्याला झोंप लागली.

एरवीं इतकें जाग्रण झालें असतें तर दुसऱ्या दिवशीं दहा वाजेपर्यंत तो अंथरुणाच्या बाहेर पडला नसता. पण त्या दिवशीं पहिली झोंप झाल्याबरोबर सहाच्या ठोक्यालाच त्यानें पांघरुण फेकून दिलें आणि तो चहाच्या तयारीला लागला. विशेष तयारी अशी करायची नव्हतीच. क्रीमक्रॅकर बिस्किटांचा पुडा त्यानें आदल्या दिवशींच आणून ठेवला होता. समोरच्या डेरींतून अर्धा शेर ताजें दूध तो घेऊन आला. आणि टेबलावर चहाचं सर्व साहित्य व्यवस्थेशीरपणें मांडून ठेवलं. एका फुलदाणींत फ्रान्सच्या गुलाबाचं एक सुंदर फूल डहाळीसकट ठेवून दिलं.

सकाळचं वर्तमानपत्र चाळीत आतां तो बसला होता. पण त्याचं लक्ष वर्तमानपत्रांत नव्हतं. माणिकच्या आगमनाची तो उत्कंठेनें वाट पहात होता. प्रत्येक क्षण त्याला युगाप्रमाणें वाटत होता. पण अखेरीस त्याला हवा असलेला क्षणहि आला. आणि दारावर ' टिक टिक ' असा आवाज ऐकूं आला.

तो चटकन उठला आणि त्यानं दार उघडलं. अपेक्षेप्रमाणें माणिकच दारांत उभी होती.

" यावं ! मीं म्हटलं लक्षांत रहात कीं नाहीं, कोणास ठाऊक ? " सस्मित वदनानें तो म्हणाला.

" कां बरं. आतांच आठ वाजले ना ? " तिनें आपल्या रिस्टवॉचकडे पहात विचारलं.

त्याला आपली चूक लक्षांत आली. तो जरा विरमल्यासारखा झाला, पण आपली बाजू सावरण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत तो म्हणाला, " तें खरं, पण मीं म्हटलं कीं, तुम्हांला अनेक एंगेजमेंटस असायच्या तेव्हां आमचं गरिबाचं आमंत्रण विसरून गेलां तर काय करतां ! "

" लक्षांत न रहायला काय झालं ? असल्या गोष्टींचा का विसर पडतो

माणसाला ? " त्याच्यावर आपली नजर रोखून तिनें आपल्या चेहऱ्याचें प्रश्नार्थक चिन्ह केलें.

" बाकी तुमच्यासारखीं गरीब माणसं भेटलीं म्हणजे श्रीमंतांनीं आपला गाशाच गुंडाळायला हवा " आपल्या खालच्या ओठाला लाडिक मुरड घालून ती म्हणाली.

तिचें तें ध्यान पाहून तो खुशावला.

" बरं चहा अगोदर घेऊन मग गप्पा मारायच्या कीं चहा मागाहून घ्यायचा ?"

" आपल्याला अगोदर चहा पाहिजे " तिनें उत्तर दिलें. तो उठला आणि स्टोव्ह पेटवण्यासाठीं टेबलाजवळ गेला. ती पण त्याच्या मागोमाग उठली आणि लाडिकपणें त्याच्या हातांतली काडीपेटी घेऊन म्हणाली, " तुम्ही व्हा बाजूला. मीच करतें आज चहा. "

" नको नको ! एवढी तसदी नको घ्यायला. तुम्ही आपल्या स्वस्थ आरामखुर्चींत आराम करा आणि वाटल्यास हा सकाळ वाचा. " असें म्हणून त्यानें तिच्या दोन्ही दंडाला धरून तिला आराम खुर्चींत बसविलें आणि तो चहा बनविण्यामागें लागला.

" खरंच. चहा फार छान झाला आहे हो. फ्लेवर तर अगदीं बहारीचा आला आहे." कपाला तोंड लावीत माणिकनें सर्टिफिकीट दिलें.

एकदोन घोट घेऊन कप खालीं ठेवतांना त्यावरच्या अक्षरांकडे तिचें लक्ष गेलें.

" अय्या ! फरगेट मी नॉट ! वा वा. इतका सुरेख लज्जतदार चहा कोण विसरेल " ? असें म्हणून तिनें तिरक्या नजरेनें सुरेशकडे पाहिलें.

सुरेशला तिची कोटी पसंत पडली नव्हती. चहाचा विसर पडूं नये म्हणून का त्या अक्षरांची योजना होती ! आपल्याला डिवचण्याचा तिचा हेतुपुरःसर प्रयत्न होता हें त्याच्या लक्षांत आलें.

"काय हो सुरेश ! आतांच त्या सकाळमध्यें वाचलं कीं क्विट इंडियाच्या घोषणेवर गांधी प्रचंड चळवळ करणार म्हणून तें खरं का ?"

"खरं म्हणजे ! गांधीजी जें बोलतात तें पूर्ण विचारांतींच बोलत असतात. त्यांचे शब्द म्हणजे तुमच्या आमच्या शब्दांप्रमाणें वायफळ नसतात. त्यांचे शब्द हेंच जणूं कार्य आहे. अगदीं निरुपाय झाल्यामुळेंच त्यांना हें अस्त्र योजावं लागत आहे."

"मला नाहीं वाटत लोक या वेळीं ते म्हणतात तशा बंडाला पाठिंबा देतील म्हणून." ती शिष्टपणें म्हणाली.

"कां बरं ? माझी तर अगदीं निराळी कल्पना आहे. परवांच ते अच्युत-राव पटवर्धन म्हणाले कीं या खेपेची चळवळ अपूर्व होईल. वातावरण सारखं गरम होत आहे. हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य मिळवायचें असेल तर हीच नामी संधी आहे. मात्र प्रत्येकानं आपलं कर्तव्य केलं पाहिजे."

"म्हणजे तुमचा देखील पाठिंबा आहे म्हणायचा या चळवळीला. ती गुलाब रणदिवे तर म्हणत होती कीं कामगार वर्ग या चळवळीला मुळींच पाठिंबा देणार नाहीं."

"तिचा भाऊ कम्युनिस्ट आहे. त्याचें ऐकून ती म्हणत असेल. तें खरं नसून केवळ त्यांच्या इच्छेचं निदर्शक आहे."

त्याचं वाक्य पुरें होण्याच्या आधींच दारावर कोणीतरी मोठ्यानें टिकटिक केलं.

सुरेशच्या कपाळाला आंठ्या पडल्या. आतां ही ब्याद कशाला आली असें वाटलें त्याला. पण करतो काय बिचारा ! दार उघडण्याशिवाय गत्यं-तरच नव्हतें.

तो श्रीनिवास बेलसरे होता.

"ये रे" म्हणून त्यानें त्याचें तोंडदेखलें स्वागत केलें आणि लगेच

" हे माझे मित्र श्रीनिवास बेलसरे, येथील S. P. कॉलेजांत असतात. " म्हणून त्यानें माणिकशीं त्याची ओळख करून दिली.

त्यानें तिला एक औपचारिक नमस्कार केला.

त्याची प्रश्नार्थक मुद्रा पाहून माणिक हंसत हंसत म्हणाली,

" अहो, पण माझी यांना Introduction करून द्याना. "

" अरे हो विसरूनच गेलों कीं. या माणिक कीर्तीकर बरं का ! "

श्रीनिवासनें थोडेसें हंसल्यासारखें केलें. कारण हंसण्यासारखें कांहीं नव्हतेंच. त्यानें माणिकला अनेक वेळ सुरेशबरोबर पाहिलें होतें. आज तिला त्याच्या खोलीवर पाहून त्याला तितकेसें बरें वाटलें नाहीं.

" बरं चहा घेणार का श्रीनिवास ? "

सुरेशचा प्रश्न ऐकून श्रीनिवास आपल्या तंद्रींतून भानावर आला आणि म्हणाला, " नको नको, मी हा आत्तांच घेऊन आलों. रात्रींच्या सभेची आठवण द्यायला म्हणून आलों होतों. विशेष काम नव्हतं. "

" तुम्हीं घेतला असेल सकाळीं पण आमच्या बरोबर घ्याना आणखी एक कप. " ती म्हणाली.

माणिकनें एका कपांत एक चमचा साखर घालून त्याच्याकडे पाहिलें. " बस बस. " श्रीनिवास म्हणाला.

सुरेशनें कपांत चहा ओतला आणि माणिकनें चमच्यानें तो हलविला तेव्हां तिच्या हातांतल्या बांगड्यांचा ' किण किण ' असा आवाज आला. श्रीनिवासला जरा चोरट्यासारखें झालें. तो अनाहूत पाहुणा होता, रंगांत भंग करायला. चहाचा कप कसा तरी घशाखालीं ओतून आणि उगींच दोन चार वाक्यें बोलून तो उठला आणि ' बरें येतों ' म्हणून त्यानें माणिकला नमस्कार केला.

" मी यांना दरवाजापर्यंत पोचून येतों बरं का !" असें म्हणून सुरेश त्याच्याबरोबर खालीं गेला.

सुरेश खोलीबाहेर गेल्यावर माणिक उठली आणि सुरेशच्या टेबलापाशीं जाऊन त्यावर ठेवलेल्या आरशांत तिनं आपला चेहरा पाहिला. ब्लाऊजच्या खिशांतून एक चिमुकला रुमाल काढून तिनें तोंडावरच्या पावडरीची जरा साफसफाई केली. स्वतःचें मुख आरशांत पाहतांना ती प्रफुल्लित झालेली दिसली. स्वतःच्या सौंदर्यावर ती स्वतःच फिदा होती.

टेबलावरच्या वस्तूंची उगीच चाळवाचाळव करतांना तिनें सहज टेबलाचा ड्रॉवर उघडला. एका राइटिंग पॅडवर सुरेशच्या सुंदर अक्षरांत लिहिलेलें एक पत्र तिच्या नजरेस पडलं. काल रात्रीं लिहिलेलं पत्र अजून पाकिटांत बंद केलं नव्हतं.

मोत्यासारख्या सुरेख अक्षराला भुलून तिनें त्यांतील कांहीं ओळी वाचल्या आणि मग सर्वच ओळी वाचून पहाण्याचा मोह तिला आवरला नाहीं.

प्रिय बाबांना शिरसाष्टांग नमस्कार वि. वि.

तुमचें पत्र पावलें. तुम्ही पत्रोत्तर उलट टपालीं लिहिण्यास सुचविलें आहे म्हणून एवढ्या तातडीनें लिहीत आहें. मी जें लिहिणार आहे तें वाचून तुम्हांला वाईट वाटेल आणि चिंताही उत्पन्न होईल हें मला ठाऊक आहे. म्हणूनच मला अवघड वाटत आहे, पण माझ्या जीवनांतील अत्यंत महत्त्वाचा म्हणजे विवाहाचा प्रश्न असल्यामुळें मोकळेपणानें माझे विचार बोलून दाखविण्याशिवाय मला गत्यंतर नाहीं. मला वाटतें यामुळें आज जरी तुम्हांला वाईट वाटतें तरी परिणामीं तें हितावह ठरेल. म्हणूनच निःसंकोचपणें लिहिण्याचें धाष्टर्य करीत आहें.

आजच्या परिस्थितींत इतक्या लौकर विवाहबद्ध व्हावें असें मला वाटत नाहीं. देशांतील राजकीय वातावरण उत्तरोत्तर गरम होत आहे. लवकरच फार मोठी क्रांतिकारक चळवळ होण्याची शक्यता आहे. त्यामध्यें सर्व हिंदी लोकांनीं आपला वाटा उचलला पाहिजे. विशेषंकरून तरुण विद्यार्थ्यांनीं तर अहमहमिकेनें पुढें येऊन अंतिम त्यागाची देखील तयारी केली पाहिजे.

मायभूमीची हाक माझ्यासाठीं देखील आहे. ज्यांना परिस्थिति अनुकूल आहे आणि कौटुंबिक जबाबदाऱ्याही म्हणण्यासारख्या नाहींत, अशा माझ्यासारख्या सुखवस्तु विद्यार्थ्यांनीं अशा वेळीं मागें राहून कसें चालेल? म्हणून मीं या चळवळींत उडी घ्यायचें ठरविलें आहे. तेव्हां अशा आणीबाणीच्या प्रसंगीं, स्वतःचें भवितव्य अनिश्चित असतांना एकाद्या मुलीचें जीवन धोक्यांत घालणें मला इष्ट वाटत नाहीं. दुर्दैवानें कांहीं बरेंवाईट झालें तर तिनें आपल्या नांवें रडत बसावें यांत काय अर्थ आहे? तरी आपण सुमनच्या वडिलांना न विचारणें हेंच उचित होईल. जें होत आहे तें भल्यासाठींच आहे असें समजून मी वागत आहें.

माझ्या लिहिण्याचा राग मानूं नये. कळावें.

आपला नम्र

सुरेश

पत्र वाचण्यास माणिकला कांहीं सेकंद देखील लागले नसतील. लगेच तिनें टेबलाचा ड्रावर लोटला. पत्रांतील मजकूर वाचून तिच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव संमिश्र स्वरूपाचे होते. तिनें आपला खालचा ओठ वरच्या दातांनीं दाबला आणि पुनः एकवेळ स्वतःचा चेहरा आरशांत पाहिला तेव्हां त्यामध्यें हास्य व गांभीर्य यांचें मिश्रण झालेलें दिसलें.

सुरेश श्रीनिवासला पोंचवून परत आला तेव्हां माणिक पुनः पहिल्या खुर्चीवर येऊन बसली होती.

"पाहिलास का हा मुलगा? उघड बंडाच्या कल्पनेनें भारावून गेलेला आहे अगदीं. वेळप्रसंगीं फांसावर देखील चढण्याची तयारी आहे त्याची." खुर्चीवर बसतां बसतां सुरेश म्हणाला.

"खरं आहे तुमचं म्हणणं. त्यानें चहा घेतला पण त्याचं लक्ष नव्हतं. दृष्टी देखील कशी अस्थिर दिसली. जणुं एकाद्या कल्पनेचं वेड लागलं आहे."

"फारच उमदा गृहस्थ आहे" तो म्हणाला.

"हं ऽ ऽ ऽ" तिनें एक सुस्कारा टाकला आणि म्हणाली, "मला त्यांच्या-बद्दल किती आदर वाटतो. पण हा त्याग फुकट तर नाहीं ना जाणार असं भय वाटतं." नंतर एकदम घड्याळाकडे पहात ती म्हणाली, "अगबाई, पुष्कळ उशीर झाला की. मला आतां गेलं पाहिजे."

तीं दोघें उठलीं. तिला रस्त्यापर्यंत पोंचविण्यासाठीं तो गेला. जातांना आपल्याबरोबर ती हस्तांदोलन करील अशी त्याची अपेक्षा होती. पण ती पूर्ण झाली नाहीं. तिनें केवळ औपचारिक पद्धतीनें नमस्कार केला आणि त्याचा निरोप घेतला.

सुरेश खोलींत परत आला तेव्हां त्याचं मन प्रफुल्लित नव्हतं. चहाच्या कार्यक्रमाला मुहूर्त कांहीं चांगला लाभला नाहीं असं त्याला वाटलं. एक प्रकारची रितेपणाची जाणीव त्याला होत होती.

× × ×

देशांत उत्साहाचें भरतें आलेलें होतें. पण सुरेशच्या हृदयांतील झरे आटल्यासारखे त्याला वाटत होतं. नेहमीं उल्हसित मनोवृत्तीचा सुरेश एकाएकीं असा मरगळून का गेला हें त्याच्या मित्रांना समजत नव्हतं. त्याचं त्याला तरी तें समजत होतं कीं नाहीं हें सांगणें कठीण आहे.

चहाचा कार्यक्रम होऊन गेल्याला सातआठ दिवस होऊन गेले. पण माणिकची गांठ एकदाही पडली नव्हती. शेवटीं त्याच्यानें राहविलें नाहीं. तिची चौकशी करण्यासाठीं तो वसतिगृहावर गेला तेव्हां रखवालदार भय्यानें सांगितलें कीं माणिक कालच आपल्या वडिलांच्याकडे अकोल्यास निघून गेली.

माणिक घरीं निघून गेली आणि जातांना आपल्याला साधं कळविलंसुद्धां नाहीं याचं त्याला आश्चर्य वाटलें. त्याचं मन अधिकच खट्टू झालें.

कोणत्याही परिस्थितींत मनुष्य मनसमजावणी करण्याचा प्रयत्न करीत असतो. कदाचित् वडिलांकडून तांतडीचं बोलावणं आलं असेल, कोणी आजारी वगैरे असेल असा तर्क करून तो मनाला धीर देत होता.

अशा रीतीनें दिवसांमागून दिवस गेले. एक महिना झाला तरी तिनें त्याला कांहींच कळविलें नाहीं. उदासीनतेनं त्याच्या हृदयांत कायमचा तळ दिला.

एक दिवस अचानकपणें पोस्टमननें त्याला एक पत्र आणून दिलें. माणिकचं हस्ताक्षर त्यानं ओळखलें. आणि अधीरतेनें पाकीट फोडलें. एक लग्नाची निमंत्रणपत्रिका आणि दुसरें एक हस्तलिखित पत्र त्यांतून बाहेर पडलं. निमंत्रणपत्रिका पाहून सुरेशच्या अंगांतील रक्तच जणूं गोठून गेल्याप्रमाणें झालें. श्वासोच्छ्वास करायचें देखील तो विसरून गेला. त्यानं पत्र वाचावयास सुरवात केली.

प्रिय सुरेश,

माझं हें पत्र पाहून तुम्हाला आश्चर्य वाटेल. पण त्यांत आश्चर्य करण्यासारखें फारसें नाहीं. आपणा दोघांपुढें एकच प्रश्न होता. पण आपण तो निराळ्या पद्धतीनें सोडविलेला आहे. मी तुमच्याकडे चहाला आलें होतें. तेव्हां तुमच्या टेबलाच्या खणांतलं, तुम्हीं आपल्या वडिलांना लिहिलेलें पत्र सहज मीं पाहिलें. तुमच्या सुंदर अक्षरानें मला मोहिनी घातली आणि मी नकळत तीन चार वाक्यें वाचलीं. आपल्या विवाहासंबंधीं तुम्हीं कांहींतरी लिहिलें आहे असें दिसतांच तुमच्या अपरोक्ष मीं तें पत्र वाचलें त्याबद्दल माफ करा.

तुमचं पत्र वाचून मला आश्चर्य आणि भयही वाटलें. आश्चर्य अशासाठीं कीं तुमच्याप्रमाणंच माझ्या बाबांनीं देखील माझ्या लग्नाचा घाट घातला आहे, त्यांना काय उत्तर द्यावं अशा विचारांत मीं होतें. माझें ज्यांच्याशीं लग्न ठरलें आहे, त्यांची आणि माझी पूर्वींची मैत्री आहे, नव्हे आमचें प्रेम देखील होतं परस्परांवर. पण स्थिरता ही माझ्या जीवनांत फारच दुर्मिळ आहे. मला भय वाटलें तें तुमच्या राजकारणाचें. माझी अशी कल्पना होती कीं, इतर मुलांप्रमाणें तुमचें राजकारणही देखील एक फॅशनच आहे.

तुमचं म्हणणं मला पटतं. मृत्यूशीं खेळ खेळणाऱ्यांनीं कौटुंबिक बंधनापासून अलग रहावं हेंच योग्य. आपलें जीवन केवळ क्रांतीसाठींच आहे अशा श्रद्धेनें आणि ध्येयनिष्ठेनें तुम्ही वावरत आहां. माझ्यामुळें तुमचें पाऊल चुकून मागें ओढलें जायचें म्हणून मीच तुमच्या मार्गातून दूर व्हायचा निर्णय घेतला आणि बाबांच्या इच्छेला मान देऊन विवाहबद्ध होण्याचं ठरविलं. तुमच्या शुभेच्छा आम्हांला हव्या आहेत. तुमचें जीवन असेंच उदात्त आणि तेजस्वी होत जावो अशी मी सदिच्छा व्यक्त करतें.

आपली

**माणिक**

पत्र वाचून सुरेशनें तें टेबलावर भिरकावून दिलें.

" आतां खरोखरच केवळ क्रांतीसाठीं जगण्याची वेळ आली खरी " तो म्हणाला.

# भूमिगताच्या जीवनांत १२

विमलाबाईनीं जरा लवकर उठून चहाची तयारी चालविली होती. कारण आज सकाळचें कॉलेज होतं. सर्व तयारी झाल्यावर पतिपत्नींनीं एकत्र बसून हास्यविनोद करीत चहाफराळ केला आणि माधवराव कॉलेजांत गेले.

विमलाबाईची कळी आज विशेष खुललेली दिसत होती. माधवराव कॉलेजांतून परत आले म्हणजे दोघांनीं जाऊन तांब्यांच्याकडे जेवण घ्यायचं आणि शनिवार–रविवार दोन दिवस खूप मजा करायची असा कार्यक्रम काल रात्रींच निश्चित झाला असल्यामुळें त्यांचे सर्व व्यवहार आज अगदीं संथ-पणानें चाललेले होते. स्वयंपाकपाण्याला आज सुट्टी होती म्हणून पुष्कळसं पाणी तापवून त्यांनीं न्हाऊन घेतलं आणि आतां आराम खुर्चीवर बसून आपले लांबसडक केस वाळवीत पडल्यापडल्या 'स्त्री' मासिकाचा अंक त्या चाळीत होत्या. एवढ्यांत दारावर कोणीं तरी टिक टिक केलं.

"कोण आहे." त्यांनीं पडल्यापडल्याच विचारलं.

"पोस्टमन" बाहेरून जबाब आला.

त्या उठल्या आणि त्यांनीं दार उघडलं, पोस्टमन माधवरावांच्या नांवचीं दोन तीन पत्रें त्यांच्या हातांत देऊन चालता झाला.

'स्त्री' मासिकाचा अंक बाजूला ठेवून विमलाबाईंनीं पत्रें उघडण्यास सुरवात केली. माधवरावांना पत्रं तरी कोणाचीं येणार ? एखाद्या मासिकाच्या संपादकाचीं अगर त्यांच्या मित्रांचीं. पहिलीं दोन पत्रें फोडलीं त्यांत त्यांना विशेष रस वाटला नाहीं. एक त्यांच्या मद्रासी मित्राचें आणि दुसरें एका विद्यार्थ्याचें होतें. त्यांनीं तीं टेबलावर ठेवलीं आणि तिसरं पत्र फोडलं.

पत्र वाचायला सुरुवात करतांच त्यांचा चेहरा आश्चर्यचकित झाल्यासारखा दिसला. आणि थोड्याच वेळांत त्यांचें गौरवर्ण मुख संतापानें आरक्त झालें. पत्र वाचून पुन्हां तें लिफाफ्यांत बंद करीत असतांना त्यांचा हात थरथरत होता. पत्र टेबलावर भिरकावून त्या आरामखुर्चीवरून उठल्या आणि टेबलाजवळच्या खुर्चीवर बसल्या. त्यांची ही हालचाल सहेतुकपणें घडत होती. आपल्या डाव्या हाताच्या पंजावर आपली नाजूक हनुवटी ठेवून रस्त्यावरून जाणाऱ्या ट्रॅमकडे त्या बघत होत्या. ट्रॅमगाड्या, मोटारी, बसेस यांचा कर्णकर्कश गलबला ऐकूं येत होता. त्यांत यत्किंचितही लयबद्धता नव्हती. पण विमलाबाईंच्या मनांत जो हलकल्लोळ माजला होता, त्या मानानें बाहेरचा कोलाहल कांहींच नव्हता. त्या बाह्यतः जरी रस्त्यावरच्या रहदारीकडे पहात असल्यासारख्या दिसत होत्या तरी त्यांच्या मनःपटलावर त्याचें प्रतिबिंब उठत नव्हतें. त्यांची दृष्टि जणूं त्यापलीकडे कांहीं पहात होती. पहातां पहातां त्यांच्या डोळ्यांत दोन मोठाले अश्रू तरंगूं लागले. पदरानें डोळे पुसून त्यांनीं पुनः एकदा तें पत्र वाचावयास सुरवात केली.

प्रियतम माधव,

मागल्या आठवड्यांत तुझं एक लहानसं पत्र आलं. त्यानंतर अजून पत्र

नाहीं. मला ठाऊक आहे कीं, तुझ्यामागं कितीतरी कामें आहेत आणि मला पत्र लिहिण्यास लागणारा एकांत मिळणंही कठीण आहे. पण मनांत आणलं तर कांहींही करून तुला पत्र लिहितां येतील.

माझ्या राजा, मनांतल्या भावना तुला कशा सांगाव्या तें मला समजत नाहीं. त्या तुला खात्रीनं समजत असतील. माझं मन कशासाठीं आसुसलं आहे हें तुला का ठाऊक नाहीं ? पण तूं मुद्दामच माझ्याबाबत बेफिकीर वृत्ति धारण करीत असावास असं मला वाटतं. माझ्यावांचून तुझ्या जीवनामध्यें कांहीं उणीव पडणार नाहीं हें मी ओळखून आहें. पण तुझ्यावांचून माझं जिणं मात्र अगदीं रितं, भयाण आणि असह्य होणार याची तुला कल्पना आहे का ?

मला अलीकडे अगदीं उदास वाटूं लागलं आहे. ही काळरात कधींतरी संपेल का ? आतां प्राण कंठाशीं आले बघ. चारदोन महिन्यांनीं एकदां भेट व्हायची आणि त्यातही मनमोकळेपणा नाहीं. मनांत सारखी भीति ! दरवाज्यावर जरा जरी खट्ट झालं तरी छातींत धस्स व्हायचं. अशांनीं का मनाचें कधीं समाधान होऊं शकतं ? तरी पण जीव रहात नाहीं. तुला भेटावसं राहून राहून वाटतं, मग आतां कधीं भेटणार मला ? राजा, माझ्याशीं असा अबोला धरूं नकोस. पाठवशील ना छान छान पत्रं ?

तुझ्या प्रीतीची भुकेली
तुझी लाडकी
**मालती**

" अग टवळे, प्राण कंठाशीं आले का ?—जीव नकोसा झाला—मग दे कीं मुळामुठेंत जीव ! असा दुसऱ्याच्या सुखावर दरवाडा कां घालतेस ? " विमलाबाईच्या तोंडांतून अचानक उद्‌गार निघाले. थोडा वेळ थांबून त्या पुन्हां म्हणाल्या, " पण तुला तरी कां शिव्या द्याव्या ? आपलंच नाणं जर खोटं तर दुसऱ्याला दोष लावण्यांत काय अर्थ ? " हें वाक्य उच्चारीत

असतांना संतापानें त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. थोडा वेळ कसंतरी आवरलेलं दुःख आतां सर्व बांध फोडून वाहूं लागलं होतं. तशाच कितीतरी वेळ शून्य नजरेनें त्या रस्याकडे पहात राहिल्या. आणि मग चटकन् उठून त्यांनीं तें पत्र घेतलं आणि आपल्या सूटकेसमध्यें सर्व कपड्यचांया खालीं सुरक्षित ठेवून दिलं.

माधवराव कॉलेजमधून परत आले तेव्हां विमलाबाईचा अवतार पाहून ते चकित झाले. त्या कॉटवर पडून होत्या. चेहरा गोरामोरा आणि मलूल झालेला, केस अस्ताव्यस्त आणि कपाळाला हातरुमाल करकचून बांधलेला असं एकंदर दृश्य होतं. तें शेजारी कॉटवर बसून माधवरावांनीं त्यांच्या कपाळाला स्पर्श करून पाहिला. डोकें तापलेलें होतें.

" का ग ? एकाएकी काय झालं असं ? डोकं का दुखतं आहे तुझं ? " विमलाबाईचा हात हातांत घेत त्यांनीं हळुवारपणें विचारलें.

" हं. डोकं दुखतंय जरा. विशेष कांहीं नाहीं " दुसऱ्या कुशीला तोंड वळवून त्या म्हणाल्या.

" तापबीप येईल असं वाटतंय का? बराच वेळ न्हाणं झालेलं दिसतंय. त्यामुळें देखील अंग मोडून येईल. "

" ताप नाहीं नि बिप नाहीं, तुम्ही लागा आपले आपल्या उद्योगाला " त्या उद्विग्नपणें म्हणाल्या.

माधवरावांना पत्नीच्या आजाराचं निदान झालं नाहीं. त्यांना वाटलं खरोखरच प्रकृतींत बिघाड झाला असावा.

" बर मग तूं काय खाणार ? मला वाटतं कीं तूं दूध अगर कॉफी घे. ताप येणार असला तर न जेवणं बरें. तुला मी कॉफी करून देतों आणि मग येतों खाणावळींतून जेवून. "

" नको नको, मला इतक्यांत नको कॉफी बिफी. तुम्ही जेऊन या आधीं मग पाहतां येईल. " त्या किंचित् तुटकपणें म्हणाल्या.

माधवरावांना दुसरा इलाजच नव्हता. बाजारांतून कांहीं फळें वगैरे आणूं का असें विचारून ते जेवण्यास निघून गेले.

× × ×

पांच सहा दिवस असेच निघून गेले, विमलाबाईंचें चित्त कांहीं ठिकाणावर नव्हतं, माधवराव अत्यंत जिव्हाळ्यानें त्यांच्याशीं वागत पण दुसऱ्या बाजूनें मिळावी तितकी साथ मिळत नव्हती. त्या धड अन्नही घेईनाशा झाल्या. त्यांचं काय बिनसलं आहे तें कांहीं केल्या लक्षांत येईना. संध्याकाळीं माधवरावांनीं विचारावं "फिरायला जाऊं, येतेस का? जरा मोकळी हवा मिळाली तर तेवढंच बरं वाटेल." आणि विमलाबाईंनीं कांहींतरी कारण सांगून टाळाटाळ करावी, असा प्रकार चालूं होता. पत्नीची प्रकृति अधिकाधिक ढांसळूं लागलेली पाहून एक दिवस ते म्हणाले, "चार सहा दिवस पुण्याला अप्पांच्याकडे जातेस का? हवा पालट झाली तर चटकन बरं वाटेल."

नवऱ्याची ही सूचना ऐकून विमलाबाईंनीं भेदक नजरेनें त्यांच्याकडे पाहिलें आणि त्या चटकन म्हणाल्या,

"मी देखील त्याचाच विचार करीत होतें. माईची आठवण होते आहे राहून राहून."

पत्नीच्या उत्तरांतील तुटकपणा त्यांच्या लक्षांत आला नाहीं. उलट आपली एक सूचना तरी तिनें मान्य केली म्हणून त्यांना समाधानच वाटलें. रविवारच्या सकाळच्या एक्स्प्रेसनें पुण्याला जाण्याचें ठरलें.

तिला खुलविण्याचा सर्व प्रयत्न माधवराव आपल्याकडून करीत होते. पण व्यर्थ. जाण्याच्या दिवशीं सकाळीं उठून स्टोव्ह पेटविला आणि नको नको म्हणत होती तरी तिच्या आवडीचा तिखटमिठाचा सांजा तयार केला. स्टेशनवर निरोप देतांना ते म्हणाले, "गेल्याबरोबर सुखरूप पोंचल्याचें पत्र पाठव बरं का? आणि दर दिवसाआड प्रकृतीबद्दल एक कार्ड आलं पाहिजे. तुला बरं वाटलं कीं मीच पुण्याला येईन आणि मग आपण मुंबईला येऊं

एकदमच. नाहींतर रमून जाशील माईअप्पांच्या सहवासांत आणि इकडे मी बसेन तसाच कोकलत. ''

विमलाबाईंनीं किंचित् हंसल्यासारखें करून होकारार्थी मान हलविली. पण लागलीच त्यांनीं दुसरीकडे तोंड वळविलें. इतक्यांत गाडीची शिटी झाली. तोंड वळवून त्यांनीं प्लॅटफॉर्मवर दृष्टि वळविली. माधवरावांची आणि त्यांची नजरानजर झाली. त्यांनीं बायकोचा हात प्रेमभरानें दाबला आणि गाडी सुरू झाली.

गाडी झपाट्यानें वेग घेऊं लागली. विमलाबाईंच्या विचारांचीं चक्रेंहि वेगानें धांवत होतीं. पण त्यांच्या विचाराची गाडी पुनः पुनः त्याच त्या स्टेशनवर येऊन उभी राहिल्यासारखें होई.

माधवरावांचं आणि त्यांचं लग्न होऊन आतां चांगलीं दोन वर्षं झालीं होतीं. त्यांचा प्रेमविवाह झाला नसला तरी विवाहोत्तर प्रेम इतकं गाढ आणि उत्कट होतं कीं, आजूबाजूच्या प्रणयी जोडप्यांना त्यांचा हेवा वाटावा. पण आज एकाएकीं प्रेमाचा तो फुलबाग उध्वस्त झाल्यासारखा दिसत होता. बसल्याबसल्या त्यांच्या मनांत विचार येऊं लागले.

"पुरुषांचं मन इतकं का आंतल्या गांठीचं आणि कपटी असतं कीं दोन वर्षांच्या सहजीवनामध्यें मला त्याची यत्किंचित कल्पना येऊं नये? पण मी म्हणतें कीं हा दुटप्पीपणा तरी कशाला करावा माणसानं? वरकरणी तर असं दाखवायचं कीं, जणूं माझ्याशिवाय क्षणभर चैन पडत नाहीं. काय बाई तरी मानभावीपणा? पुण्याला जायची सूचनाही किती स्वाभाविकपणानें केली. जसं कांहीं माझ्या प्रकृतीची सारखी चिंता लागली आहे. तें पत्र मला पहायला मिळालं म्हणून तरी मला कळलं त्यांतलं रहस्य. नाहींतर कसं येणार लक्षांत कोणच्याही? नाटक तर अगदीं बेमालूम वठवितात. त्या बयेला भेटीला बोलवायची असेल! होऊं देत आतां भेटी आणि सर्व कांहीं यथास्थित..."

त्यांनीं आपला खालचा ओंठ दातांखालीं जोरानें दाबला. भावनोद्रेक

दडपून टाकण्याचा तो अयशस्वी प्रयत्न होता. कारण दुसऱ्याच क्षणाला त्यांचे डोळे भरून आले. खिडकीबाहेर तोंड काढून त्यांनीं तें कसें तरी लपविलें.

अशाच प्रकारच्या विचारांनीं त्यांच्या मनांत काहूर उठविलें होतें. तीन साडेतीन तास केव्हां गेले तें समजलें नाहीं. पुणें स्टेशनवर त्यांचा धाकटा भाऊ प्रभाकर आला होता.

पत्नीला पुण्यास रवाना करून माधवराव परत आपल्या बिऱ्हाडीं आले तेव्हां त्यांना उदास वाटत होतें. तिला माहेरीं पाठवून एकटें राहण्याचा हा कांहीं पहिलाच प्रसंग नव्हता. पण आज त्यांच्या हृदयांत एक निराळीच कालवाकालव माजली होती. कारण यावेळीं विमल कांहीं खुशीनें माहेरीं गेली नाहीं याची त्यांना अंधुकशी जाणीव होती. तिच्या मनांतलें दुःख ती आपल्याला सांगायला तयार नाहीं ही गोष्ट त्यांच्या मनाला विशेषच बोंचत होती. अत्यंत हुशार म्हणून समजले जाणारे मानसशास्त्राचे प्रोफेसर असूनही ही गांठ उकलण्यास ते असमर्थ ठरले होते.

पुण्याला जाऊन सातआठ दिवस झाले पण तेवढ्या अवधींत विमलचें सुखरूप पोंचल्याबद्दलचें कार्ड आलें तेवढेंच. पूर्वीं असें कधींच घडत नसे. माहेरीं गेली म्हणजे कित्येक वेळीं दिवसाकांठीं दोन दोन पत्रें देखील यायचीं आणि प्रत्येकाला उत्तरादाखल माधवरावांनीं प्रेमपत्र लिहिलें नाहीं म्हणजे ती फुरंगटून बसायची. पण या खेपेस मात्र रामा शिवा गोविंदा !

दररोज कॉलेजांतून परत आल्यावर आज खात्रीनंच पत्र आलं असेल अशा आशेनं दार उघडावं आणि रोज निराशा व्हावी, असा क्रम पांच सात दिवस चालला होता. पण असें किती दिवस चालणार? एक दिवस दार उघडतांच एक पाकीट दारापाशीं पडल्याचें त्यांना दिसलें. पत्र्याचें हस्ताक्षर पाहतांच ते खूप झाले. हॅट टेबलावर फेंकून कपडे काढण्यापूर्वीच अधीरपणें त्यांनीं पत्र फोडलें. लिफाफ्यांतून दोन घड्या बाहेर पडल्या.

एक घडी प्रथम उघडून तें पत्र वाचावयास त्यांनीं सुरवात केली. पत्राचा आरंभ " प्रियतम माधव "...असा होता पण हस्ताक्षर विमलचं नव्हतं. पत्राच्या खालची सही त्यांनीं पाहिली आणि त्यांना विस्मय वाटला.

दुसरी घडी उघडून पाहिली तेव्हां विमलचें हस्ताक्षर पाहून त्यांना जरा बरें वाटलें. पण पत्रांतील पाहिल्या दोनचार ओळी वाचतांच 'ऑं' असा उद्‌गार त्यांच्या तोंडांतून बाहेर पडला. आश्चर्यानें त्यांचें तोंड तसेंच उघडें राहिलें. पत्र शेवटपर्यंत वाचण्याआधींच त्यांचा चेहरा चिंतेनें व्याकूळ झाला. शेवटचा मजकूर वाचतांच त्यांचें मन चरकलें.

पत्रांतला मजकूर असा होता.

प्रिय माधव,

मीं प्रिय म्हणून लिहिलें खरें. पण तसें लिहिण्याचा मला अधिकार नाहीं याची मला पूर्ण जाणीव आहे. गेल्या आठपंधरा दिवसांत माझ्यामध्यें इतका फरक कां पडला याचें तुला कोडें पडलें असेल, पण सोबतचें पत्र पहा म्हणजे सर्व उलगडा होईल. कदाचित् तुला कारण ठाऊक असूनही तूं अज्ञान पांघरीत असण्याचा संभव आहे. कारण प्रेमाचें नाटक करण्यांत तुझा हात कोणी धरूं शकणार नाहीं. पण माझी इतकी प्रतारणा करण्याची जरूर काय होती? मला जर स्पष्टपणानं तूं सारं सांगितलं असतंस तर मीं होऊनच तुमचा मार्ग मोकळा करून दिला असता. माझ्याशीं लग्न करण्याआधीं तूं या गोष्टींचा विचार करायला हवा होतास असं मला वाटतं. दुसऱ्याच्या जीवनावर जाणून-बुजून निखारा ठेवण्यांत काय मिळवलंत तुम्हीं? असो. जें व्हायचं तें झालं. मला मात्र या जीवनामधें आतां राम राहिलेला नाहीं. हवींहवींशीं वाटतात तीं माणसं पटापट जातात आणि जिवाला जे कंटाळले त्यांच्याकडे मृत्यू देखील ढुंकून पहात नाहीं...इकडे आल्यावर मीं पुष्कळ विचार केला. रात्रीं तीन तीन चार चार वाजेपर्यंत मला झोंप देखील येत नाहीं. पण काल रात्रीं एकदाचा निश्चय करून टाकला. तुमच्या सुखांत माझा नसता अडथळा झालेला

आहे. तुझ्या मनांत कांहीं असो माझं सर्वस्व मी तुला अर्पण केलेलं आहे. तुझ्यासाठीं आत्मसमर्पण करण्यांतही मला एक प्रकारचें समाधान मिळेल, म्हणूनच मीं हा निर्णय केला. माझ्या हातून आधिक उणा शब्द गेला असला तर क्षमा कर.

सदैव तुझीच
**विमल**

दोन्हीं पत्रें लिफाफ्यांत बंद करून माधवराव गर्दीगर्दीनें बाहेर पडले. त्यांचा चेहरा काळवंडून गेला होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं डेक्कन जिमखान्यावर रावबहादुर केळकरांच्या घरासमोर एक टांगा उभा राहिला. थंडी मी म्हणत होती. अजून चांगलं उजाडलें देखील नव्हतं. सर्वत्र सामसूम होती. त्या कडाक्याच्या थंडींत इतक्या लौकर पांघरुणाबाहेर कोण पडणार होतं ? बरेचसे डबे सायकलवर अडकवून दूध घालायला जाणारा एक मुलगा मात्र रस्त्यावरून कुडकुडत गेला. आपल्या फेट्याचा शेंडा तोंडाभोंवतीं गुंडाळून टांगेवाला खालीं उतरला आणि बॅग उचलून म्हणाला, " घ्या रावसाहेब. "

माधवरावांनीं दिलेला रुपया कपाळाला लावून टांगेवाला पुन्हां टांग्यांत बसला आणि एक विडी शिलगावून 'क, क क' करीत त्यानें टांगा वळविला.

माधवराव जड पावलांनीं बंगल्याच्या फाटकांत शिरले. आतां कोणत्या प्रसंगाला तोंड द्यावें लागणार आहे याबाबत त्यांचे विचार चालू होते. मन चिंती तें वैरी न चिंती. दरवाजावरचे विजेच्या घंटेचें बटन त्यांनीं दोन वेळां दाबलें. प्रभाकरनें येऊन दार उघडलें.

" इतक्या अचानक ? " माधवरावांना पाहून त्यानें आश्चर्यानें विचारलें.

" मग सांगतों तुला सारं कांहीं. विमलची प्रकृति कशी काय आहे ? " त्यांनीं उत्कंठेनें विचारलें.

" आहे तशीच आहे. जास्त बिघाड मात्र झालेला नाहीं. " त्यांना हायसें वाटलें आणि प्रभाकराबरोबर ते पायऱ्या चढूं लागले.

थोड्याच वेळांत सकाळच्या चहाची तयारी झाली. रावबहादुर, त्यांच्या पत्नी, प्रभाकर, विमलाबाई आणि माधवराव सर्वांनीं एकत्र बसून चहा घेतला.

चहा झाल्यावर माधवरावांनीं प्रभाकरला एका बाजूला घेऊन त्याला कांहींतरी समजावून सांगितले आणि " लौकर घेऊन ये बरं का ? मी वर ताईच्या खोलींत आहे. " असें म्हणून ते विमलच्या खोलिकडे चालते झाले.

विमलाबाई ड्रेसिंग टेबलाजवळ उभ्या राहून केस विंचरत होत्या. " हं कशी काय तब्बेत ? मीं म्हटलं भेट तरी होतेय कीं नाहीं कुणास ठाऊक. " खोलींत प्रवेश करीत माधवराव म्हणाले.

" माझ्या प्रकृतीचें काय एवढं महत्त्व ? सुधारली काय आणि बिघडली काय दोन्हीं सारखीच " त्यांनीं ठसक्यांत उत्तर दिलें.

" अहो तुम्हांला नसेल महत्त्व पण आम्हाला आहे ना ! "

" ठाऊक आहे किती महत्त्व आहे तें. मला नाहीं असल तोंडदेखलं बोलतां येत. "

" यांत तोंडदेखलेपणा कुठें आहे बुवा ? बाकी तूं इतका आततायीपणा करशील अशी माझी कल्पना नव्हती. नवीन विचारांचा पुरस्कार करणाऱ्यांनीं इतकं ' टचीं ' असता उपयोगीं नाहीं. "

" तुम्हीं नाहीं नाहीं ते ढंग करावे आणि टची असूं नये असं म्हणता ! कांहींच कसं वाटत नाहीं हो तुम्हांला ! " विमलाबाई चवताळून म्हणाल्या.

माधवराव कांहींतरी उत्तर देणार त्या आधींच दरवाजावर कोणीतरी 'टिक टिक' केलं. त्यांनीं चटकन पुढें होऊन दार उघडलं. प्रभाकर आणि दुसरी एक तरुण स्त्री दरवाजांत उभी होती.

" या. आपणच का कॉमरेड सहस्रबुद्धे यांच्या पत्नी ? " पाहुण्यांचें स्वागत करीत ते म्हणाले.

एवढ्या वेळांत विमलाबाईंनीं आपला तोल संभाळला होता. दरवाज्यांत उभ्या असलेल्या तरुण स्त्रीला पाहून त्यांना आश्चर्य वाटलं.

" कोण, रोहिणी ? " त्यांनीं विचारलं.

" म्हणजे, तुझी आणि यांची ओळख आहे वाटतं ? " रोहिणीबाईंना खुर्चीवर बसण्याचा इषारा करीत माधवरावांनीं विचारलें.

" ओळख म्हणजे आम्ही दोघी एकाच वर्गांत होतों फर्ग्युसन कॉलेजांत" असें म्हणून विमलाबाईंनीं रोहिणीच्या हाताला हात धरून तिला कॉटवर आपल्या शेजारी बसवलं.

" फारच छान योगायोग म्हणायचा. माझं कामही सोपं झालं पुष्कळ " ते हंसत हंसत म्हणाले. त्यांचं वाक्य ऐकून त्या दोघी मात्र बुचकळ्यांत पडल्या.

त्यांचा तो गोंधळ पाहून माधवराव म्हणाले, " मी फार वेळ तुम्हांला गोंधळांत ठेवत नाहीं. रोहिणीबाई हें पत्र घ्या आणि तें कोणीं कोणाला लिहिलं आहे तें आपल्या मैत्रिणीला समजावून सांगा. "

" म्हणजे अजून हें पत्र तुमच्याजवळच आहे कां ? त्यांना कां नाहीं दिलं तें ? " रोहिणीबाईंनीं अधीरपणें विचारले.

" अहो पण माझ्या हातीं येईल तर देणार ना मी ? तुमच्या यजमानांना त्यांच्यासारखं पत्रही गेलं अंडरग्राऊंड. कालपर्यंत तुमच्या मैत्रिणीच्या बॅगमध्यें लपून बसलं होतं. " तिरप्या नजरेनें विमलाबाईकडे पहात हंसत हंसत म्हणाले.

रोहिणीचा तो प्रश्न आणि माधवरावांचें तें हंसणें यामुळें त्या चांगल्याच विरघळून गेल्या होत्या. तरीपण पोटांतला आनंद कांहीं त्यांना लपविता येत नव्हता.

" काय बाई तरी करावं ! सगळाच घोटाळा झाला म्हणायचा. " ओशाळल्यागत चेहरा करून रोहिणी म्हणाली.

" अहो नुसता घोटाळाच नाहीं झाला. एक आत्महत्त्या देखील होणार होती. तुमचं आणि माझं नशीब म्हणून आज तुमची मैत्रिण तुम्हांला भेटली. "

" उगीच कांहींतरी नका सांगू तिला. कुणीं सांगितलं तुम्हाला मी

आत्महत्त्या करणार होतें म्हणून ? " त्या मान वेळावीत म्हणाल्या.

" दाखवूं कां कालचं पत्र तुझं ? बाकी दाखवायला कांहींच हरकत नाहीं. तूंही वाचलसंच त्यांचं खाजगी पत्र. "

" पण मी म्हणतें तुमचीच चूक आहे यांत. मला जर तुम्ही अगोदर सांगून ठेवलं असतंत तर कशाला झाला असता हा गोंधळ ?" माधवरावांच्या मुद्याला बगल देत त्या म्हणाल्या.

" हो तर. तुला या गोष्टी सांगायच्या म्हणजे लौकरच बिनभाड्याच्या खोलींत जायची तयारी केली पाहिजे. तीळ तरी भिजतो का तुमच्या तोंडांत ? बरं तें जाऊं दे आतां. या निमित्तानं मैत्रिणीची भेट झाली अनायासें तर चहा तरी देणार आहेस कीं नाहीं त्यांना ? " माधवरावांनीं सुचविलें.

" खरंच विमल, कितीतरी दिवसांनीं भेटलों नाहीं का आपण ? मी चहाला थांबतें, पण एका अटीवर. तूं रविवारीं जेवायला आलें पाहिजेस माझ्या घरीं. "

" रविवारीं कसं जमेल बाई ? यांना तर आजच्याच गाडीनं गेलं पाहिजे." विमलाबाई म्हणाल्या.

" माझ्याबरोबर लगेच मुंबईला यायचा विचार आहे कीं काय ? छे, छे, तूं कांहीं दिवस इथेंच रहा. प्रकृति चांगली सुधारूं दे आधी. "

" आणि तिकडे आलीस अन् दुसऱ्या एकाद्या देशभक्ताचं असंच एकादं अंडरग्राऊंड पत्र आलं म्हणजे पुन्हां पंचाईत व्हायची. "

" पुष्कळ झाली आतां चेष्टा. जरा संधि मिळाली कीं माणसाला नकों जीव करायचा अगदीं. "

" बरं राह्यलं आमचं. चहा तर आण करून आधीं. माझी प्रकृति मात्र खरोखरच ढासळली या प्रकरणानं. "

" विमल आली मुंबईला म्हणजे सुधारेल हां हां म्हणतां " सर्वांना हंसवीत रोहिणी म्हणाली.

## हाडक्या

## १२

त्या गोष्टीला आतां दहा वर्षें होऊन गेलीं. पण आज देखील ती आठवण नुकत्याच घडलेल्या प्रसंगाइतकी ताजी आहे. आयुष्यांतल्या कांहीं घटना आणि अनुभव असे असतात कीं, त्यांचा ठसा स्मृतिपटलावर कायमचा उठून रहातो. आपल्या जीवनप्रवाहाला एकाएकीं जेव्हां अनपेक्षित वळण लागतें, त्या वेळच्या स्मृती अशाच चिरस्थायी असतात; आणि अशा गोष्टी जर किशोरावस्थेंत घडल्या, तर व्यक्तीच्या भावजीवनावरही त्याची कायमची छाप पडल्यावांचून रहात नाहीं.

असाच होता तोही एक प्रसंग. सर्व साधारण मनुष्याच्या जीवनामध्यें शिक्षा आणि तुरुंगवास ही कांहीं मामुली गोष्ट नव्हे. शिवाय मी एक कॉलेज-कुमार होतों त्यावेळीं. तरुण मुलामुलींच्या सहवासांतील तें सुखसंवेदक वाता-

वरण आणि समाजातून उठलेल्या, आणि कांहीं अंशीं उठवलेल्या, त्या गुन्हेगारांच्या सहवासांतील तें बंदी जीवन—यांमध्यें दोन ध्रुवांइतकें अंतर असेल. पण ज्या शक्तीनें त्या मोहक वातावरणांतून खेंचून मला तुरुंगाच्या दारांत नेलें तिचा प्रभाव सामान्य नव्हता. त्यामुळें हृदयांतील भावनांना देखील भरती आली. तें भावनोत्कट जीवन अपूर्व होतें! जो जो माझ्या सांनिध्यांत आला त्यानें आपल्याजवळ उत्कृष्ट होतें, तेंच मला दिलें. हाडक्याची आणि माझी मैत्री झाली ती अशीच.

इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर आतां तुरुंग म्हणजे मामुली गोष्ट वाटते मला. न्यायाधिशानें शिक्षा सांगितली, तरी विशेष कांहीं वाटत नाहीं. भीति तर मुळींच नाहीं. पण दहा वर्षांखालीं तुरुंगाची मला कांहींच कल्पना नव्हती. मला वाटलें होतें कीं, मिठाचा कायदा मोडल्याबद्दल आपल्याला तीन महिन्यांची शिक्षा होईल. पण मॅजिस्ट्रेटनें पीनल कोडाचें ११७ वें कलम लागू करून सहा महिन्यांची सजा ठोकल्यामुळें मी चांगलाच हाबकलों होतों. त्या रात्रीं लॉक-अपमध्यें किती वेळपर्यंत झोंप आली नाहीं. रात्रीं बारावर दोन वाजले, तरी झोपेचें लक्षण दिसेना. सहा महिन्यांचे दिवस किती होतात तें पाहिलें. अरे बापरे! एकूण १८० दिवस रहावें लागणार तुरुंगांत! इतके दिवस कसे जाणार, याची चिंता वाटूं लागली. मीं भीत भीतच पाय ठेवला तुरुंगाच्या दारांत.

मुख्याधिकाऱ्यापुढें मला उभें करण्यांत आलें. तो एक गोरा साहेब होता. त्यानें वरपासून खालपर्यंत एकदा निरखून पाहिलें माझ्याकडे. आणि माझें नांव विचारून माझी जेलकडे रवानगी केली. जेलरनें हाताखालच्या शिपायाला माझ्या चीजवस्तूंची नोंद करून घेण्यास सांगितलें. आणि माझ्यासाठीं कैदी कपडे घेऊन येण्यास दुसऱ्या एका कैदी वॉर्डरला हुकूम केला.

जेलसंबंधीं मला एका गोष्टीची फार भीति वाटत होती. आंत जातांना सर्वांसमक्ष कैद्याला विवस्त्र करून त्याची झडती घेण्यांत येते, असें मीं ऐकलें

होतें. चार चौघांदेखत मनुष्याला नग्न व्हायला सांगायचें म्हणजे काय ? माझ्यासारख्या कॉलेजांतल्या शहरी संस्कृतीची संवय असलेल्या तरुणाला ती कल्पनाच कशीही वाटली. पण माझ्या सुदैवानें माझी विशेष झडती घेण्यांत आली नाहीं आणि तो प्रसंग टळला. सगळा सोहळा संपल्यावर डेप्युटी-जेलरबरोबर मला आंत पाठवण्यांत आलें. बरोबर पिवळी पगडीवाला एक कैदी वॉर्डर होता.

' "हा जेल आहे बरं कां ? येथली शिस्त फार कडक असते. ही कॉलेज रेसिडेन्सी नाहीं. शिस्त पाळलीस तर ठीक, नाहीं तर धडगत नाहीं. हाल कुत्रा खाणार नाहीं ! व्यवस्थित राहिलास तर दर महिन्याला चार दिवस सूट मिळेल. नाहीं तर एकामागून एक शिक्षा. हातकडीपासून तो फटक्यां-पर्यंत." माझ्या वॉर्डात नेतांना डेप्युटी जेलरनें मला समज दिली. जेलरची मूर्ति अशी होती कीं जणूं एकादें भावनारहित यंत्रच. खरबुज्या चेहऱ्याची, गालाचीं हाडें वर आलेलीं, नाकाच्या दोन्ही बाजूला गालांवर दोन दोन सुरकत्या; डोळे खोल गेलेले; शरीराचा बांधा उंच आणि सडसडीत. त्यांच्याकडे एकदां पाहिल्यावर कोणालाही त्यांच्यांतील रुक्षपणाची सहज साक्ष पटावी, अशी होती ती मूर्ति. अनेक वर्षें जेलखान्यांत काम करून मानवी सहानुभूतीचा सर्व ओलावा सुकून गेला होता जणूं.

या पहिल्याच सलामीनें मी चांगलाच सर्द झालों. मला ज्या वॉर्डात घेऊन जात होते, त्याचें नांव 'काळा पाणी वॉर्ड' असें होतें. तेथें का सर्व काळ्या पाण्याची शिक्षा झालेले कैदी असणार ? मला इतर राजबंद्यांबरोबर ठेवणार नाहींत वाटतें ? मी मनांतल्या मनांत चिंता करीत होतों. इतक्यांत आम्ही 'काळापाणी वॉर्डा'च्या दरवाजापाशीं आलों. क्षणार्धांत दरवाजा उघडला आणि मीं आंत प्रवेश केला. आंत शिरतांच एकदम ओळखीचे आवाज कानीं पडले.

"ओहो × × × × आला वाटतें." ती मंडळी म्हणाली. ते चांगले

वीस पंचवीस जण असतील. माझा जीव भांड्यांत पडला. माझ्या परिचयाचीच होती ती मंडळी. आतांपर्यंत मनावर असलेलें दडपण एकदम नाहींसें झालें. त्यांनीं मला अनेक प्रश्न विचारायाला सुरवात केली. मी पण उत्तरें देत होतों.

" आतां माझ्याबरोबर मला पोंचवायला आला, त्याचं नांव काय हो ? कोण आहेत ते गृहस्थ ? " मीं उत्सुकतेनें प्रश्न केला.

" तो व्हय ? तेला दुर्मुखराय म्हणतात. " त्या घोळक्याच्या एका कोपऱ्यांतून आवाज आला. सर्व मंडळी खो खो करून हंसली.

उत्तर देणारी व्यक्ति माझ्या परिचयाची नव्हती. तो राजबंदी देखील नसावा, हें मी त्याच्या एकंदर देखाव्यावरून ताडलें. मध्यम बांधा, शिशवीच्या भावलीसारखा काळा कुळकुळीत वर्ण, त्यांतून लुकलुकणारे काळेभोर डोळे आणि डोक्यावर अर्धी काळी आणि अर्धी पिवळी कैदी टोपी. असा मोठा विनोदी अवतार होता ! ती मूर्ति पाहून माझ्या मनांत त्याच्याबद्दल जिज्ञासा उत्पन्न झाली. त्यानें जेलरला दिलेलें नामाभिधान ऐकून मला मोठी गंमत वाटली. जेलरचें नांव म्हणजे एक विनोदाचा विषयच होता कैद्यांच्यामध्यें. त्याचें खरें नांव हशमतराय असल्याचें सांगत. कोणी म्हणत, त्याला हुकूम आहे कीं " हंसो मत " म्हणून त्याचा चेहरा नेहमीं एरंडेल प्याल्यासारखा असतो ! एकानें सांगितलें कीं, हें बाळ जन्माला आल्यावर आईनें जेव्हां ही दुर्मुखलेली सूरत बघितली, तेव्हां तिनें पोक्त विचार केला कीं, सूरत असेना कां असली ? आपण नांव तरी चांगलें ठेवूं ! म्हणून हंसमतराय—म्हणजे ज्याच्या मुखावर हास्य आहे—असें नांव ठेवलें तिनें. अर्थात् हा सगळा विनोदच होता. मला वाटतें, त्याचें खरें नांव असमतराय म्हणजे शीलवान् असें असावें.

त्याच्या रूपाची चर्चा होऊं लागली म्हणजे असेच तारे तुटायचे. कोणी म्हणत, तो उंटासारखा दिसतो; तर दुसरे म्हणत, " अरे, यार, चेहरा

तो ठीक उलू ( घुबड ) की तरह है. ” एकाची प्रतिभा तर इतकी धावली कीं, कांहीं विचारूं नका. तो म्हणाला कीं, “ गाढवाच्या तोंडावर चष्मा लावला तर गाढव जितकें खुबसूरत दिसेल तितका हा खुबसूरत आहे ! ” जेल–अधिकाऱ्यांच्यासंबंधीं सामान्य कैद्यांचा विनोद हा अशाच स्वरूपाचा असतो. कोणाला लंबू, कोणाला काजिया, तर कोणाला अफीमची अशीं नांवें असायचीं ! हाडक्याकडून हळूहळू पुष्कळ गोष्टी मला समजल्या.

तुरुंगांतील जीवनाचे हे विविध पैलू पाहिल्यावर माझी भीति कोठल्या कोठल्या कोठें पळून गेली. तुरुंगांतही माणसेंच राहातात; तेंही एक जगच आहे; राजबंद्यांखेरीज अन्य कैदी जरी गुन्हेगार असले, त्यांची मनोवृत्ति जरी विकृत झाली असली, तरी त्यांच्यांतील माणुसकी अजीबात गेलेली नसते; या गोष्टीची मला जाणीव झाली. पहिले सात आठ दिवस मला अवघड गेले. पंधरावीस दिवस मी दिवसही मोजीत असे. पण हळू हळू दिवसांचें काय, पण महिन्यांचेंही भान राहिलें नाहीं. दिवस न कळत चटचट जाऊं लागले. तुरुंगाची दीक्षा मला देऊन तो सुसह्य करण्याचें काम जर प्रथम कोणीं केलें असेल, तर हाडक्यानेंच.

तुरुंगांत दाखल झाल्यावर दुसऱ्या दिवसापासून मला नवार विणण्याचें काम देण्यांत आलें. अर्थात् मला तें शिकायचें होतें. एकदां एक मनुष्य येऊन सांगून गेला. पण तेवढ्यानें मला थोडेंच येणार तें ? मी आपला ताण्याशीं झगडत होतों. एकाएकीं कालची ती काळी मूर्ति आली. “मास्तर, असा नाय व्हो जमनार.” म्हणून माझ्या हातांतली ठोकणी घेऊन त्यानें चटकन फूट दोन फूट नवार विणून टाकलें.

“ आजची झाली वर्दी. आतां आपला हळूहळूं शिकत बस. ” तो म्हणाला. आदरार्थी बहुवचन ही चीज त्याच्या व्याकरणांत नव्हतीच ! जणुं नैसर्गिक ऋजुताच !

मी हळूहळू नवार विणण्याचा प्रयत्न करूं लागलों. तो जवळच उभा

राहून माझा हात कसा काय चालतो, तें पहात होता. आणि मधून मधून सूचना देत होता.

" तुला किती रे सजा ? " मीं त्याला विचारलें.

" मला मोप हाय आट वर्सांची. "

" इतकी रे कशी झाली शिक्षा ! " मी कुतूहलानें विचारलें.

" खरी म्हणशील, तर तीनच वर्सांची. वरचीं पांच वर्सं उगीचच जजान् दाकल्याची मारलीन्. " त्यानें फोड करून सांगितलें.

दाखला म्हणजे काय, हें प्रथम मला माहीत नव्हतें. मनुष्य पुनः पुनः गुन्हा करूं लागला म्हणजे त्याला जास्ती शिक्षा देण्यांत येते. जितक्या वेळ जेलमध्यें येईल तितके दाखले समजले जातात. तो कातवडी जातीचा होता. त्यानें अनेक वेळ चोऱ्या-दरवडे तर घातलेच होते, पण परस्त्रीवर बलात्कार केल्याबद्दलही त्याला एकदां शिक्षा झाली होती.

" हाडक्या, तुझी टोपी काळी आणि पिवळी कां रे? " मीं विचारलें.

" पांच वर्सांपेक्षां जास्त सजा म्हणून पिवली अन् दाकलेवाला म्हणून काली. अशी आपली हाय हो कालीपिली ! " त्यानें हंसत हंसत समजावून दिलें आणि डोक्याची टोपी काढून ती उलटी करून आंतला मालमसाला त्यानें मला दाखविला. दोन तीन विड्या, त्या पेटवण्यासाठीं चकमक आणि सोकटा-इतकी सामुग्री होती त्याच्याजवळ.

मग दुसऱ्या कैद्यांच्यापासून मीं त्यांच्याबद्दल अधिक माहिती काढली. तो आमच्या वॉर्डांत कुंडेवाल्याचें म्हणजे भंग्याचें काम करी. तसें पाहिलें तर कातवडी कांहीं भंगी काम करणारे लोक नाहींत. पण जेल-मॅन्युअल म्हणजे अशी कांहीं चीज आहे कीं, विचारूं नका. मला वाटतें, राणीच्या जमान्यांत जे नियम केले, ते केले; बदलत्या परिस्थित्यनुसार त्यांत सुधारणा करण्याची आवश्यकता वाटत नाहीं अधिकाऱ्यांना. जतीन्द्रनाथ दासांसारख्यां-नीं प्रायोपवेशन करून आत्मबलिदान करावें, तेव्हां कुठें थोडी हालचाल

व्हायची. या नियम-पुस्तकामध्यें कांहीं जातींना कुंडा काम द्यावें, असें सांगितलें आहे; व तो नियम चालू आहे अजूनदेखील. खरोखर या जातीचे लोक भंगी काम करतात कीं नाहीं, याची चौकशी कोण करतो ? कातवडी बाहेर भंगीकाम करीत नाहींत. तुरुंगांत आले म्हणजे त्यांना जबरदस्तीनें भंगीकाम देण्यांत येतें. मग रडतात बिचारे ! दिवस दिवस उपाशी राहतात. पण करणार काय ? कायद्यापुढें त्यांचें शहाणपण थोडेंच चालणार आहे ? हाडक्याचें देखील असेंच झालें. पण तो चिकट होता चांगला. त्यानें अन्न वगैरे सोडलें नाहीं. पण काम करण्याचें मात्र नाकारलें ! अनेक सजा झाल्या. हातबेडी, गंजरोटी, दंडाबेडी, आडाबेडी, खोलीबंदी-एक ना दोन. कैदी म्हणतात, एकंदर छपन्न सजा आहेत, त्यांपैकीं हाडक्यानें बहुतेक पचवल्या. शेवटीं त्याच्यावर फितुरीचा आरोप ठेवून फटक्यांची सजा देण्यांत आली. जेलमध्यें फितुरी हा अगदीं सहज सिद्ध करण्यासारखा गुन्हा समजला जातो. कांहीं दाखवितां आलें नाहीं, म्हणजे फितुरी करतो म्हटलें कीं झालें ! साक्षीपुरावा कांहीं नको ! फटक्यांची शिक्षा देऊन तिकाटण्याला बांधल्यावर मात्र हाडक्याचें धैर्य गळालें आणि तो कुंडीकाम करण्यास तयार झाला. पण तीन दिवस अन्नाला शिवला देखील नाहीं. त्याची ही करुण कहाणी ऐकून मला त्याची फार दया आली, त्याच्याबद्दल सहानुभूति वाटूं लागली. असेना का गुन्हेगार ? पण बिचाऱ्यावर हा काय जुलूम ?

"हाडक्या, अरे, फटक्यांना रे तूं कां भ्यालास ?" पुढें कांहीं दिवसांनीं मी त्याला विचारलें.

"फटके खाल्ले म्हणजे माणूस थंडा होतो, म्हणून मला भीति वाटली." तो म्हणाला. फटके खाण्यानें मनुष्याला नपुंसकत्व येतें असा त्याचा आशय होता.

"तुझं लग्नबिग्न झालं आहे का रे ?"

" होय तर. मला दोन लेकरां पर हायत. " त्यानें मोठ्या अभिमानानें सांगितलें.

" काय रे, आतां आठ वर्षे तूं तुरुंगांत राहणार, मग बायकापोरांचं कसं होणार तिकडे ? " मीं प्रश्न केला.

" काय होणार ! कोर्टांत भेटाय् आली व्हती तवा मी सांगतलां कीं मी तर आतां म्येलोंच. तूं आपली दुसरां लगन कर. " त्यानें गंहिवरून सांगितलें.

त्याचें तें उत्तर ऐकून मी आश्चर्यानें थक्कच झालों. चोऱ्या दरवडे घालणारा, इतकेंच काय, पण बलत्कारासारखे गुन्हे करणारा, हा मनुष्य. अशा माणसाजवळ देखील इतका सहृदयपणा आणि समंजसपणा पाहून मला मोठें कौतुक वाटलें. मनुष्याचे मनोव्यापार कसे चालतात, हें सांगणें मोठें कठीण आहे. हळूं हळूं त्याची आणि माझी दोस्ती जमली. मी त्याला आपल्याजवळचा साबण, तेल वगैरे द्यायचा. आम्ही खूप गप्पा मारायचे. पण त्याच्या गोष्टी अशाच बिनशेंड्याच्या आणि बिनबुडख्याच्या असायच्या. तो कांहीं तरी ग्राम्य कोट्या करायचा आणि मीहि हंसायचा पोट धरून. सर्वांच्या पुढें तो असें बोलूं शकला नसता. पण मीहि खेड्यांतला. त्यामुळें त्याचा ग्राम्य विनोद मला चालत असे.

एकदां आम्ही पांचपंचवीस आंबे तिकडे फॅशन ( लटपटी ) करून आंत आणले. अधिकाऱ्यांना बनवून अशा कांहीं वस्तू आंत आणण्यांत एक और मजा असे. विनोद करीत आम्ही सर्वांनीं मिळून आंबे खाल्ले, ढेकराही दिल्या. इथपर्यंत सगळें ठीक जुळलें. पण आतां साली कोया कुठें टाकायच्या, असा प्रश्न पडला ! भिंतीवरून बाहेर भिरकवण्याची सोय नाहीं. बाहेरच अधिकाऱ्यांचे बंगले होते. काय करावें, अशा विचारांत सर्व मंडळी पडली. कोणी म्हणाले, खड्डाकरून जमिनींत पुरून टाकाव्या; एकानें सांगितलें;

कपड्याची भट्टी पेटेल, तेव्हां जाळून टाकाव्या सालीं कोया. हाडक्या बाजूला बसून सारें ऐकत होता. तो एकदम पुढें येऊन म्हणाला,

"इतका विचार कसला करताव ? माज्या जवळ द्या. मी घेऊन जातो थेट माज्या मेल मधून. माज्या मेल गाडीची झडती कोण घेणार ? कोणाची टाप लागली हाये इकती ? "

खरोखर त्याचा मार्ग अगदीं सोपा आणि बिनधोक होता. त्याची मेल म्हणजे भैल्याचें पीप. ती घाण डोक्यावर घेऊन तो एकदां बाहेर पडला, म्हणजे कोण थांबवणार त्याला ? अखेरीस त्यानेंच तो मुद्देमाल आपल्या रॉयल–मेलमधून बाहेर नेऊन टाकला.

आमची ही दोस्ती अशीच चालू होती. अखेरीस माझ्या शिक्षेचे दिवस भरत आले. सहा महिने कसे कटणार ? अशी मला काळजी वाटत होती. पण हां हां म्हणतां सर्वांच्या सहवासांत निघून गेले. मी सुटण्याआधीं थोडे दिवस हाडक्याला एक पत्र आलें. आणि त्यां पत्रांतील मजकुरानें तो इतका खिन्न झाला कीं सुटेपर्यंत मी त्याला पहिल्यासारखा मनापासून हंसतांना पाहिला नाहीं. असें काय होतें त्या पत्रांत ?

पत्र त्याच्या बायकोचें होतें. दोन पोरांची आई ती. तिनें तरी काय करावें ? नवऱ्याला आठ वर्षांची शिक्षा झालेली. तरणी ताठी बाई, तो सुटून येईपर्यंत कां तिनं वाट पहावी त्याची ? कातवड्याचा जीवनांत इतकी निष्ठा अपेक्षिणें चुकीचेंच नाहीं कां ? एकांद्यानें दुसऱ्याची बायको काढून नेली, तर पांचपंचवीस रुपये देऊन भांडण ज्ञातीमार्फत मिटविण्यांत यावें, इतकें विवाहबंधन शिथिल. बरें, हाडक्यानें देखील नव्हतें कां सांगितलें, तूं दुसरं लग्न कर, म्हणून ? तिनें खरोखरच दुसरें लग्न केलें होतें. ह्या पत्रांत तीच बातमी होती. तो मजकूर वाचून त्याचें मन अगदीं अस्वस्थ झालें. एक दिवस धड जेवलासुद्धां नाहीं बिचारा ! मीं विचारपूस केली तर त्याच्या डोळ्यांत पाणी आलें टचकन्. भावनेच्या भरांत लग्न कर म्हटलें म्हणून

खरोखरच तिनें लग्न करावें काय ? असें त्याचें म्हणणें होतें. बलात्काराचा गुन्हा करणाराला देखील आपल्या बायकोकडून ही अपेक्षा होती !

आपल्या लेकरांचीदेखील त्याला फार आठवण येत होती. त्यांचें आतां कसें होईल, या विचारानें तो अत्यंत कष्टी झाला होता. दुसरा नवरा त्यांना थोडेंच प्रेमानें वागवणार आहे ! दुसऱ्यांची पोरें म्हणून तो हिडीसफिडीस करणार ! त्याचा जीव झुरत होता त्यांच्यासाठीं. मी त्याचें सांत्वन काय करणार ?

लवकरच जेलमधून सुटून मी बाह्य जगांत आलों. माझी आणि त्याची पुनः गांठ पडली नाहीं. पण त्याची आठवण वेळोवेळीं येते. कोणा एकाद्या कातवड्याशीं संबंध आला कीं हाडक्याची मूर्ति दृष्टीसमोर उभी रहाते. पुनः आठ नऊ वर्षांनीं त्याच जेलमध्यें मी दोनदां गेलों. पण प्रत्येक वेळीं मला त्याची खूप खूप आठवण येई. त्याचें उदास तोंड पुनः खुललें असेल का ? तो केव्हां बरें सुटला असेल ? आतां कोठें असेल ? गरीब बिचारा हाडक्या ! भेट झाली नाहीं ? तरी मी त्याला कसा विसरूं शकेन. माझा पहिला तुरुंगवास मौजेंत घालवायला त्यानें कितीतरी सहाय्य केलें मला !

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र.
ठाणे (स्थापना)
REFBK-0006839

देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार पुणें २.

किंमत तीन रुपये

●

पुढील प्रकाशन

**लंका वैभव**

चिं. वि. जोशी

●